१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• पुणे, सोमवार ११ मे, २०२६ • वर्ष-५, अंक-२३१, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 231 Marathi - Daily - Pune, 11 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

CM विजय थलपथी!

navakal.in

@navakal.news | Navakal Digital Network | @_NDN_Offical | @NavakalNews

## थोडक्यात...

### १२ मे रोजी आसामच्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी

**दिसपूर** - आसाममध्ये नव्या सरकारचा शपथविधी १२ मे रोजी पार पडणार असून हिमंता बिस्वा सरमा हे पुन्हा एकदा राज्याचे मुख्यमंत्री होणार आहेत. सकाळी ११ वाजता हा



सोहळा होणार आहे. सरमा हे १२ मे रोजी तिसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. भाजपाच्या विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले असून, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांनी त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा केली आहे. या शपथविधी सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपाचे वरिष्ठ नेते तसेच राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील अनेक दिग्गज उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

### योगी मंत्रिमंडळाचा विस्तार सहा नव्या मंत्र्यांची शपथ

**लखनौ** - उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या मंत्रिमंडळाचा आज विस्तार झाला. राज्यपाल आनंदीबेन पटेल यांनी लोक भवन येथे आयोजित शपथविधी सोहळ्यात सहा नव्या मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली, तर दोन राज्यमंत्र्यांची कॅबिनेट मंत्रिपदी बढती झाली. भूपेंद्र चौधरी, मनोज पांड्ये, कृष्ण पासवान, सुरेंद्र दिलेर, हंसराज विश्वकर्मा आणि कैलाश राजपूत यांना कॅबिनेट मंत्रीपद देण्यात आले आहे. तर अजित पाल आणि सोमेंद्र तोमर यांना स्वतंत्र प्रभार मंत्रिपदी बढती देण्यात आली. या शपथविधी सोहळ्याला भाजपाचे वरिष्ठ नेते, खासदार, आमदार आणि पक्ष संघटनेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# काँग्रेसचा नेहमीचाच घोळ! केरळचा मुख्यमंत्री ठरेना

## ६ दिवसानंतरही नाव जाहीर नाही! चर्चा, बैठका सुरूच

■ तिरुवनंतपुरम



**केरळमधील विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या नेतृत्वाखालील युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट (युडीएफ)ने स्पष्ट बहुमत मिळवल्यानंतरही मुख्यमंत्रिपदासाठी नाव अजूनही जाहीर झालेले नाही. मुख्यमंत्रिपदासाठी के.सी.वेणुगोपाल, व्ही.डी.सतीशन आणि रमेश चेन्निथला हे तीन नेते स्पर्धेत असून त्यातील एक नाव निवडण्यासाठी गेले सहा दिवस चर्चा आणि बैठका सुरू आहेत. या नेत्यांपैकी कुणाचेही नाव अंतिम केले तरी इतर दोन नेते नाराज होण्याची भीती आहे. त्यामुळे काँग्रेसने नेहमीप्रमाणे घोळ घालत शेवटच्या क्षणापर्यंत मुख्यमंत्रिपदाचे नावच न जाहीर करण्याची भूमिका घेतली आहे.**

**४ मे रोजी** देशातील ५ राज्यांतील निवडणुकांचे निकाल लागले. बंगालमध्ये ५ दिवसांत भाजपाच्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी पार पडला. आज विजय यांनी तामिळनाडूच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. आसाम आणि पुदुचेरीमध्येही तारखा आणि मुख्यमंत्र्यांचे नाव जवळपास निश्चित झाले आहे. पण केरळमध्ये घवघवीत यश मिळवणारी काँग्रेस सहा दिवसांनंतरही मुख्यमंत्र्यांचे नाव ठरवू शकलेली नाही. काँग्रेसमध्ये मुख्यमंत्रिपदासाठी वेणुगोपाल, सतीशन आणि रमेश चेन्निथला हे प्रमुख दावेदार असल्याने हा तिढा निर्माण झाला आहे. या तिन्ही नेत्यांचे तीन स्वतंत्र गट असून आपल्याच नेत्याने मुख्यमंत्री व्हावे, यासाठी तिन्ही गटांनी दबाव निर्माण केला आहे. के. सी.वेणूगोपाल हे राहुल गांधींचे अत्यंत विश्वासू आणि पक्षाचे राष्ट्रीय संघटन सरचिटणीस आहेत. त्यांचे दिल्लीतही वजन आहे. केरळमध्ये पक्ष संघटनेवर त्यांची मजबूत पकड आहे. धोरणात्मक निर्णयांमध्ये त्यांचा सहभाग असतो. केरळ निवडणुकीत उमेदवारांची नावे निश्चित करण्यातही त्यांचा सहभाग होता. ६१ वर्षीय सतीशन केरळ विधानसभेत विरोधी पक्षनेते होते. पारावूरमधून ते पाचव्यांदा आमदार म्हणून निवडून आले आहेत. निवडणुकीदरम्यान ते युडीएफ आघाडीचा चेहरा होते. कार्यकर्त्यांमध्ये त्यांची चांगली पकड आहे. रमेश चेन्निथला हरिपद मतदारसंघाचे आमदार आहेत. मुख्यमंत्रिपदाच्या तीन दावेदारांमध्ये ते सर्वात ज्येष्ठ नेते आहेत. सतीशन यांच्या आधी केरळ विधानसभेत ते विरोधी पक्षनेते होते. २०२१ मध्ये विरोधी पक्षनेते न केल्यामुळे चेन्निथला नाराज होते. याशिवाय युडीएफमधील इतर पक्षांनाही संधी मिळाली तर मुख्यमंत्रीपद हवे आहे.

निकालानंतर काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी अजय माकन, मुकुल वासनिक आणि दीपा दासमुंशी यांना निरीक्षक म्हणून केरळला पाठवले होते. या तिघांनी ७ मे रोजी तिरुवनंतपुरममध्ये काँग्रेस आमदार आणि वरिष्ठ नेत्यांसोबत मुख्यमंत्र्यांच्या नावावर चर्चा केली. या बैठकीत सहभागी झालेल्या ६३ आमदारांपैकी ७५ टक्के आमदारांनी के.सी.वेणुगोपाल यांना पाठिंबा दिल्याचे सांगितले जात आहे.

» पान ७ वर

## एकाच दिवशी लोकलच्या दोन मोटरमनचा मृत्यू

### कामाच्या ताणाचा प्रश्न ऐरणीवर



**मुंबईत लोकल ट्रेनच्या दोन मोटरमनचा एकाच दिवशी हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. अनुज प्रसाद सिंग आणि मोहसिन खान अशी मृत मोटरमनची नावे असून दोघेही पश्चिम रेल्वेमध्ये कार्यरत होते. यापैकी मोहसिन खान यांचा ड्युटीवर असतानाच मृत्यू झाला. एकाच दिवशी दोन मोटरमनचा मृत्यू झाल्याने कामाच्या वाढत्या ताणाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.**

■ मुंबई

**मागील** काही वर्षांपासून मोटरमन आणि ट्रेन मॅनेजर यांच्या कामाच्या कालावधीत सुधारणा करण्याची मागणी होत आहे. मोटरमनना वर्षातील जवळपास ३६५ दिवस सुट्टीशिवाय काम करावे लागत असून, अनियमित आणि तणावपूर्ण शेड्युलमुळे त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचे सांगितले जात आहे. गेल्या काही महिन्यांपासून लोकल ट्रेनचे वेळापत्रक विस्कळीत होत असल्याने गाड्या उशिराने धावत आहेत. याचा थेट परिणाम मोटरमनच्या विश्रांतीच्या वेळेवर होत असून, त्यांना नाश्ता किंवा जेवणासाठीही पुरेसा वेळ मिळत नसल्याची बाब उघडकीस आली आहे. या घटनेमुळे मोटरमन आणि ट्रेन मॅनेजर वर्गात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. दोन्ही सहकाऱ्यांच्या निधनानंतर येत्या मंगळवारी सायंकाळी ४ वाजता चर्चगेट येथील मोटरमन लॉबीमध्ये शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे.

डिसेंबरपासून मुंबईतील आठ मोटरमन वैद्यकीयदृष्ट्या अनफीट असल्याचे सांगितले जात आहे. मोटरमन तसेच ट्रेन मॅनेजर यांच्या संघटनांकडून गेल्या काही वर्षांपासून कामाच्या वेळेत बदल करण्याची मागणी केली जात आहे. मात्र अजूनही याबाबत ठोस निर्णय झालेला नाही. वाढत्या तणावामुळे आरोग्याचे प्रश्न गंभीर होत आहेत, असे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे.

## रुपाली चाकणकरांची एसआयटी चौकशी

### खरात प्रकरणात ४ मंत्री! काँग्रेसचा आरोप

■ पुणे

**राज्यभरात** खळबळ उडवणाऱ्या भोंदू अशोक खरात लैंगिक शोषण प्रकरणात आज राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची विशेष तपास पथकाने (एसआयटी) साडेपाच तास चौकशी केली. एसआयटी प्रमुख तेजस्वी सातपुते यांनी ही चौकशी केली. यावेळी चाकणकर आपल्या वकिलासह हजर होत्या. दरम्यान, खरात प्रकरणाचा चार मंत्र्यांशी संबंध असल्याचा आरोप आज काँग्रेसचे नाना पटोले यांनी केला.

एसआयटी चौकशीपूर्वी पत्रकारांशी बोलताना चाकणकर म्हणाल्या की, एसआयटी पथकाकडून याप्रकरणाचा जो तपास सुरू आहे.

» पान ७ वर

### हॉटेल व्यावसायिकाचा दावा खरातकडून १३.५० कोटी

भोंदू अशोक खरात याच्याशी संबंधित मनी लॉन्डरिंग प्रकरणाच्या तपासात चौकशीसाठी बोलावण्यात आलेल्या शिर्डीतील एका हॉटेल व्यावसायिकाने ईडीला सांगितले की, शिर्डीमध्ये हॉस्पिटॅलिटी प्रकल्प उभारण्यासाठी प्रस्तावित जमीन व्यवहारासाठी त्याला गेल्या वर्षी खरात याच्याकडून १३.५० कोटी रुपये रोख रक्कम मिळाली होती. या प्रकरणाच्या तपासाचा भाग म्हणून ईडीने अलीकडेच त्या हॉटेल व्यावसायिकाशी संबंधित अनेक ठिकाणी छापे टाकले होते. १३.५० कोटी रुपयांच्या हा रोख व्यवहार हा खरात याच्याशी

» पान ७ वर

## तामिळनाडूत ‘विजय पर्व’ सुरू

### शपथ घेताच तीन मोठे निर्णय

■ चेन्नई

**‘तमिळगा** वेट्री कळघम’ (टीव्हीके)चे प्रमुख अभिनेता-राजकारणी सी. जोसेफ विजय यांनी आज तामिळनाडूच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. गेल्या ६० वर्षांतील ते बिगर द्रविडीयन पक्षाचे मुख्यमंत्री बनले आहेत. शपथ घेताच त्यांनी दर महिन्याला २०० युनिट मोफत वीज, महिला सुरक्षेसाठी विशेष दल आणि अमली पदार्थांविरोधात स्पेशल टास्क फोर्स, अशा तीन मोठ्या घोषणा करून राज्यातील नव्या राजकीय पर्वाची झलक त्यांनी दाखवली.

विजय यांनी काल १२१ आमदारांच्या पाठिंब्याचे पत्र राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांना दिल्यावर त्यांनी विजय यांना सत्तास्थापनेचे आमंत्रण दिले. आज सकाळी १० वाजता चेन्नईतील जवाहरलाल नेहरू इनडोअर स्टेडियममध्ये पार पडलेल्या शपथविधी सोहळ्यात राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी विजय यांना पद आणि




गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यासह अनेक राजकीय नेते, अभिनेते आणि मान्यवर उपस्थित होते. विजय यांच्यासोबत आणखी नऊ मंत्र्यांनी शपथ घेतली.

» पान ७ वर

## काँग्रेसने द्रमुकच्या पाठीत खंजीर खुपसला! पंतप्रधान मोदींचा हल्लाबोल

■ बंगळुरू

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी आजच्या तीन राज्यांच्या दौऱ्याची सुरुवात आज कर्नाटकातून केली. ते ‘आर्ट ऑफ लिव्हिंग’च्या ४५ व्या स्थापना दिन कार्यक्रमात सहभागी झाले. यावेळी त्यांनी ‘ध्यान मंदिरा’चे उद्‌घाटन करून जनसभेला संबोधित केले. आपल्या भाषणात तामिळनाडूमधील राजकीय घडामोडींचा उल्लेख करत त्यांनी आरोप केला की, काँग्रेसने द्रमुकच्या पाठीत खंजीर खुपसला.



नरेंद्र मोदी म्हणाले की, काँग्रेस आणि द्रमुक यांच्यात गेल्या २५-३० वर्षांपासून जवळचे संबंध आहेत. डीएमकेने अनेक वेळा काँग्रेसला संकटातून बाहेर काढले. २०१४ पूर्वी केंद्रात १० वर्षे चाललेले काँग्रेस सरकारही द्रमुकच्या पाठिंब्यामुळेच टिकून राहिले.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

द्रमुकने नेहमी काँग्रेसच्या हितासाठी काम केले पण सत्तेचे समीकरण बदलताच काँग्रेसने पहिल्याच संधीवर द्रमुकच्या पाठीत खंजीर खुपसला. काँग्रेस हा परजीवी पक्ष बनला आहे. सत्तेसाठी तो

» पान ७ वर

## रिफायनरीनंतर बॉक्साईट प्रकल्प राजापुरातील ग्रामस्थ आक्रमक

■ रत्नागिरी

**नाणार** रिफायनरी प्रकल्पानंतर आता प्रस्तावित बॉक्साईट उत्खनन प्रकल्पावरून राजापूर तालुक्यात पुन्हा संघर्ष पेटला आहेत. नाणार पंचक्रोशीतील ग्रामस्थ, आंबा बागायतदार, शेतकरी, मच्छीमार आणि विविध राजकीय-सामाजिक संघटना यांनी या प्रकल्पाला तीव्र विरोध दर्शवला असून, प्रस्तावित जनसुनावणी उधळून लावण्याचा इशाराही दिला. खाण प्रकल्प विरोधी संघर्ष समिती आक्रमक झाली असून कोकण उद्ध्वस्त करणारा कोणताही प्रकल्प आम्ही होऊ देणार नाही, अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी घेतली.

नाणार, कुंबवडे, सागवे, तारळ आणि साखर या पंचक्रोशीतील ग्रामपंचायतींनी बॉक्साईट प्रकल्पाविरोधात ठराव मंजूर करून ते जिल्हाधिकारी कार्यालयात सादर केले आहेत. ग्रामस्थांच्या मते, याआधी रिफायनरी प्रकल्पालाही मोठा विरोध झाला होता आणि आता पुन्हा त्याच भागात बॉक्साईट उत्खननाचा प्रस्ताव आणून स्थानिकांच्या भावना डावलल्या जात आहेत. २० मे

» पान ७ वर

## कंत्राटी कर्मचारी कायमस्वरूपी करण्याचा हक्क सांगू शकत नाही

उच्च न्यायालयाचा निकाल

■ मुंबई

**कंत्राटी** कर्मचाऱ्याने केवळ दीर्घकाळ काम केले म्हणून तो नियमित नियुक्तीचा कायदेशीर हक्क सांगू शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल उच्च न्यायालयाने आयआयटी मुंबईच्या प्रकरणात दिला. आयआयटी मुंबईमध्ये १० वर्षे कंत्राटी तत्त्वावर काम करणाऱ्या अधिकाऱ्याचा कायमस्वरूपी नियुक्तीचा दावा न्यायालयाने फेटाळून लावला. हा निर्णय देताना न्या. रियाझ छागला आणि न्या. अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने कायमस्वरूपी नियुक्तीबाबत निरीक्षण नोंदवले.

युवराज बाळासाहेब हरंबळे यांनी २०१६ मध्ये आयआयटी मुंबईत ‘कार्यकारी अधिकारी (विधी)’ म्हणून कंत्राटी पद्धतीने



कामाला सुरुवात केली होती. मार्च २०२६ मध्ये आयआयटी प्रशासनाने हरंबळे यांना त्यांचा कार्यकाळ २३ एप्रिल २०२६ रोजी संपत असल्याचे सांगून कोणतीही मुदतवाढ देण्यास नकार दिला. त्या निर्णयाला आव्हान देतानाच कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याची मागणी करीत हरंबळे यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यांच्या याचिकेवर न्या. रियाझ छागला आणि न्या. अद्वैत सेठना यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. याचिकाकर्त्या हरंबळे यांनी ‘उपकुलसचिव’ पदावर नियमित करण्याची मागणी केली होती. मात्र, या पदासाठी आवश्यक असलेले एलएलएममध्ये किमान ५५ टक्के गुण याचिकाकर्त्याकडे नव्हते. त्यांना केवळ ५०.५ टक्के गुण मिळाले होते.

## ३१,७९३ कोटींच्या विरार-अलिबाग कॉरिडॉरच्या पहिल्या टप्प्याला मंजुरी

■ मुंबई

**महाराष्ट्र** सरकारने ३१,७९३ कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी विरार-अलिबाग मल्टी-मोडल ट्रान्सपोर्ट कॉरिडॉर प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याला मंजुरी दिली आहे. या प्रकल्पांतर्गत १४ मार्गिकांचा नियंत्रित प्रवेश असलेला द्रुतगती मार्ग उभारण्यात येणार असून वाहतुकीचे जाळे सुधारण्याबरोबरच विद्यमान महामार्ग आणि प्रमुख रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी करण्याचा उद्देश आहे. प्रस्तावित १२६ किलोमीटर लांबीचा हा कॉरिडॉर जवाहरलाल नेहरू बंदर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि मुंबई ट्रान्स हार्बर लिंक यांना जोडणार आहे.

पहिल्या टप्प्यात वसईतील नवघर ते पेणमधील बालवली दरम्यानचा ९६.४१ किलोमीटरचा मार्ग विकसित केला जाणार आहे. हा कॉरिडॉर पालघर, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांतील आठ तालुक्यांमधील १०४ गावांतून जाणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास

» पान ७ वर

**एखादी व्यक्ती नैराश्यात जाते, तेव्हा डॉक्टर सहसा संवादातून आणि प्रश्नांतून आजाराचे निदान करतात. मात्र, अनेकदा रुग्ण आपली मानसिक स्थिती शब्दांत मांडण्यास असमर्थ ठरतात. या समस्येवर आता शास्त्रज्ञांनी एक महत्त्वपूर्ण तोडगा शोधला आहे. आता रक्ताच्या चाचणीमधूनही नैराश्याचे निदान करता येणार आहे.**

## आता रक्ताच्या चाचणीमधूनही मानवी नैराश्याचे निदान होणार

■ न्यूयॉर्क

**न्यूयॉर्क** युनिव्हर्सिटीच्या डॉ. निकोल बीलिय पेरेज यांच्या अभ्यासातून



असे समोर आले आहे की, आपल्या शरीरातील रोगप्रतिकारक पेशी आणि मानसिक आरोग्य यांचा खोलवर संबंध आहे. या संशोधनासाठी शास्त्रज्ञांनी रक्तातील ‘मोनोसाइटस’ नावाच्या पांढऱ्या पेशींची बारकाईने तपासणी केली. या पेशी शरीराचे आजारांपासून रक्षण करतात. संशोधनात असे दिसून आले की, ज्या महिला तीव्र निराशा, उदासी किंवा अपयशाच्या भावनेने त्रस्त होत्या. त्यांच्या या पेशी त्यांच्या खऱ्या वयापेक्षा अधिक ‘वृद्ध’ झाल्या होत्या. याचा अर्थ असा की,मानसिक नैराश्य केवळ मनालाच थकवत नाही. तर शरीरातील पेशींनाही अकाली वृद्ध बनवते. हा अभ्यास एकूण ४४० महिलांवर करण्यात आला.

## ऑनलाईन फार्मसीला विरोध! औषध विक्रेत्यांचा २० मेला संप

■ मुंबई

**ऑनलाईन** फार्मसीच्या वाढत्या सुळसुळाटामुळे स्थानिक केमिस्ट आणि औषध विक्रेते सध्या मोठ्या संकटात सापडले आहेत. या विरोधात देशभरातील केमिस्टनी आक्रमक भूमिका घेतली असून, ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट्स अँड ड्रगिस्ट्सने २० मे रोजी देशव्यापी बंदची हाक दिली आहे.

ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट अँड ड्रगिस्ट्सच्या नेतृत्वाखाली सुमारे १२ लाख केमिस्ट या २० मे रोजीच्या संपात सहभागी होण्याची शक्यता आहे. ऑनलाईन फार्मसी ॲप्सकडून मिळणाऱ्या प्रचंड सवलतींमुळे आणि थेट घरपोच सेवेमुळे स्थानिक छोटे मेडिकल स्टोअर्सचे व्यवसाय ५०-६० टक्क्याने कमी झाले



आहेत. त्यामुळे ई-फार्मेसीवर तात्काळ बंदी घालावी किंवा त्यांच्यावर कडक नियम लागू करावेत. तसेच ऑनलाईन औषधविक्रीत बनावट औषधे आणि प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधे मिळण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

नवाकाळ
Email- contact@navakal.in | www.navakal.in | /navakalofficial


# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

मुंबईत हॉटेलमध्ये मोरी, कपडा आणि वेटर पाहिजे राहणे-खाणे मोफत संपर्कः- **9869474850 / 8097558062.** {NC260459}

इमिटेशन ज्वेलरीमध्ये कडी फिटिंग, स्टोन सेटिंग आणि पॅकिंगसाठी अनुभवी मुली पाहिजे. दहिसर पूर्व. Contact : **8169999128** {NC260439}

प्रिंटिंग प्रेससाठी आवश्यकता आहे 1) स्क्रीन प्रिंटिंग ऑपरेटर 2) पंचिंग मशीन ऑपरेटर 3) लॅमिनेशन मशीन ऑपरेटर 4) हेल्पर आणि फ्रेशर 5) ग्राफिक DTP ऑपरेटर. फोकस, 22 (ए)1, हकोबा कंपाऊंड, बॉम्बे कॉटनमिल, काळाचौकी, चिंचपोकळी स्टेशन (पूर्व) आणि कॉटनग्रीन स्टेशन (पश्चिम) येथून 5 मिनिटे चालत. फोन- **9819900505** {NC260456}

कोमोरी फोर कलर प्रिंटर, फिडरमॅन, बॉयलर, पेपर कटिंगसाठी बाईंडर, पंचिंग मशीन व लॅमिनेशन मशीन ऑपरेटर पाहिजेत. श्री साई ग्राफिक्स मानकोली नाका भिवंडी. मो. नं. **9167736969** {NC260451}.

पॅथॅलॉजी लॅबसाठी रक्ताचे नमुने पिक-अप आणि ड्रॉपसाठी मुले/मुली पाहिजेत. पगार + पीएफ + मेडिकल बेनिफीट संपर्कः- **9321982254** (हितेश ठाणेकर) {NC260433}

ड्रायव्हर पाहिजे, कंपनीच्या ऑफिससाठी, कायमस्वरूपी, सर्व फायद्यांसहित. उत्तम वेतन. 30,000/- संपर्कः- **9324804788** {NC260444}

पालघर जिल्ह्यातील विरार (पूर्व), पारोल फाटा येथील 'कृपा आर्ट पॅकेजिंगसाठी ५ प्लाय ऑपरेटर टीम आणि डिझायनर पाहिजे. **9820012278** {NC260482}

## पाहिजेत

कुर्ला ते ठाणे / नवीमुंबई एरियासाठी बायकर्स पाहिजे. गॅस मीटर रिडींग, प्रति विझिट 30/- + इन्सेन्टिव्ह. **7208993036** {NC260483}

बांद्रा ते चर्चगेट एरियासाठी बायकर्स पाहिजे. गॅस मीटर रिडींग, प्रति विझिट 30/- + इन्सेन्टिव्ह. **9820385767** {NC260485}

UV OPERATOR
GRAFICA UV MACHINE
युवी ऑपरेटर हवा आहे.
२२९, ए टु झेड इंडस्ट्रीयल इस्टेट, लोअर परेल
9819176569

मरीनलाईन्स ऑफिसमध्ये साफसफाई इतर कामासाठी लेडी प्यून पाहिजे, वय- 35. वेळ- (9.45 - 6.15) पगार- 12,000/- शिक्षण- दहावी. ॲडव्होकेट जैन- **9820113939** {NC260486}

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर / जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी ''बायका/ मुली'' पाहिजेत पगार- 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007 / 9892575886** दादर वेस्ट {NC260403}

सीएसटी मुंबई येथील पेस्ट कंट्रोल कंपनीला फवारणी करणारी माणसे पाहिजे. पगार- 12,000 + गाडीभाडे + कमिशन. **8356824867** {NC260412}

दररोज ८०० टिफिन पोहोचवले जातात संपूर्ण मुंबईत. ६५ वर्ष किंवा त्यावरील वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना मोफत दुपारचे टिफिन पोहोचवले जातील. श्रीमती कुमुद हितेश चुनीलाल पोपटलाल गुटका प्रभादेवी- **9819006404** फक्त व्हॉट्सॲप (फोन नाही) {NC260496}

## पाहिजेत

मुलुंड येथे गारमेंट ऑफिससाठी ऑफिस व फिल्डवर्कसाठी लेडीज पाहिजेत. (वय 18 ते 30) **9653128763 / 8104614956 / 9920563855** {NC260499}

10/ 24 तास होम पेशंट ड्युटीसाठी वॉर्डबॉय पाहिजे. चांगला PER DAY. **9372767739 / 8452061740** {NC260458}

मावशी, वॉर्डबॉय, कुक, नर्स, ड्रायव्हर, पेशंटकेअर (MALE + FEMALE) पाहिजेत. (राहणेखाणे + पगार) वीकेअर होम (महिला आश्रम) ठाणे. **9136404828** {NC260489}

स्त्री-पुरुष वृद्धाश्रमात कामासाठी पाहिजे. मोफत राहण्याची खाण्याची सुविधा- **7040206848** {NC260438}

मालाड / गोरेगाव पूर्व येथे हाऊसकिपिंग स्टाफची भरती चालू आहे. पगार- १५,०००/- , पीएफ, ईएसआयसी, बोनस व साप्ताहिक सुट्टी संपर्कः- **9833557505 / 8693055930** {NC260500}

## गुंतवणूकविषयक

फक्त ६ महिन्यात घर, लग्न, कामाच्या (पैशाच्या) समस्या सोडविणारे जीवन विमा गुंतवणूक मार्गदर्शन- **9373956687/ 9326367944** {NC260344}


**-: वाचकांना सूचना :-**
दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**

# एमआयआरव्ही तंत्रज्ञानासह अग्नी क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी



■ भुवनेश्वर

**ओडिशाच्या** डॉ. एपीजे अब्दुल कलाम बेटावरून भारताच्या संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने 'मल्टिपल इंडिपेंडंटली टार्गेटेबल री-एन्ट्री व्हेईकल' (एमआयआरव्ही) तंत्रज्ञानाने सज्ज असलेल्या प्रगत 'अग्नी' क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली. या क्षेपणास्त्राची एकापेक्षा जास्त 'पेलोड्स'सह चाचणी करण्यात आली. हिंदी महासागर क्षेत्रातील मोठ्या भौगोलिक परिसरात विखुरलेल्या वेगवेगळ्या लक्ष्यांवर हे पेलोड्स अचूकपणे डागण्यात आले. जमिनीवरील आणि जहाजांवरील अनेक स्थानकांद्वारे क्षेपणास्त्राच्या प्रक्षेपणापासून ते लक्ष्यावर आदळण्यापर्यंतच्या संपूर्ण मार्गाचा मागोवा घेण्यात आला. या यशस्वी चाचणीमुळे भारताने एकाच क्षेपणास्त्र प्रणालीद्वारे अनेक सामरिक लक्ष्यांना भेदण्याची आपली क्षमता पुन्हा एकदा सिद्ध केली. या क्षेपणास्त्राची निर्मिती संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेच्या प्रयोगशाळांनी देशभरातील उद्योगांच्या सहकार्याने केली आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# सुवेंदू अधिकारींच्या नेतृत्वावर शेख हसीना यांचा विश्वास

■ नवी दिल्ली



**भारतात** असलेल्या बांगलादेश अवामी लीग पक्षाच्या अध्यक्षा आणि बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी पश्चिम बंगालचे नवे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला आहे. शेख हसीना यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे सुवेंदू अधिकारी यांना यशस्वी वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

आपल्या संदेशात त्यांनी पश्चिम बंगालचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील सदस्यांना उत्तम आरोग्य व यशाच्या शुभेच्छा दिल्या. अधिकारी यांच्या सक्षम नेतृत्वाखाली राज्याच्या विकासाला आणखी गती मिळेल. तसेच भारत आणि बांगलादेश यांच्यातील ऐतिहासिक मैत्री आणि सहकार्याचे संबंध अधिक दृढ होतील. नव्या सरकारच्या कार्यकाळात द्विपक्षीय संबंधांना नवी उंची मिळेल आणि परस्पर विकासाची गती अधिक मजबूत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# मध्य प्रदेशच्या मौगंजमध्ये महिलेच्या हत्येने खळबळ

■ मौगंज

**मध्य** प्रदेशातील मौगंज जिल्ह्यात एक हत्या प्रकरण उघडकीस आले. नायगढी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बहुती सेंगरन गावात ४५ वर्षीय महिलेची तिच्याच घरात निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या महिलेच्या पहिल्या पतीचे निधन झाले होते आणि तिने दोन महिन्यांपूर्वी दुसरे लग्न केले होते. उमा सिंग असे मृत महिलेचे नाव आहे. ती २ मे रोजी बहुती गावातील तिच्या जुन्या घरी राहायला गेली होती आणि एकटीच राहत होती. घरातून बराच वेळ काहीच हालचाल ऐकू न आल्यामुळे शेजाऱ्यांना संशय आला. शेजारी घरात गेले असता त्यांना खोलीत महिलेचा मृतदेह आढळला. या महिलेचे हातपाय दोरीने तिच्या पाठीमागे बांधलेले होते. तिच्या तोंडात एक कापडी गोळा कोंबला होता, तर तिचा चेहरा आणि नाकही पट्टीने बांधलेले होते.

## देश विदेश

# अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात पाकिस्तान-बांगलादेशात करार

■ ढाका

**अमली** पदार्थांच्या तस्करीविरोधात द्विपक्षीय सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठी पाकिस्तान आणि बांगलादेशने सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसिन नक्वी ढाक्याच्या दौऱ्यावर होते. त्यावेळी त्यांनी बांगलादेशचे गृहमंत्री सलाहुद्दीन अहमद यांची भेट घेतली आणि दोघांनी या करारावर स्वाक्षरी केली.

या करारानुसार दोघांनी आपापल्या मंत्रालयांमध्ये सचिवस्तरीय संयुक्त कार्यकारी गट स्थापन करण्यासही सहमती दर्शवली. या सामंजस्य कराराअंतर्गत दोन्ही देश अमली पदार्थांची अवैध वाहतूक आणि तस्करी रोखण्यासाठी पूर्ण सहकार्य करतील, दोन्ही देशांच्या संबंधित यंत्रणा अमली पदार्थांचे तस्कर आणि तस्करीच्या जाळ्यांविषयी वेळेवर गुप्त माहिती आणि माहितीची देवाणघेवाण करतील, असे पाकिस्तानी गृह मंत्रालयाने म्हटले. दोन्ही बाजूंनी द्विपक्षीय संबंध, अंतर्गत सुरक्षा आणि नागरी सशस्त्र दलांचे प्रशिक्षण या क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांमधील सहकार्य वाढवण्यासही सहमती दर्शवली.

# खैबर पख्तुनख्वामध्ये पाकने ५ दहशतवाद्यांना ठार केले

■ इस्लामाबाद



**पाकिस्तानातील** खैबर पख्तुनख्वा प्रांतात सुरक्षा दलांनी दहशतवाद्यांविरोधात मोठी मोहीम राबवत पाच दहशतवाद्यांचा खात्मा केला. गुप्तचर विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, ७ आणि ८ मे रोजी टँक आणि डेरा इस्माईल खान जिल्ह्यांमध्ये दोन स्वतंत्र कारवाया झाल्या. या चकमकीत बंदी घातलेल्या तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान (टीटीपी) संघटनेचे दहशतवादी ठार झाले.

लष्कराने दिलेल्या माहितीनुसार, टँक जिल्ह्यात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये जोरदार चकमक झाली. या कारवाईत बंदी घातलेल्या तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान (टीटीपी) संघटनेचे चार दहशतवादी ठार झाले. त्यानंतर डेरा इस्माईल खान जिल्ह्यातही चकमक झाली. त्यात टीटीपीचा आणखी एक सदस्य मारला गेला. कारवाईदरम्यान सुरक्षा दलांनी दहशतवाद्यांकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि दारूगोळा जप्त केला आहे. या भागात अजूनही शोधमोहीम सुरू असल्याचे लष्कराने सांगितले.

# कॅनडात वृद्ध दाम्पत्याची हत्या! भारतीय वंशाचे ३ जण दोषी

■ ओटावा

**कॅनडातील** बट्सफोर्ड येथे एका वृद्ध दाम्पत्याच्या निर्घृण हत्येप्रकरणी भारतीय वंशाच्या तीन तरुणांना न्यायालयाने दोषी ठरवले. गुरकरण सिंग, अभिजीत सिंग आणि खुशवीर तूर यांनी आर्थिक हव्यासातून अर्नोल्ड डी जोंग आणि जोआन डी जोंग या वृद्ध जोडप्याची हत्या केल्याचा निष्कर्ष न्यायालयाने काढला. न्यायालयाने दिलेल्या माहितीनुसार, मे २०२२ मध्ये अर्नोल्ड डी जोंग आणि जोआन डी जोंग हे जोडपे त्यांच्या बट्सफोर्ड येथील घरात मृतावस्थेत आढळले होते. या तिघांनी आर्थिक फायद्यासाठी जोडप्याला लुटण्याचा कट रचला होता.

सरकारी वकिलांनी सांगितले की, आरोपींनी घरात घुसून वृद्ध दाम्पत्याला बांधले आणि त्यांची हत्या केली. त्यानंतर त्यांनी घरातून क्रेडिट कार्ड, चेक आणि पॉवर वॉशरसारख्या वस्तू चोरून नेल्या. तपासात असेही स्पष्ट झाले की, आरोपी यापूर्वी त्या घरात कामासाठी गेले होते. तिघेही अभिजीत सिंगच्या स्वच्छता कंपनीत एकत्र काम करत होते.

# पुण्यातील बनेश्वर मंदिर परिसरात मधमाश्यांचा हल्ला

## १५० भाविक जखमी

■ पुणे

**पुणे** जिल्ह्यातील भोर तालुक्यातील प्रसिद्ध श्री क्षेत्र बनेश्वर मंदिर परिसरात मधमाश्यांनी अचानक हल्ला केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. या घटनेत सुमारे १५० भाविक जखमी झाले आहेत. गेल्या ३ ते ४ महिन्यांपासून मंदिर परिसरात मधमाश्यांच्या हल्ल्यांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः दुपारी ११ ते ३ या वेळेत हल्ल्यांची तीव्रता अधिक असल्याचे स्थानिकांनी सांगितले. मंदिर परिसरात दाट झाडी असून सुमारे १५ ते २० मधमाश्यांची पोळी आहेत. स्थानिक नागरिकांनी वनविभागाकडे याविषयी अनेकदा तक्रारी करूनही अद्याप ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. मधमाश्यांची पोळी तातडीने हटविण्याची मागणी स्थानिकांनी केली आहे.

# ११ वर्षांपूर्वी कामावरून काढलेल्या पाच अभियंत्यांना पुन्हा कामावर घ्या

## उच्च न्यायालयाचे पुणे पालिकेला आदेश

■ मुंबई

**पुणे** महापालिकेने २०११ मध्ये पाच कनिष्ठ अभियंत्यांना कामावरून कमी करण्याचा घेतलेला निर्णय उच्च न्यायालयाने बेकायदेशीर ठरवला. पालिकेने संबंधित कर्मचाऱ्यांना १२ आठवड्यांच्या आत पुन्हा सेवेत घ्यावे. तसेच २५ टक्के थकबाकी द्यावी, असेही आदेश न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या एकलपीठाने दिले. संजय भोर, प्रशांत बिबवे, अमोल तापकीर, शशिभूषण होळे आणि चेतन चत्तर हे २००८ पासून पुणे महापालिकेत कनिष्ठ अभियंता म्हणून कंत्राटी पद्धतीने कार्यरत होते. औद्योगिक न्यायालयाने त्यांना नियमित उमेदवार रुजू होईपर्यंत कामावरून न काढण्याचे अंतरिम आदेश दिले होते. मात्र पालिकेने आदेशाचे उल्लंघन करून १९ मार्च २०११ रोजी त्यांच्या सेवा समाप्त केल्या होत्या. पालिकेच्या त्या निर्णयावर आक्षेप घेत कर्मचाऱ्यांनी उच्च न्यायालयाचे दार ठोठावले होते. त्यांच्या याचिकेवर न्यायमूर्ती अमित बोरकर यांनी सुनावणी घेतली. जोपर्यंत न्यायालयाचा अंतरिम आदेश लागू होता, तोपर्यंत पालिकेला कर्मचाऱ्यांना कामावरून काढता येणार नव्हते. त्यामुळे पालिकेने कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून न्यायालयाच्या आदेशाचा अवमान केला आहे, असे निरिक्षण न्यायमूर्ती बोरकर यांनी नोंदवले.

# चेंबूरचे मैत्री पार्क एसटी स्थानक वाचविण्यासाठी सह्यांची मोहीम

## घाटलावासीय नागरिक आंदोलनाच्या पवित्र्यात

■ मुंबई

**गेल्या** ५० वर्षांहून अधिक काळ चेंबूरकरांची शान असलेले घाटले गाव परिसरातील मैत्री पार्क एसटी स्थानक स्थलांतरित करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यामुळे स्थानिक घाटलावासीय नागरिक आणि प्रवासी वर्ग संतप्त झाला आहे. हे एसटी स्थानक हटविण्याच्या प्रयत्नाला विरोध करण्यासाठी या सर्वांनी व्यापक स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे. तसेच लवकरच तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा या सर्वांनी दिला आहे.

काल शनिवारी पहिल्याच दिवशी या स्वाक्षरी मोहिमेला हजारो नागरिकांसह सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून जाहीर पाठिंबा दर्शविला. स्थानिक सामाजिक कार्यकर्ते अनिल साळवी यांनी माहिती अधिकार अर्जाद्वारे मिळवलेल्या माहितीतून हे एसटी स्थानक स्थलांतरित करण्यासाठी एमएमआरडीएचा प्रस्ताव असल्याचे उघड झाले. या माहितीनंतर अनिल साळवी यांनीच स्थानिक नागरिकांना सोबत घेऊन हे या आंदोलनाला सुरुवात केली आहे. सायन-पनवेल मार्गावरील मैत्री पार्क एसटी स्थानक हे एकमेव स्थानक असून अगदी घाटकोपर, मुलुंडपर्यंतच्या नागरिकांना प्रवासासाठी अत्यंत सोयीचे असे ठिकाण आहे. सर्व सणासुदीला हे स्थानक प्रवाशांनी गजबजलेले दिसते. या स्थानकाशी स्थानिक नागरिकांचे भावनिक आणि जिव्हाळ्याचे नाते आहे. त्यामुळे हे एसटी स्थानक वाचविण्यासाठी अखेरपर्यंत लढा देण्याचा निर्धार व्यक्त केला.

# 'ओंकार' हत्तीचा पुन्हा धुमाकूळ

**सावंतवाडी** - तालुक्यातील भालावल गावात 'ओंकार' या आक्रमक हत्तीने पुन्हा एकदा शिरकाव करत धुमाकूळ घातला. गुरुवारी मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या या घटनेत हत्तीने विकास गुळेकर यांच्या घराबाहेरील अर्टिका गाडीचे मोठे नुकसान केले आहे. तसेच ही उलटवण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

गुरुवारी मध्यरात्री २ वाजण्याच्या सुमारास ओंकार हत्ती भालावल गावात दाखल झाला. यावेळी त्याने आपला मोर्चा विकास गळेकर यांच्या घराकडे वळवला. घराबाहेर उभी असलेली त्यांची अर्टिका गाडी हत्तीने अक्षरशः पलटविण्याचा प्रयत्न केला. हत्तीने दिलेल्या जोरदार धक्क्यांमुळे गाडीच्या दोन्ही बाजूंचे मोठे नुकसान झाले असून काचाही फोडल्या आहेत. या हल्ल्यात गाडीचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

# राहाता येथे १३ वर्षीय मुलाचा मृत्यू पोलीस ठाण्यासमोर आंदोलन

■ अहिल्यानगर

**अहिल्यानगरच्या** राहाता शहरातील १३ वर्षीय ओमकार गायकवाडच्या मृत्यूने संपूर्ण परिसर हादरला असून हा अपघात नसून जाणीवपूर्वक घडवून आणलेला घातपात असल्याचा गंभीर आरोप कुटुंबीय आणि ग्रामस्थांकडून करण्यात आला आहे. कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी संतप्त ग्रामस्थांनी ओमकारचा मृतदेह थेट राहाता पोलीस ठाण्यासमोर आणून ठिय्या आंदोलन केले.

ओमकारची आजी शनी चौक परिसरातून जात होती. तिच्या मागून ओमकारही निघाला होता. कृष्ण मंदिरासमोरील वळणावर इर्टिगा कारने प्रथम आजीला धडक दिली आणि त्यानंतर ओमकारला धडक देत उडवले. या घटनेनंतर शहरात संतापाची लाट उसळली. याप्रकरणी पोलिसांनी तीन जणांना अटक केली असून एक आरोपी अद्याप फरार आहे. कुटुंबियांच्या म्हणण्यानुसार, ओमकार खाली पडल्यानंतर चालकाने वाहन पुन्हा मागे घेत त्याच्या अंगावरून नेले. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या ओमकारला प्रथम शिर्डी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती चिंताजनक झाल्याने पुढील उपचारासाठी त्याला नाशिक येथे हलविण्यात आले. उपचार सुरू असतानाच काल त्याचा मृत्यू झाला.

# आजचे राशी भविष्य

सोमवार ता. ११ मे २०२६
ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| राशी | भविष्य |
|---|---|
| मेष | दिवस चांगला आहे. इच्छापूर्तीसाठी अनुकूलता राहील. लोकसंपर्कासाठी तसेच नवीन मित्र जोडण्यासाठी उपयुक्त. |
| वृषभ | अनुकूल दिवस. आयुष्यात चांगले बदल अनुभवास येतील. आर्थिक आघाडीवर आगेकूच होईल. |
| मिथुन | दिवस नेहमीपेक्षा चांगला असला तरी काही प्रमाणात अस्वस्थता जाणवेल. पैशाचा ओघ चांगला राहील. दानधर्मातून समाधान लाभेल. |
| कर्क | नाउमेद होऊ नका. महत्त्वाचे निर्णय घेण्यास आज अनुकूलता नाही. आर्थिक नुकसानीचे योग. |
| सिंह | अनुकूल दिवस. नवीन सहकारी व मित्र जोडले जातील. कामात सफलता मिळेल. |
| कन्या | संमिश्र फलितांचा दिवस. काही झटपट निर्णय घेता येतील. अशक्यप्राय गोष्टी शक्य करण्याची क्षमता लाभेल. |
| तूळ | दिवस अनुकूल आहे. कामाचे काटेकोर नियोजन करण्यासाठी दिवसाचा उपयोग होईल. महत्त्वाचे निर्णय घेता येतील. |
| वृश्चिक | हिशोबी वृत्ती हिताची ठरेल. पैसा जपून खर्च करा. कामाचा वाढता ताण त्रस्त करेल. |
| धनु | आज सुरळीत वाटचाल होईल. सर्व कामे सहजगत्या होतील. कामाच्या नवीन संधी येतील. |
| मकर | दिवस सर्वसाधारण आहे. महत्त्वाचे निर्णय लांबणीवर टाकणे योग्य ठरेल. कामे वेळेत पूर्ण कठीण असेल. |
| कुंभ | अनावश्यक चिंता प्रगतीत अडथळा ठरेल. वडिलधाऱ्यांशी मतभेदाची शक्यता. वडिलांच्या तब्येतीची काळजी घ्या. |
| मीन | दिवस फारसा अनुकूल नाही. लाभापेक्षा खर्च अधिक होईल. नोकरीत अतिरिक्त जबाबदाऱ्या येतील. |

# लॉटरी

## महाराष्ट्र गजलक्ष्मी रवि विकली लॉटरी

निकाल | महाराष्ट्र राज्य लॉटरी | सोडत संध्या. 4:45 वाजता
सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 19 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 10/05/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- : **GL-04 : 0125**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0028 | 0747 | 1768 | 1773 | 3231 (हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा) | 3279 (गजानन लॉटरी सेंटर, बुलढाणा) | 5786 | 5904 | 7371 | 9604 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0002 | 1169 | 1632 | 3731 | 4840 | 5079 | 8344 | 8807 | 9264 | 9739 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 2187 | 2739 | 3200 | 3268 | 3547 | 4230 | 5998 | 7328 | 7640 | 8722 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0500 | 0640 | 1418 | 2227 | 2374 | 4306 | 5258 | 8064 | 9667 | 9806 |

सहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1142 | 1777 | 2482 | 3227 | 4130 | 5239 | 6297 | 6906 | 8208 | 8923 |
| | | 1151 | 1812 | 2489 | 3283 | 4158 | 5282 | 6321 | 7148 | 8348 | 8981 |
| 0008 | 0554 | 1154 | 1859 | 2526 | 3333 | 4273 | 5352 | 6344 | 7205 | 8357 | 8986 |
| 0032 | 0587 | 1159 | 1964 | 2620 | 3341 | 4319 | 5406 | 6384 | 7272 | 8393 | 9046 |
| 0045 | 0597 | 1199 | 2021 | 2625 | 3370 | 4403 | 5455 | 6425 | 7287 | 8428 | 9079 |
| 0082 | 0704 | 1261 | 2026 | 2673 | 3386 | 4465 | 5512 | 6488 | 7372 | 8443 | 9131 |
| 0118 | 0705 | 1293 | 2035 | 2722 | 3410 | 4546 | 5539 | 6493 | 7381 | 8455 | 9152 |
| 0120 | 0770 | 1313 | 2066 | 2733 | 3420 | 4556 | 5557 | 6504 | 7477 | 8489 | 9229 |
| 0130 | 0793 | 1348 | 2070 | 2747 | 3522 | 4594 | 5568 | 6606 | 7640 | 8515 | 9396 |
| 0185 | 0855 | 1372 | 2082 | 2812 | 3579 | 4604 | 5647 | 6614 | 7724 | 8586 | 9398 |
| 0207 | 0930 | 1385 | 2120 | 2890 | 3593 | 4754 | 5696 | 6641 | 7779 | 8589 | 9496 |
| 0209 | 0975 | 1440 | 2162 | 2901 | 3613 | 4780 | 5730 | 6649 | 7785 | 8693 | 9557 |
| 0220 | 1015 | 1451 | 2182 | 2937 | 3623 | 4781 | 5759 | 6664 | 7828 | 8725 | 9661 |
| 0250 | 1027 | 1468 | 2222 | 3003 | 3656 | 4909 | 5776 | 6674 | 7846 | 8769 | 9704 |
| 0254 | 1028 | 1511 | 2226 | 3036 | 3731 | 4949 | 5833 | 6676 | 7916 | 8783 | 9764 |
| 0304 | 1045 | 1526 | 2253 | 3050 | 3792 | 4974 | 5853 | 6682 | 7971 | 8798 | 9809 |
| 0358 | 1057 | 1555 | 2362 | 3059 | 3830 | 4982 | 5881 | 6697 | 8023 | 8801 | 9836 |
| 0366 | 1100 | 1580 | 2375 | 3073 | 3912 | 5045 | 6052 | 6698 | 8080 | 8809 | 9937 |
| 0403 | 1118 | 1629 | 2402 | 3134 | 3931 | 5055 | 6059 | 6784 | 8084 | 8820 | 9963 |
| 0425 | 1129 | 1675 | 2426 | 3181 | 3947 | 5090 | 6079 | 6798 | 8096 | 8838 | 9967 |
| 0470 | 1132 | 1703 | 2467 | 3182 | 4071 | 5153 | 6096 | 6882 | 8145 | 8841 | 9973 |
| 0544 | 1141 | 1720 | 2476 | 3213 | 4102 | 5215 | 6174 | 6901 | 8180 | 8894 | 9993 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## गणेशलक्ष्मी वैभव विकली लॉटरी

निकाल | महाराष्ट्र राज्य लॉटरी | सोडत सायं. 5:00 वाजता
सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 19 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 10/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **MG-01 : 1520**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- : 9762

तिसरे बक्षिस रु. 2000/- : 2068 (महाराजा असोसिएट्स, इचलकरंजी)

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1357 | 1921 | 3287 | 3410 | 3422 | 3588 | 5441 | 6493 | 8086 | 8221 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0181 | 2432 | 2651 | 3013 | 3619 | 8249 | 8911 | 9084 | 9383 | 9659 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 2731 | 3490 | 5613 | 6097 | 7369 | 7587 | 7817 | 8941 | 9691 | 9769 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1986 | 2552 | 3379 | 4412 | 5572 | 6571 | 7251 | 8368 | 9189 |
| | | 2112 | 2554 | 3397 | 4424 | 5589 | 6581 | 7419 | 8399 | 9195 |
| | | 2114 | 2572 | 3415 | 4437 | 5655 | 6582 | 7446 | 8472 | 9293 |
| 0010 | 1150 | 2126 | 2589 | 3419 | 4457 | 5687 | 6623 | 7487 | 8486 | 9391 |
| 0034 | 1158 | 2132 | 2627 | 3433 | 4480 | 5731 | 6640 | 7536 | 8540 | 9416 |
| 0039 | 1190 | 2192 | 2632 | 3457 | 4695 | 5940 | 6655 | 7627 | 8580 | 9445 |
| 0095 | 1210 | 2215 | 2692 | 3583 | 4789 | 5995 | 6668 | 7677 | 8583 | 9477 |
| 0139 | 1211 | 2238 | 2774 | 3653 | 4874 | 5996 | 6689 | 7715 | 8720 | 9490 |
| 0150 | 1222 | 2250 | 2784 | 3736 | 4922 | 6029 | 6695 | 7719 | 8808 | 9636 |
| 0194 | 1319 | 2262 | 2838 | 3816 | 5050 | 6114 | 6752 | 7775 | 8823 | 9646 |
| 0307 | 1321 | 2286 | 2930 | 3836 | 5190 | 6196 | 6812 | 7809 | 8851 | 9707 |
| 0316 | 1351 | 2295 | 2952 | 3839 | 5193 | 6246 | 6818 | 7812 | 8856 | 9721 |
| 0406 | 1557 | 2297 | 3038 | 3878 | 5208 | 6261 | 6835 | 7817 | 8866 | 9747 |
| 0596 | 1568 | 2307 | 3077 | 3908 | 5287 | 6324 | 6836 | 7908 | 8871 | 9794 |
| 0673 | 1611 | 2358 | 3133 | 4045 | 5292 | 6360 | 6867 | 8124 | 8873 | 9801 |
| 0761 | 1639 | 2363 | 3138 | 4059 | 5406 | 6364 | 6890 | 8130 | 8990 | 9821 |
| 0808 | 1675 | 2382 | 3145 | 4070 | 5451 | 6376 | 7024 | 8138 | 9000 | 9912 |
| 0810 | 1731 | 2401 | 3226 | 4248 | 5467 | 6386 | 7043 | 8202 | 9079 | 9938 |
| 1068 | 1850 | 2414 | 3323 | 4377 | 5525 | 6463 | 7078 | 8246 | 9113 | 9949 |
| 1101 | 1913 | 2495 | 3333 | 4382 | 5526 | 6472 | 7176 | 8273 | 9145 | 9953 |
| 1110 | 1938 | 2542 | 3355 | 4388 | 5545 | 6522 | 7205 | 8355 | 9161 | 9983 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र मोहिनी विकली लॉटरी

निकाल | महाराष्ट्र राज्य लॉटरी | सोडत सायं. 4:30 वाजता
सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 19 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 10/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **MO-00 : 2444**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0100 | 0156 | 1648 | 1886 | 2137 | 2622 | 4019 | 4355 | 5078 | 6680 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0654 | 0881 | 1122 | 1220 | 1412 | 3644 | 6290 | 6484 | 7462 | 9092 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0048 | 0108 | 0359 | 1510 | 1930 | 3558 | 4277 | 4528 | 7507 | 9178 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0908 | 2062 | 2839 | 3733 | 4524 | 5984 | 7269 | 8649 |
| | 1144 | 2082 | 3033 | 3743 | 4541 | 6334 | 7306 | 8728 |
| 0001 | 1161 | 2109 | 3038 | 3829 | 4724 | 6430 | 7519 | 8868 |
| 0028 | 1191 | 2202 | 3130 | 3862 | 4752 | 6522 | 7600 | 8999 |
| 0160 | 1212 | 2239 | 3172 | 4043 | 4990 | 6550 | 7736 | 9169 |
| 0257 | 1223 | 2377 | 3178 | 4142 | 5143 | 6566 | 7761 | 9217 |
| 0298 | 1364 | 2545 | 3203 | 4215 | 5153 | 6606 | 7989 | 9379 |
| 0303 | 1396 | 2677 | 3204 | 4225 | 5165 | 6627 | 8013 | 9630 |
| 0410 | 1451 | 2695 | 3300 | 4227 | 5408 | 6822 | 8042 | 9719 |
| 0640 | 1583 | 2821 | 3325 | 4439 | 5424 | 7106 | 8126 | 9839 |
| 0725 | 1723 | 2825 | 3336 | 4470 | 5513 | 7140 | 8179 | 9871 |
| 0744 | 1938 | 2826 | 3433 | 4487 | 5795 | 7206 | 8584 | 9878 |
| 0814 | 1956 | 2827 | 3635 | 4489 | 5849 | 7223 | 8595 | 9885 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी ता. ११/५/२०२६

| | | |
|---|---|---|
| ९ | १ | ६ |
| ९२ | १२ | ६२ |
| ९७ | १७ | ६७ |
| १२६ | १२८ | १६९ |
| ३७९ | ३८० | २४० |

## एलआयसी ६८ इमारतींचा स्वतःच पुनर्विकास करणार

**म्हाडा सर्वतोपरी सहकार्य करणार**

मुंबई

**मुंबईतील** एलआयसीच्या मालकीच्या, जीर्ण आणि मोडकळीस आलेल्या ६८ उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. या इमारतींचा पुनर्विकास एलआयसी स्वतः करणार असून, त्यासाठी म्हाडा सर्वतोपरी सहकार्य करणार आहे.

दक्षिण मुंबईतील फोर्ट, गिरगाव, माटुंगा, दादर परिसरातील ६८ जुन्या एलआयसी इमारतींचा पुनर्विकास एलआयसी स्वतःच करणार आहे. एलआयसीने या इमारतींच्या पुनर्विकासासाठी आवश्यक प्रस्ताव सादर करण्याची तयारी दर्शवली आहे. म्हाडाच्या वांद्रे येथील मुख्यालयात झालेल्या बैठकीत यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या निर्णयामुळे शेकडो भाडेकरू-रहिवाशांना जे धोकादायक इमारतींमध्ये जीव मुठीत धरून राहत होते, मोठा दिलासा मिळाला आहे. पुनर्विकासाची प्रक्रिया गतीमान करण्यासाठी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी, आणि राज्य सरकारने, सहा महिन्यांत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले होते. या बैठकीत म्हाडाचे उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी या जुन्या इमारतींच्या सुरक्षित आणि जलद पुनर्विकासासाठी आवश्यक ते सर्व तांत्रिक सहकार्य म्हाडातर्फे केले जाईल, असे स्पष्ट केले आहे.

## बीडमध्ये १५ वर्षीय मुलीवर चुलत भावाकडून अत्याचार

**डॉक्टरांनी नियमांचे उल्लंघन केल्याचा संशय**

बीड

**बीड** जिल्ह्यातील माजलगाव येथे १५ वर्षीय मुलीवर तिच्याच १४ वर्षीय चुलत भावाने अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. या अत्याचारामुळे पीडित मुलगी दोन महिन्यांची गर्भवती राहिली. या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

पीडित अल्पवयीन मुलीला पोटदुखीचा त्रास होत असल्याने कुटुंबियांनी तिला माजलगाव येथील रुग्णालयात नेले. तपासणीदरम्यान सोनोग्राफीमध्ये ती गर्भवती असल्याचे स्पष्ट झाले. यानंतर कुटुंबियांना मोठा धक्का बसला. चौकशीत, पीडितेचा फायदा घेत तिच्याच चुलत भावाने हे कृत्य केल्याचे उघडकीस आले. त्यानंतर कुटुंबियांनी स्थानिक रुग्णालयात तिचा गर्भपात करून घेतला.

कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न पाळता आणि पोलिसांना माहिती न देता अल्पवयीन मुलीचा गर्भपात करण्यात आला. संबंधित डॉक्टरांनी नियमांचे उल्लंघन केल्याचा संशय असून, पोलिसांकडून त्यांचा शोध सुरू आहे. त्यांच्यावर कडक कारवाई होण्याची शक्यता आहे. या प्रकरणी पीडित मुलीच्या आईच्या तक्रारीवरून माजलगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, अत्याचार करणाऱ्या अल्पवयीन मुलाला ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

## पंढरपूरचा सात मजली ज्ञानेश्वर दर्शन मंडप इतिहासजमा होणार

पंढरपूर



**पंढरपुरातील** विठ्ठल मंदिराशेजारी गेली तब्बल ३७-३८ वर्षे हजारो भाविकांना सामावून घेणारा ऐतिहासिक सात मजली संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप आता इतिहासजमा होणार आहे. मंदिर परिसरात प्रस्तावित कॉरिडॉर प्रकल्प आणि रस्ता रुंदीकरणासाठी प्रथम टप्प्यात मंदिराच्या मालकीच्या इमारती हटवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

नामदेव पायरीलगत असलेल्या या दर्शन मंडपात विठ्ठल दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या लांबच लांब रांगा लागतात. मात्र यंदाची आषाढी यात्रा ही या दर्शन मंडपासाठी शेवटची ठरणार असून, त्यानंतर साधारण १ ऑगस्टपासून मंडपाच्या पाडकामाला सुरुवात होण्याची शक्यता आहे. यासोबतच मंदिराच्या मालकीची तुकाराम भवन ही इमारतही पाडली जाणार आहे.

## सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नावाने खोटे वक्तव्य व्हायरल

**कठोर कारवाईचा इशारा**

नवी दिल्ली

**देशाचे** सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नावाने समाज माध्यमांवर विखारी आणि जातीवाचक विधान व्हायरल करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत सरन्यायाधीशांनी खोटी माहिती पसरवणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाईचा इशारा दिला.

एक्सवरील अनरिझर्व्ह मेरिट नावाच्या अकाउंटवरून सरन्यायाधीशांच्या छायाचित्रासह एक पोस्ट शेअर करण्यात आली होती. या पोस्टमध्ये हिंदी भाषेत एक वादग्रस्त विधान देण्यात आले होते. एखादा समाज आयएएस, आयपीएस, सीजेआय, राष्ट्रपती किंवा पंतप्रधान होऊनही स्वतः ला शोषितच समजत असेल, तर त्यासाठी इतर कोणी नव्हे तर त्याची मानसिकता जबाबदार आहे, असे त्या पोस्टमध्ये नमूद करण्यात आले होते. हे विधान सरन्यायाधीशांचे असल्याचा भास निर्माण करत ते मोठ्या प्रमाणावर व्हायरल करण्यात आले. सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी हे विधान पूर्णपणे फेटाळून लावले आहे. माझ्या नावावर खोटेपणाने खपवले जाणारे हे वक्तव्य निराधार आहे. हे माझे शब्द नाहीत, तसेच माझे विचार किंवा चारित्र्यही असे नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी फेक न्यूज पसरवणाऱ्यांना कडक शब्दांत इशारा दिला. या प्रकरणामागे असलेल्या व्यक्तींविरुद्ध मी कायद्याची संपूर्ण शक्ती वापरण्यास तयार आहे.

## यूट्यूबर एल्विश यादवला जीवे मारण्याची धमकी

गुरुग्राम

**बिग** बॉस ओटीटी' फेम आणि यूट्यूबर एल्विश यादवकडे लॉरेन्स बिश्नोई टोळीने १० कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी करत गोळ्या घालून ठार मारण्याची धमकी दिली आली आहे. एल्विश यादव आणि त्याच्या वडिलांना धमकीचा मेसेज पाठवण्यात आला असून दोन दिवसांत १० कोटी रुपये द्या, नाहीतर गोळ्या घालू, असे त्यात लिहिले आहे. या प्रकरणी यादवने गुरुग्राममधील सेक्टर-५६ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंद केला आहे.

## गोव्यात 'अटल आसरा' अंतर्गत नवीन घरासाठी ५ लाखांची मदत

पणजी

**गोव्यात** राज्य सरकारने एसटी अर्थात अनुसूचित जमाती समाजासाठी 'अटल आसरा' योजनेअंतर्गत घर बांधणीच्या आर्थिक मदतीत मोठी वाढ केली आहे. आता नवीन घर बांधणीसाठी ५ लाख रुपये आणि घराच्या दुरुस्तीसाठी ३ लाख रुपयांपर्यंतची आर्थिक मदत मिळणार आहे. ही रक्कम पहिल्या टप्प्यात ७५ टक्के आणि दुसऱ्या टप्प्यात २५ टक्के अशी वितरित केली जाईल.

आदिवासी कल्याण संचालनालयाने या योजनेची सुधारित अधिसूचना जारी केली असून राज्यातील एसटी कुटुंबांना अधिक सक्षम घरकूल सहाय्य देण्याचा उद्देश असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. सुधारित योजनेनुसार, वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ५ लाख पात्र एसटी लाभार्थ्यांना

**घराच्या दुरुस्तीसाठी ३ लाख रुपये**

नवीन घरबांधणी किंवा पुनर्बांधणीसाठी ५ लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत मिळणार आहे. घर दुरुस्तीसाठी ३ लाख रुपयांपर्यंत सहाय्य दिले जाईल. घर दुरुस्तीसाठी दीड लाख रुपये मदत दिली जात होती.

पूर्वी या योजनेसाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा ३ लाख रुपये होती. वाढत्या बांधकाम खर्चामुळे तसेच अनेक आदिवासी कुटुंबांकडे अद्याप पक्की घरे नसल्याने आर्थिक सहाय्यात वाढ करणे आवश्यक झाल्याचे सरकारने नमूद केले आहे. विद्यमान राज्य आणि केंद्र सरकारच्या गृहनिर्माण योजनांव्यतिरिक्त ही मदत दिली जाणार आहे. या योजनेत बीपीएल कुटुंबे, विधवा महिला, अविवाहित किंवा घटस्फोटित महिलांच्या नेतृत्वाखालील कुटुंबे, दिव्यांग व्यक्ती, पूर किंवा आगीमुळे बाधित कुटुंबे तसेच वनवासी अर्जदारांना प्राधान्य दिले जाणार आहे.

## मोरबे धरणाचा पाणीसाठा ८५ दिवस पुरेल इतकाच



नवी मुंबई

**नवी** मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणात सध्या केवळ ८५ दिवस पुरेल इतकाच म्हणजे सुमारे ४३ टक्क्यांपेक्षा पेक्षा कमी पाणीसाठा शिल्लक आहे. त्यातच एल निनोमुळे पावसाळ्याच्या विलंबाच्या आणि कमी पावसाच्या शक्यतेमुळे, नवी मुंबई महापालिका प्रशासनाने नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले आहे.

मोरबे धरणात ४३ टक्केपेक्षा कमी पाणीसाठा असून १०३ दिवस पुरेल इतका साठा उपलब्ध असल्याची माहिती देण्यात आली होती, मात्र अद्ययावत माहितीनुसार तो ८५ दिवसांचा उरला आहे. पालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी धरण क्षेत्राची पाहणी करून आढावा घेतला आहे. यावेळी आयुक्तांनी धरण क्षेत्राच्या एका बाजूने आंबेवाडीपर्यंत ७.५ किलोमीटर आणि दुसऱ्या बाजूने पिरकटवाडी, उंबरणेवाडीपर्यंत ११ किलोमीटर क्षेत्रांची पाहणी केली. यावेळी भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी नागरिकांनी वाहने धुणे, अंगण धुणे यासाठी पिण्याचे पाणी वापरू नये, असे आवाहन पालिका आयुक्तांनी केले. यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्यास शहरात पाणी कपातीची शक्यता नाकारता येत नाही.



पावसाळा जवळ आला की निसर्ग फुलांनी सजून जातो. मुंबईत विविध प्रकारच्या फुलांचा बहर आला आहे.

(छाया: दीपक साळवी)

## राज्यात ४८७ अनधिकृत शाळा! मुंबईत सर्वाधिक ३८९ शाळा

मुंबई

**राज्यभरात** अनधिकृत शाळांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहेत. शिक्षण विभागाच्या आकडेवारीनुसार राज्यात तब्बल ४८७ शाळा परवानगीशिवाय सुरू आहेत. त्यापैकी सर्वाधिक ३८९ शाळा मुंबई विभागात आहेत. पुणे विभागात ६३ अनधिकृत शाळांची नोंद झाली आहे.

इतर विभागांमध्ये कोल्हापूर (१५), नागपूर (११), अमरावती (४), नाशिक (३), छत्रपती संभाजीनगर (१) आणि लातूर (१) येथेही अनधिकृत शाळा सुरू असल्याचे आढळले आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने कारवाई सुरू केली आहे आणि आतापर्यंत ७६ शाळा बंद केल्या आहेत. त्यामध्ये मुंबई (५९), पुणे (११), लातूर (१), नागपूर (४) आणि अमरावती (१) येथील शाळांचा समावेश आहे. तसेच १११ शाळांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. मुंबई (९६), पुणे (७), नागपूर (६) आणि अमरावती (२) या विभागांतील शाळांचा यात समावेश आहे. याशिवाय ३२५ शाळांवर दंड आकारण्यात आला आहे. मात्र, प्रत्यक्षात केवळ १६ शाळांकडूनच दंड वसूल करण्यात आला आहे. यामध्ये मुंबई (५), पुणे (१०) आणि लातूर (१) येथील शाळांचा समावेश आहे. त्यामुळे कारवाई असूनही अंमलबजावणीत त्रुटी आहेत.

शिक्षण आयुक्त सच्चिंद्र प्रताप सिंह म्हणाले की, अनधिकृत शाळांविरोधातील मोहीम आणखी तीव्र करण्यात येणार असून जिल्हानिहाय तपासणी वाढवली जाणार आहे. पालकांना वेळेवर माहिती मिळावी यासाठी अशा शाळांची यादी वर्षातून दोनदा जाहीर करण्याचा निर्णय घेतला आहे.

## अमरावतीत ड्रग रॅकेटचा पर्दाफाश मुंबई-राजस्थान कनेक्शन उघड

अमरावती

**अमरावती** शहरात एमडी ड्रगच्या मोठ्या रॅकेटचा नागपुरी गेट पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत अमरावतीसह मुंबई आणि राजस्थानपर्यंत पसरलेले अमली पदार्थांचे जाळे उघड झाले आहे. पोलिसांनी एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल केला असून १७ आरोपींपैकी १० जणांना अटक करण्यात आली आहे. सात आरोपी फरार आहेत.

या कारवाईत पोलिसांनी २ किलो २७१ ग्रॅमपेक्षा जास्त एमडी ड्रग जप्त केले. या ड्रगची किंमत ३ कोटी ४० लाख ६९ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. वाहन, मोबाईल आणि इतर साहित्यांसह एकूण ३ कोटी ५० लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांनी सांगितले की लालखडी परिसरातील जयस्वाल यांच्या शेताजवळ कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर तपासात मुंबई आणि राजस्थानमधील आरोपींचे धागेदोरे समोर आले आहेत.

## इगतपुरीत भोंदू बाबाला वन्यजीव अवयवांसह अटक

नाशिक

**भोंदूबाबा** अशोक खरात प्रकरण ताजे असतानाच इगतपुरी परिसरात वनविभागाने आणखी एका बोगस बाबावर धडक कारवाई करत त्याच्या बेकायदेशीर कृत्यांचा पर्दाफाश केला आहे. इगतपुरी तालुक्यातील गिरणारे (बनवाडी) येथील चंद्रकांत राजेंद्र माळी (३३) याला अटक करण्यात आली असून, त्याच्याकडून मोठ्या प्रमाणात वन्यजीवांचे अवयव जप्त करण्यात आले आहेत.

वनविभागाला गिरणारे परिसरात एक तरुण भोंदूगिरीच्या आडून वन्यजीवांच्या अवयवांचा वापर आणि तस्करी करत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पथकाने नियोजनबद्ध सापळा रचत



आरोपीच्या घरावर छापा टाकला. वनविभागाचे अधिकारी सर्च वॉरंटसह घरात दाखल होताच, पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने आरोपी चंद्रकांत माळी याने चक्क सर्च वॉरंट तोंडात टाकून चावून खाल्ले. अधिकाऱ्यांनी तत्काळ त्याला ताब्यात घेत घराची झडती पूर्ण केली. झडतीदरम्यान आरोपीच्या घरातून वन्यजीवांच्या अवयवांचा मोठा साठा जप्त करण्यात आला. यामध्ये रानडुकराचे दात, सांबर आणि काळवीटाची शिंगे, घुबडाचे अवयव, सालिंदरचे काटे, मोरपिसे तसेच एक तलवार यांचा समावेश आहे. जप्त मुद्देमालाची अंदाजे किंमत सुमारे २ लाख रुपये असल्याचे वनविभागाने सांगितले. वनविभागाने आरोपीला अटक करून न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

## कर्नाटकचे कॅबिनेट मंत्री डी.सुधाकर यांचे निधन



बंगळुरू

**कर्नाटक** सरकारमधील नियोजन आणि सांख्यिकी मंत्री म्हणून कार्यरत असलेले सुधाकर (६६) यांचे आज पहाटे ३.१५ वाजताच्या सुमारास कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (किम्स हॉस्पिटल) येथे उपचारादरम्यान निधन झाले. गेल्या अनेक दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरू होते, मात्र प्रकृतीत सुधारणा न झाल्याने त्यांची प्राणज्योत मालवली.

डी. सुधाकर हे कर्नाटक काँग्रेसचे ज्येष्ठ आणि निष्ठावान नेते म्हणून ओळखले जात होते. हिरियूर विधानसभा मतदारसंघ येथून ते आमदार म्हणून निवडून आले होते. यापूर्वी त्यांनी सामाजिक कल्याण आणि युवा कल्याण यांसारख्या महत्त्वाच्या खात्यांची जबाबदारी सांभाळली होती.

त्यांच्या निधनानंतर कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी दुःख व्यक्त केले. ते म्हणाले की, सुधाकर हे माझे जवळचे सहकारी होते. त्यांच्या निधनाने पक्षाचे आणि राज्याचे मोठे नुकसान झाले आहे.

## पालिकेतील प्रभाग समित्यांवर नेमणार बिगर सरकारी प्रतिनिधी

**१ जूनपर्यंत अर्ज दाखल करण्याची मुदत !**

मुंबई

**मागील** १४ वर्षांनंतर प्रथमच मुंबई महापालिकेच्या प्रभाग समित्यांवर बिगर सरकारी व समाजलक्षी संघटनेचे प्रतिनिधी नेमले जाणार आहेत. यामध्ये त्यांना समाज कार्याचा अनुभव आणि त्यांची शैक्षणिक पात्रता असणे गरजेचे आहे. यासंदर्भात १ जूनपर्यंत इच्छुकांनी आपले अर्ज दाखल करावेत, असे आवाहन पालिका प्रशासनाने केले आहे.



पालिकेच्या १७ प्रभाग समित्यांवर असे प्रतिनिधी म्हणून निवड होणाऱ्या या बिगर सरकारी व्यक्तीला स्थानिक प्रश्नांची जाण, नागरिकांशी समन्वय साधण्याची क्षमता आणि सार्वजनिक कामांचा अनुभव असणे अपेक्षित आहे. संबंधित व्यक्तीने किमान पाच वर्षे सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, पर्यावरण किंवा नागरिक विषयक क्षेत्रात कार्य केलेले असणे आवश्यक आहे. तसेच त्यांच्या संस्थेविरुद्ध कोणतीही गंभीर तक्रार किंवा कायदेशीर कारवाई प्रलंबित नसावी, असे पालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. प्रतिनिधी म्हणून निवड झालेल्या व्यक्तीला त्यांना कुठल्याही प्रकारचे मानधन मिळणार नाही.

## पुण्यात झोंबीसारखा प्रकार तरुण २ तास एकाच जागी उभा



पुणे

**पुणे** शहरात अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्याची चिंता वाढवणारी घटना उघडकीस आली आहे. नरपतगिरी चौक परिसरात एका तरुणाने संशयित अमली पदार्थांचे सेवन केल्यानंतर तब्बल दोन तास एकाच ठिकाणी स्तब्ध अवस्थेत उभा राहिलेला दिसला. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला असून, शहरात खळबळ उडाली आहे.

हा तरुण नरपतगिरी चौक परिसरात दीर्घकाळ कोणतीही हालचाल न करता उभा होता. सुरुवातीला हा प्रकार एखाद्या व्हिडिओ किंवा रीलसाठी केलेला स्टंट असावा, असे लोकांना वाटले. बराच वेळ उलटूनही त्याने हालचाल न केल्याने संशय बळावला. यानंतर त्या तरुणाने विचित्र हालचाली करण्यास सुरुवात केली.

त्यामुळे त्याने झोंबी ड्रगसारख्या घातक अमली पदार्थांचे सेवन केल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. उपस्थित नागरिकांनी या घटनेचा व्हिडिओ मोबाईलमध्ये चित्रित करून पोस्ट केला. तो अल्पावधीतच व्हायरल झाला.

## पंढरपुरात सीईटी परीक्षा गोंधळात हॉल तिकिट-सीट नंबरमध्ये तफावत

पंढरपूर

**पंढरपूर** शहरातील सिंहगड महाविद्यालय येथे बारावीची सीईटी परीक्षा आयोजित करण्यात आली होती. महाविद्यालयाच्या नियोजनातील त्रुटींमुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठा गोंधळ निर्माण झाला.

अनेक विद्यार्थ्यांच्या हॉल तिकिटांवर परीक्षा केंद्र म्हणून सिंहगड महाविद्यालयाचे नाव नमूद करण्यात आले होते. परंतु प्रत्यक्षात काही विद्यार्थ्यांचे सीट नंबर या केंद्रावर उपलब्ध नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षा हॉलमध्ये प्रवेश देण्यात विलंब झाला आणि त्यांना बराच वेळ बाहेर ताटकळत थांबावे लागले. परीक्षा सकाळी साडेसात वाजता सुरू होणार असताना प्रवेश प्रक्रियेत झालेल्या गोंधळामुळे विद्यार्थ्यांचा वेळ वाया गेला. या प्रकारामुळे परीक्षार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण होऊन मानसिक ताणही वाढल्याचे दिसून आले. हॉल तिकिटांवरील माहिती आणि प्रत्यक्ष सीट नंबरमध्ये विसंगती असल्याने परीक्षा व्यवस्थापनात अडचणी निर्माण झाल्या. या घटनेमुळे परीक्षा नियोजन आणि व्यवस्थापनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

## मेट्रो गाड्यांच्या काचांवरील जाहिरातींमुळे सुरक्षेचा प्रश्न चर्चेत

भाईंदर

**गेल्या** महिन्यांपासून सुरू झालेल्या भाईंदर शहरात सुरू झालेल्या मेट्रो लाईन ९ च्या काचांवरील जाहिरातींमुळे सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या जाहिरातींमुळे प्रवाशांना बाहेरचे दृश्य दिसत नाही. या जाहिरातींमुळे मेट्रोच्या काचांची पारदर्शकता कमी होऊन प्रामुख्याने महिला प्रवाशांना सुरक्षेच्या दृष्टीनेही धोका निर्माण होऊ शकतो, अशी लेखी तक्रार एमएमआरडीएच्या आयुक्तांकडे करण्यात आली आहे. या मेट्रो गाड्यांच्या काचांवर या जाहिराती वन-वे ट्रान्सपरन्सी प्रकारच्या असून आत बसलेल्या प्रवाशांना बाहेरील दृश्य स्पष्ट दिसते. मात्र दिवसा सूर्यप्रकाशामुळे बाहेरील व्यक्तींना मेट्रोच्या आतील भाग किंवा प्रवासी दिसत नाहीत. त्यामुळे महिलांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तक्रारीनुसार, एखादी दुर्घटना किंवा आपत्कालीन प्रसंग उद्भवल्यास या जाहिरातींमुळे मदत कार्यात अडथळा निर्माण होऊ शकतो.

## आंबेगावात जंगलातील वणव्याने २ आदिवासी कुटुंबांचे संसार राख

पुणे

**आंबेगाव** तालुक्यातील लांडेवाडी-चिंचोडी परिसरातील दरा वस्तीवर भीषण आग लागून दोन आदिवासी कुटुंबांचे संसार अक्षरशः राख झाले. जंगल परिसरात लागलेल्या वणव्याची धग थेट वस्तीपर्यंत पोहोचल्याने काही क्षणांतच राहती घरे, गोठे, जनावरांसाठी साठवलेला कडबा, अन्नधान्य, कपडे, भांडी तसेच शालेय साहित्य जळून खाक झाले. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

दरा वस्ती येथे ठाकर समाजातील काही कुटुंबे वास्तव्यास असून मजुरी व शेतातील कामांवर त्यांचा उदरनिर्वाह चालतो. दुपारी २ वाजताच्या सुमारास जंगल परिसरात अचानक




वणवा भडकला. या आगीत गुलाब केवाळे यांचे घर, पाच गुरांचा गोठा, जनावरांसाठी साठवलेल्या सुमारे ९०० कडबा पेंड्या, अन्नधान्य, कपडे, रोख रक्कम, दागिने तसेच मुलांचे शालेय साहित्य जळून खाक झाले. त्याचबरोबर शेजारी राहणारे सागर दादाभाऊ केदारी यांचेही घर आणि संसारोपयोगी साहित्य आगीत भस्मसात झाले. घटनेची माहिती मिळताच तहसीलदार सचिन वाघ यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन आवश्यक मदत करण्याचे आश्वासन दिले. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम यांनी या पीडित आदिवासी कुटुंबांना तातडीने शासकीय मदत देण्याची मागणी करत ग्रामस्थांनीही आर्थिक व जीवनावश्यक वस्तूंच्या स्वरूपात मदतीसाठी पुढे येण्याचे आव्हान केले.

## नाशिकमध्ये सलून व्यावसायिकाची हत्या

नाशिक

**पंचवटी** परिसरातील आडगाव नाका येथे आज पहाटे किरकोळ वाद मिटवण्यासाठी मध्यस्थी करणाऱ्या सलून व्यावसायिक जयवंत पवार (४५) यांची चाकूने भोसकून हत्या केली. जयवंत पवार हे मित्र विनोद आगळे यांच्यासोबत बाहेर गेले होते. पहाटे साडेतीनच्या सुमारास आडगाव नाका येथील टायर पंक्चर दुकानाजवळ राजा काकवीपुरे आणि विनोद आगळे यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला. वाद वाढू नये म्हणून जयवंत पवार यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याचवेळी संतापलेल्या आरोपीने पवार यांच्याशी झटापट सुरू केली. झटापटीदरम्यान आरोपीने धारदार चाकू काढून पवार यांच्यावर हल्ला केला. पहिला वार चुकल्यानंतर दुसरा वार थेट त्यांच्या छातीत बसला. गंभीर जखमी अवस्थेत पवार रक्ताच्या थारोळ्यात कोसळले. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाला. जखमी पवार यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी जयवंत यांच्या पत्नी गीता पवार यांच्या फिर्यादीवरून आरोपी राजा काकवीपुरे याच्याविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.




संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# नव्या संरक्षण दल प्रमुखांची नवी रणनीती

**स्वतंत्र** भारताच्या इतिहासामध्ये तिसरे संरक्षण दल प्रमुख म्हणून लेफ्टनंट जनरल एन. एस. राजा सुब्रमणी यांची नियुक्ती झालेली आहे. यापूर्वी म्हणजेच देशाचे पहिले सीडीएस म्हणून जनरल बिपिन रावत यांची नियुक्ती झाली होती. परंतु २०२१ मध्ये त्यांचा हेलिकॉप्टरमध्ये अपघाताने मृत्यू झाला त्यानंतर सप्टेंबर २०२२ मध्ये जनरल चव्हाण यांच्याकडे ही जबाबदारी देण्यात आली होती. भारताची संरक्षण व्यवस्था अधिक सक्षम आणि जागतिक स्तरावर तितक्याच ताकदीची व्हावी यासाठी भारतात प्रथमच २०२१ मध्ये तिन्ही दलांसाठी एकच संरक्षण दल प्रमुख नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला त्यामागचा प्रमुख उद्देश तीनही दलांमध्ये समन्वय ठेवला जावा आणि कोणतीही मोठी युद्ध मोहीम राबवताना त्याचे अधिक सकारात्मक परिणाम आपल्याला साधता यावेत हा त्यामागचा हेतू होता आणि तो यशस्वी होताना दिसून आलेला आहे. ही संरक्षण दल प्रमुख नियुक्तीची परंपरा यापूर्वी भारतीय संरक्षण दलामध्ये नव्हती. परंतु जागतिक स्तरावर जेवढे काही विकसित देश आहेत त्या सर्व विकसित देशांमध्ये अशा प्रकारच्या तिन्ही दलांचा समन्वय साधणारे एक संरक्षण दल प्रमुख असतात आणि त्यातून त्या देशांकडे राबवल्या जाणाऱ्या सगळ्या संरक्षण किंवा युद्धविषयक मोहिमा चांगल्या यशस्वी झाल्याचे हे उदाहरण पाहायला मिळते. भारताकडे आज जगातले सर्वात मोठे संरक्षण दल आहे. जवळपास विकसित देशांच्या पाठोपाठ भारताचे चौथे सक्षम असे संरक्षण दल म्हणून मान्यता मिळते. एकूण नौदल भूदल आणि हवाई दल या सर्वांचे मिळून भारताकडे आज किमान ११ लाखाचे सैन्य आहे या प्रत्येक दलासाठी स्वतंत्र प्रमुख जरी असला तरी एखादी मोठी मोहीम राबवताना या तिघांमध्ये समन्वय असणे अत्यंत गरजेचे ठरते अशाप्रकारे तिन्ही दलांसाठी एकच संरक्षण दल प्रमुख असावा, अशी मागणी किंबहुना असा विचार गेल्या दहा-पंधरा वर्षांपासून सुरू होता. परंतु त्याबाबत निर्णय होत नव्हता. मात्र २०१५ नंतर या विचाराने वेग घेतला आणि २०२१ मध्ये तशा प्रकारची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली. त्याचा पहिला मान हा बिपीन रावत यांना मिळाला होता त्यांच्या नेतृत्वाखाली या तिन्ही दलांमध्ये समन्वय साधण्यात मोठे यश मिळाले आणि संयुक्तपणे राबवल्या जाणाऱ्या मोहिमा या आपल्याला अधिक परिणामकारक करता येतील अशा प्रकारचा आत्मविश्वास प्राप्त झाला.

**जागतिक दर्जाचे दल**

ज्यावेळी पाकिस्तानकडून ऊरी आणि पठाणकोट इथल्या लष्करी तळांना टार्गेट केले गेले त्याला प्रत्युत्तर देण्याकरिता सरकारकडून सर्जिकल स्ट्राईक आणि एअर स्ट्राईकचा निर्णय घेतला गेला त्यावेळी बिपीन रावत यांच्या नेतृत्वाखाली या तिन्ही दलांच्या समन्वयातून एक यशस्वी मोहीम राबवण्यात आली होती. पाकिस्तानमध्ये अस्तित्वात असलेली दहशतवादाची तळे ही नेमकेपणाने उद्ध्वस्त होऊ शकली. कोणत्याही नागरी वस्तीवर हल्ला न करता केवळ दहशतवाद्यांची तळे अतिशय नेमकेपणाने उद्ध्वस्त करू शकलो. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या तिन्ही दलांमध्ये उत्तम पद्धतीचा समन्वय साधता आला होता. आता देखील ऑपरेशन सिंदूरमध्ये त्याचे परिणाम आपल्याला पाहायला मिळाले. तीनही दलांचा समन्वय साधला गेला म्हणूनच ऑपरेशन सिंदूर यशस्वी होऊ शकले आणि पाकिस्तानचे कंबरडे मोडण्यामध्ये भारताला यश मिळाले. या पदासाठी तितकाच अनुभवी आणि निर्णयक्षम अधिकारी असणे आवश्यक असते. आताचे नवे संरक्षण दल प्रमुख एन. एस. राजा सुब्रमणी हे गेले ४० वर्ष संरक्षण दलाच्या विविध पदांवर कार्यरत होते. नुकतेच ते निवृत्त झाले होते. त्यांच्याकडे बऱ्याच मोठ्या युद्ध मोहिमांचाही अनुभव आहे त्यांना मिळालेली अनेक पदे त्यामध्ये अतीविशिष्ट पदांचाही समावेश आहे. विशेष म्हणजे त्यांना विविध स्तरावरच्या लढ्यांचा आणि त्याच्या भौगोलिक क्षेत्राविषयीचा देखील अभ्यास आहे. त्यांच्या या अनुभवाचा निश्चितच फायदा होईल विशेषतः पाकिस्तान आणि चीनच्या विषयाचे ते तज्ज्ञ म्हणूनही ओळखले जातात. गेल्या वर्षी जुलै महिन्यामध्ये ते लष्कर उपप्रमुख म्हणून ते निवृत्त झाले होते आणि सध्या ते राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयाचे लष्करी सल्लागार म्हणून कामही करत होते.

**प्रदीर्घ अनुभवाचा लाभ**

इतका मोठा प्रदीर्घ अनुभव असलेले सुब्रमणी आता जर देशाचे तिसरे संरक्षण दल प्रमुख पदभार सांभाळणार असतील तर भारतासाठी ती एक मोठी उद्दिष्टपूर्ती ठरते. कारण गेल्या काही वर्षांमध्ये भारताने आपल्या तिन्ही दलांची सामर्थ्य शक्ती दुपटीने वाढवण्याचा निर्णय घेतलेला आहे. विशेषतः बदलत्या तंत्रज्ञानाचा पुरेपूर फायदा उठवण्यासाठी भारत सज्ज झालेला आहे. मग सायबर हल्ल्यापासून ते अत्याधुनिक अशा क्षेपणास्त्रांपर्यंत भारताच्या तिन्ही दलांमध्ये विविध प्रकारचे शस्त्रसामुग्री समाविष्ट केली जाते आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये वापरण्यात आलेली आणि तंत्रज्ञानावर आधारित ही सामग्री योग्य पद्धतीने शत्रूच्या ठिकाणांवर मारा करू शकली आणि लक्षवेध झाल्याने अतिशय कमी कालावधीत कमी मनुष्य आणि उत्तम पद्धतीचे यश मिळणारी मोहीम म्हणून ऑपरेशन सिंदूर आपल्याला राबवता आली. भारताचे हे वाढते शस्त्र सामर्थ्य आणि त्याला अनुरूप असे लष्करी नेतृत्व मिळणे तितकेच महत्त्वाचे ठरते. गेल्या काही वर्षांमध्ये भारताच्या या लष्करी सामर्थ्याची जगभर चर्चा होत असते आणि आता तीनही दलांचे एकच संरक्षण प्रमुख कार्यरत असल्याने जगाच्या विविध स्तरावर सुरू असणाऱ्या विरुद्ध विषयक अभ्यास युद्धविषयक अभ्यास आणि मोहिमांचाही अनुभव घेता येतो आणि त्याचा भारतासाठी उपयोग करून घेता येतो. भारताला मिळालेले हे नवे संरक्षण दल प्रमुख म्हणजे भारताच्या नव्या संरक्षण व्यवस्थेची अधिक आधुनिक आक्रमक सुरुवात आहे, असे म्हणायला काही हरकत नाही.

## सुविचार


**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

कानावर आलेली प्रत्येक गोष्ट मनावर घ्यायची नसते. नाहीतर त्याचा डोक्यावर विपरीत परिणाम होतो.

## पंचांग

**सोमवार, ११ मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**

* वैशाख कृष्ण नवमी
* नक्षत्र : शततारका



रवी उदय- ०६-०७
रवी अस्त- १९-०३

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० कुंभ

**सूर्य कृतिका सायं. ७.३०; जे. कृष्णमूर्ती जन्मदिन, राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०, जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१ ई-मेलः contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### मेथी मटर मलाई



★ **साहित्य :** १ कप मेथी, १/३ कप मटार, १/३ कप काजूची पेस्ट, १/२ कप कांद्याची पेस्ट, १/३ कप क्रीम, १ टेबल स्पून बेसन, १/२ टेबलस्पून आलं, लसूण, हिरवी मिरची पेस्ट, १ टिस्पून गरम मसाला, १/२ टीस्पून जीरे, १ तमालपत्र, मीठ चवीनुसार

★ **कृती:** प्रथम मेथी स्वच्छ धुऊन गॅसवर गरम पाण्यात दोन मिनिटे उकळून घेतली. मग त्यातील पाणी काढून ती लगेच थंड पाण्यात टाकली, असे केल्याने मेथीचा रंग हिरवागार राहतो. काजू गरम पाण्यात भिजत घालून त्याची पेस्ट करून घेतली. आलं हिरवी मिरची लसूण पेस्ट करून घेतली. बेसन भाजून घेतले.

आता गॅसवर कढईमध्ये साजूक तूप गरम करून त्यात जीरे, तेजपान, आलं लसूण मिरची पेस्ट, कांद्याची प्युरी घालून परतले. मग त्यात काजूची पेस्ट घालून परतल्यावर मेथी व थोडे पाणी घातले. त्यात गरम मसाला, मीठ घालून उकळल्यावर त्यात क्रीम घालून गॅस बंद केला. तयार मेथी मटर मलाई बाऊलमध्ये काढून सर्व्ह केली.

# आज पंजाब पुन्हा विजयी रथावर स्वार होणार

## धर्मशालामध्ये दिल्ली कॅपिटल्सला लढत देणार

**धर्मशाला येथील हिमाचल प्रदेश क्रिकेट स्टेडियममध्ये आज होणाऱ्या आयपीएलच्या ५५ व्या सामन्यात पंजाब किंग्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात लढत होणार आहे. गेल्या ३ सामन्यांत पराभूत झालेला पंजाब पुन्हा विजयी रथावर स्वार होण्यासाठी सज्ज झाला आहे. हा सामना जिंकण्यास पंजाब गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहोचेल. पंजाबला आयपीएलच्या प्लेऑफमध्ये जाण्यासाठी २ विजयांची आवश्यकता आहे. दिल्लीचा संघ याआधीच आयपीएलच्या प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडला. त्यामुळे दिल्ली हा सामना औपचारिकता म्हणून खेळणार आहे.**



■ धर्मशाला

**आयपीएलच्या** या हंगामात दिल्लीने खराब कामगिरी केलेली आहे. दिल्लीने आतापर्यंत ११ सामने खेळले आहेत. त्यातील ४ सामन्यांत दिल्लीने विजय मिळवला, तर ७ सामन्यांत पराभव झाला. परिणामी दिल्ली ८ गुणांसह गुणतालिकेत आठव्या स्थानावर आहे. पंजाबने १० सामन्यांत आपले नशीब आजमावले आहे. त्यातील ६ सामन्यांत विजय नोंदवला, तर ३ सामन्यांत पराभूत झाल्यामुळे पंजाब १३ गुणांसह गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर आहे. सलग तीन पराभवांनंतर पंजाब किंग्स दबावाखाली आहे आणि आता घरच्या मैदानावर पुनरागमन करण्याचा प्रयत्न करेल. संघ आपले शेवटचे तीन घरचे सामने धरमशाला येथे खेळेल. पंजाबचे सलामीवीर प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंग यांनी सुरुवातीच्या सामन्यात धडाकेबाज खेळी केली. गेल्या तीन सामन्यांत या जोडीला मोठी खेळी करण्यात अपयश आले.

पंजाबची लय पूर्णपणे हरवल्यासारखी दिसत आहे. हैदराबादविरुद्धच्या शेवटच्या सामन्यात विशेषतः झेल सोडल्यामुळे संघाचे क्षेत्ररक्षण अत्यंत खराब होते. संघाच्या फलंदाजांना संथ आणि फिरकीला साथ देणाऱ्या खेळपट्ट्यांवर संघर्ष करावा लागत आहे. स्टार फिरकी गोलंदाज कुलदीप यादवलाही या हंगामात आतापर्यंत प्रभाव पाडण्यात अपयश आले आहे. दिल्ली कॅपिटल्सप्रमाणेच, पंजाब किंग्सलाही खराब क्षेत्ररक्षणाचा सामना करावा लागत आहे. या हंगामात दोन्ही संघांनी अनेक सोप्या संधी गमावल्या आहेत, ज्याचा थेट परिणाम सामन्यांच्या निकालावर झाला आहे. त्यामुळे, धर्मशाला येथील सामन्यात लहान चुकादेखील सामन्याचा निकाल ठरवू शकतात.

## महाराष्ट्राच्या साहिल जाधवने कांस्यपदक पटकावले

■ शांघाय

**विद्यमान** विश्व विद्यापीठ क्रीडा स्पर्धेचा विजेता साहिल जाधवने तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत पुरुषांच्या कंपाऊंड प्रकारात कांस्यपदक जिंकले. विश्वचषकातील हे त्याचे पहिलेच पदक आहे.

महाराष्ट्राच्या या २५ वर्षीय तिरंदाजाने कांस्य पदकाच्या लढतीत डेन्मार्कच्या मार्टिन डान्सबोला १४७-१४४ ने पराभूत करून या चालू स्पर्धेतील भारताचे पहिले पदक पटकावले. ४० वर्षीय डान्सबोने तीन अचूक १० गुणांसह सुरुवात केल्यामुळे पहिल्या सेटनंतर जाधव एका गुणाने मागे होता. पण दुसऱ्या सेटमध्ये या भारतीय खेळाडूने अचूक ३० गुण मिळवले, तर डान्सबोला केवळ २७ गुण मिळवता आले. यामुळे जाधवने ५९-५७ अशी एकूण आघाडी घेतली.

## मुंबई पालिकेचे अजय लालवानी माऊंट एव्हरेस्ट सर करण्याचे ध्येय

■ मुंबई

**मुंबई** पालिकेच्या वॉटर डिपार्टमेंटमध्ये नऊ वर्षांपासून सुपरवायझर म्हणून कार्यरत असलेल्या अजय लालवानी यांनी नुकताच माऊंट एव्हरेस्ट बेस कॅम्पचा यशस्वी ट्रेक पूर्ण केला आहे. त्यांनी ५,३६४ मीटर उंचीवरील एव्हरेस्ट बेस कॅम्प अवघ्या दहा दिवसांत पूर्ण करून नवा इतिहास घडवला.

अजय लालवानी यांचे पुढील ध्येय म्हणजे जगातील सर्वोच्च शिखर असलेला माऊंट एव्हरेस्ट सर करणे आहे. यासाठी त्यांनी मुंबई महापालिका आणि महाराष्ट्र शासनाकडे आर्थिक मदतीची विनंती केली आहे. या मोहिमेसाठी लागणारा संपूर्ण खर्च शासन आणि सामाजिक संस्थांच्या माध्यमातून मिळावा, जेणेकरून मी भारतासाठी आणि महाराष्ट्रासाठी आणखी मोठी कामगिरी करू शकेन, असे अजयचे म्हणणे आहे. त्यांनी सायकलिंगमध्ये मुंबई-काश्मीर-कन्याकुमारी-मुंबई असा सुमारे ७,५०० किलोमीटरचा प्रवास अवघ्या ४५ दिवसांत पूर्ण केला आहे.

## महिला टी-२० विश्वचषकासाठी बांगलादेश संघाची घोषित

■ ढाका

**इंग्लंडमध्ये** १२ जून ते ५ जुलै दरम्यान होणाऱ्या आयसीसी महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी बांगलादेश क्रिकेट बोर्डाने आपला संघ जाहीर केला. निगार सुलताना सलग तिसऱ्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत बांगलादेशचे नेतृत्व करेल. आघाडीची फलंदाज ताज नेहरचे बांगलादेश संघात पुनरागमन झाले, तर नुकतीच श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेत खेळलेल्या सरमिन सुलतानाला संघातून वगळण्यात आले आहे.

मुख्य निवडकर्ता सज्जाद अहमद यांनी सांगितले की, नेहरला तिच्या अष्टपैलू कामगिरीमुळे सरमिनऐवजी पसंती देण्यात आली. नेहर फलंदाजीच्या क्रमात १ ते ६ क्रमांकापर्यंत फलंदाजी करू शकते. तिच्यामध्ये शेवटच्या षटकांमध्ये वेगाने धावा करण्याची क्षमता आहे. २०२३ आणि २०२४ च्या हंगामात संघाचे नेतृत्व करणाऱ्या निगार सुलतानाच्या संघात यावेळी तरुण आणि अनुभवी खेळाडूंचे मिश्रण आहे. अनुभवी खेळाडूंमध्ये फहिमा खातूनचा समावेश आहे, जी आपला सातवा टी-२० विश्वचषक खेळण्यासाठी सज्ज आहे. फहिमा व्यतिरिक्त, नाहिदा अख्तर, रितू मोनी आणि कर्णधार निगार २०१६ पासून संघाचा भाग आहेत. सध्याच्या संघात युएईमध्ये झालेल्या २०२४ च्या टी-२० विश्वचषकात खेळलेल्या ११ खेळाडूंचा समावेश आहे.



**महिला बांगलादेश संघ**

निगार सुलताना (कर्णधार आणि यष्टीरक्षक), नाहिदा अख्तर (उपकर्णधार), शर्मीन अख्तर, शोभना मोस्तारी, शोरना अख्तर, रितू मोनी, राबेया खान, फहिमा खातून, फरीहा इस्लाम, मारुफा अख्तर, शांझील अख्तर, एस. (यष्टीरक्षक), जुएरिया फिरदौस, ताज नेहर.

## बांगलादेशने पाकिस्तानचा डाव ३८३ धावांवर गुंडावला

■ मीरपूर

**मीरपूरमध्ये** सुरू असलेल्या २ कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्याच्या तिसऱ्या दिवसाअखेर आज पाकिस्तानवर बांगलादेशने ३४ धावांची आघाडी घेतली. बांगलादेशचा पहिला डाव ४३१ धावांवर आटोपला होता. या प्रत्युत्तरात पाकिस्तानला ३८६ धावा करता आल्यामुळे बांगलादेशने पहिल्या डावात २७ धावांची आघाडी घेतली होती. त्यानंतर दिवसाअखेर बांगलादेशने बिनवाद ७ धावा केल्या होत्या.

पाकिस्तानकडून अजान अवैसने १०३, इमाम-उल-हक ४५, सलमान आगा ५८, अब्दुल्ला फजल ६०, मोहम्मद रिझवान ५९ धावा केल्या. पाकिस्तानचा कर्णधार शान मसूदला मोठी खेळी करता आली नाही. बांगलादेशचा गोलंदाज मेहिदी हसन मिराझने ५ गडी बाद केले, तर तैजुल इस्लाम व तस्किन अहमदने प्रत्येकी २-२ आणि नाहिद राणाने १ विकेट घेतले.

## विश्वचषक तिरंदाजी स्पर्धेत भारतीय महिला संघाला सुवर्ण

■ शांघाय

**विश्वचषक** तिरंदाजी स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात भारताच्या महिला संघाने उत्कृष्ट कामगिरी करत यजमान चीनला पराभूत करून सुवर्णपदक पटकावले. शांघाय येथे झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताने चीनला ५-४ (२८-२६) अशा चुरशीच्या शूट-ऑफमध्ये पराभूत केले. या विजयासह भारताने २०२१ नंतर आपले पहिले तिरंदाजी विश्वचषक सुवर्णपदक जिंकले.

अंतिम सामन्यापूर्वी भारतीय संघाने उपांत्य फेरीत १० वेळच्या ऑलिम्पिक चॅम्पियन दक्षिण कोरियाला पराभूत करून एक मोठा उलटफेर घडवला होता. या विजयाने भारताचा आत्मविश्वास आणखी वाढवला. कोरियासारख्या बलाढ्य संघाला पराभूत केल्यानंतर, भारताने अंतिम सामन्यात चीनला हरवून आपली ताकद सिद्ध केली.

## अमेरिकेचा बुद्धिबळपटू हान्स मोके नीमन विजेता

■ वॉर्सा

**अमेरिकेचा** हान्स मोके नीमनने शेवटपर्यंत संयम राखत ग्रँड चेस टूरचा भाग असलेली सुपर रॅपिड आणि ब्लिट्झ स्पर्धा जिंकली. भारताचा विश्वविजेता डी. गुकेशला सहाव्या स्थानावर समाधान मानावे लागले.

गुकेशने ३६ पैकी १७ गुण मिळवून आपली मोहीम पूर्ण केली. खेळाडूंनी नऊ रॅपिड आणि १८ ब्लिट्झ सामने खेळले. प्रत्येक रॅपिड सामन्याला दोन गुण, तर ब्लिट्झ सामन्याला एक गुण होता. गुकेशने रॅपिडमध्ये नऊ आणि ब्लिट्झमध्ये आठ गुण मिळवले. परिस्थिती याहून वाईट होऊ शकली असती, पण शेवटच्या फेरीत पोलंडच्या डुडा जान-क्रिस्टॉफला पराभूत करून गुकेशने जोरदार पुनरागमन केले. गुकेशने मुख्य ग्रँड चेस टूर स्पर्धांमधून माघार घेतली असून तो यावर्षी केवळ रॅपिड आणि ब्लिट्झ प्रकारातच खेळणार आहे. सर्वात तरुण विश्वविजेता असलेला गुकेश या वर्षाच्या उत्तरार्धात नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत तसेच अमेरिकेच्या झावोखिर सिंदारोव्हविरुद्ध विश्व अजिंक्यपदाच्या सामन्यात खेळणार आहे. अंतिम दिवशी गुकेशने अमेरिकन खेळाडू वेस्ली सो, नीमन आणि डुडा यांना हरवून तीन विजय मिळवले.



## ऑस्ट्रेलियाच्या ५ खेळाडूंनी करारवर स्वाक्षरी केली नाही

**सिडनी** -ऑस्ट्रेलियाच्या पाच वरिष्ठ खेळाडूंनी अद्याप त्यांच्या नवीन सेंट्रल कॉन्ट्रॅक्टवर स्वाक्षरी केलेली नाही. याचे मुख्य कारण म्हणजे करारात मिळणारी रक्कम आणि परदेशी टी-२० लीगमध्ये खेळण्यासाठी मिळणारी मर्यादित संधी आहे. त्यासोबत खेळाडूंची मागणी आहे की त्यांना परदेशी लीगमध्ये खेळण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र सहज मिळावे.

आयपीएल, एसए २० आणि आयएलटी २० सारख्या लीग खेळाडूंना करोडो रुपये देऊ करत आहेत. त्यामुळे अनेक खेळाडू आता आपल्या करिअर आणि कमाईसाठी नवीन रणनीती आखत आहेत.

# सुख शांती समाधान

**वैशाख अमावास्या हा पितरांच्या स्मरणासाठी अत्यंत महत्त्वाचा दिवस मानला जातो. या दिवशी पितृ तर्पण, दान आणि पूजा केल्याने पितरांना शांती मिळते व त्यांचे आशीर्वाद लाभतात. हिंदू धर्मात पूर्वजांचे स्मरण करण्यासाठी आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या दिवशी पितरांचे आशीर्वाद मिळवण्यासाठी आणि मानसिक शांतीसाठी खालील गोष्टी कराव्यात. अमावास्या हा सर्वात शक्तिशाली दिवस आहे, जो पूर्वज किंवा पूर्वजांच्या उपासनेसाठी समर्पित आहे आणि लोक सहसा हा दिवस एक संधी म्हणून घेतात जेव्हा ते त्यांच्यासाठी प्रामाणिक प्रार्थना करू शकतात आणि त्यांच्या उद्धारासाठी काहीतरी करू शकतात. या विशिष्ट दिवशी ते विविध धार्मिक आणि आध्यात्मिक कार्य करतात.**





## वैशाख अमावास्येला करा हे उपाय...

**वैशाख** अमावास्येला पांडवांची अवस किंवा भावुका अमावास्या या नावांनीही ओळखले जाते.

हिंदू कॅलेंडरनुसार अमावास्या दर महिन्याला येते, ही सर्वात गडद रात्र. या महिन्यात, १७ मे, २०२६ रोजी वैशाख अमावास्या साजरी केली जात आहे.

या दिवशी लोकांनी कोणतेही शुभ कार्य करू नये. लग्न, साखरपुडा, हाऊस वॉर्मिंग पार्टी, मुंडण यासारखे उपक्रम आणि नवीन वाहन खरेदी करणे देखील टाळा.

आम्ही अनेकदा खरेदीसाठी जाण्यापूर्वी पंचांग आणि दिवस तपासत नाही परंतु तुम्ही या मार्गदर्शक तत्त्वाचे पालन केले पाहिजे आणि या विशिष्ट दिवशी कधीही खरेदीसाठी जाऊ नका कारण हा दिवस पूर्वजांना समर्पित आहे म्हणून एखाद्याने ते करणे टाळले पाहिजे.

नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी हा दिवस अशुभ मानला जातो त्यामुळे तुम्ही हे लक्षात ठेवावे.

अमावास्याच्या दिवशी नवीन काम सुरू करण्याचा सल्ला दिला जात नाही. हा दिवस पूर्वजांचा सन्मान करण्यासाठी समर्पित आहे म्हणून एखाद्याने काही विधी केले पाहिजे जे त्यांच्या मोक्षासाठी उपयुक्त आहेत.

तुम्ही ब्राह्मणांना घरी बोलावून त्यांना अन्नदान करा, त्यांना वस्त्रे, पादुका आणि दक्षिणाही द्या. मुंग्या, कुत्रा, कावळे आणि गायींना खायला द्यावे. यामुळे आपण पितृदोषापासून मुक्त होऊ.

नवीन कपडे आणि चपला घेणेदेखील टाळले पाहिजेत.

अन्न तयार केल्यानंतर पहिली चपाती काढून गायीला द्यावी. पिंपळाच्या झाडाखाली दिवा लावावा. यामुळे शनिचा वाईट प्रभाव कमी होईल.

सकाळी स्नान करून सूर्याला अर्घ्य द्यावे आणि पिंपळाच्या झाडाची पूजा करावी. तसेच काळे तीळ टाकून पाण्याचे अर्पण करणे शुभ मानले जाते.

शक्य असल्यास पवित्र नदीत स्नान करावे, अन्यथा घरच्या पाण्यात गंगाजल मिसळून स्नान करावे. त्यानंतर स्वच्छ वस्त्र परिधान करून भगवान विष्णू आणि लक्ष्मी देवीची पूजा करावी. पितरांच्या स्मरणार्थ तर्पण करणे हा या दिवसाचा मुख्य भाग आहे. तर्पण करताना तांब्याच्या भांड्यात पाणी घेऊन त्यात काळे तीळ, कुशा आणि अक्षता टाकून दक्षिण दिशेकडे तोंड करून पितरांचे स्मरण करत पाणी अर्पण केले जाते. हा विधी केल्याने पितरांना शांती मिळते आणि ते आपल्या कुटुंबाला आशीर्वाद देतात.

वैशाख अमावास्येला दानधर्माला विशेष महत्त्व आहे. या दिवशी अन्न, वस्त्र, पाणी, गूळ, तांदूळ, तीळ आणि इतर आवश्यक वस्तूंचे दान करणे अत्यंत पुण्यकारक मानले जाते. विशेषतः पाण्याने भरलेला घडा दान करणे हे महादान समजले जाते, कारण हा काळ उन्हाळ्याचा असल्याने तहानलेल्या लोकांना पाणी देणे हे अत्यंत पुण्याचे कार्य आहे. याशिवाय गरजूंना अन्नदान करणे, पक्ष्यांना अन्न-पाणी देणे, तसेच गरीबांना मदत करणे हे देखील या दिवशी करणे योग्य मानले जाते.

या सर्व गोष्टी केल्याने पितर तृप्त होतात आणि कुटुंबात सुख-समृद्धी वाढते. या दिवशी काही विशेष उपाय केल्यास पितृदोष कमी होतो असे मानले जाते.

संध्याकाळी दक्षिण दिशेला दिवा लावणेही महत्त्वाचे आहे, कारण दक्षिण दिशा पितरांची दिशा मानली जाते.

या दिवशी पिंडदान आणि श्राद्ध विधी केल्याने पितरांना शांती मिळते आणि त्यांच्या आत्म्यांना मोक्ष प्राप्त होतो. तसेच घरात सात्विक वातावरण ठेवणे, जप-तप करणे आणि भगवान विष्णूचे नामस्मरण करणे यालाही विशेष महत्त्व आहे.

या अमावास्येला गायीला दही-भात किंवा हिरवा चारा भरवणे शुभ मानले जाते, ज्यामुळे मानसिक शांती मिळते.

या दिवशी महादेवाला कच्च्या दुधाने, पाण्याने किंवा बेलपत्राने अभिषेक केल्याने पितृदोष दूर होतात आणि अडथळे दूर होतात.

## शनि जयंतीला शनिदेवाला प्रसन्न करण्यासाठी हे करा...

शनि जयंतीला शनिदेवाला प्रसन्न करण्यासाठी हे करा... ज्योतिष शास्त्रात शनिदेवाला विशेष महत्त्व आहे. शनी व्यक्तीला कर्माच्या आधारे फळ देतो, म्हणून शनिला न्याय देवता म्हटले जाते. कुंडलीतील शनिच्या स्थितीचा परिणाम हा व्यक्तीच्या जीवनावर नेहमी होत असतो.

यंदा शनिवार १७ मे रोजी शनि जयंती आहे.

हा दिवस शनिदेवाला प्रसन्न करण्यासाठी खास आहे. आपल्यावर सतत येणारी संकटे कमी करण्यासाठी, तसेच साडेसाती दूर करण्यासाठी या दिवशी शनिदेवाची विधीवत पूजा केली जाते. तसेच, शनिची पिडा दूर करण्यासाठी शनि जयंतीच्या दिवशी काही खास उपाय केले जातात.

शनि जयंतीला तिळाच्या तेलाचे किंवा मोहरीच्या तेलाचे दिवे लावा.

शनि जयंतीच्या दिवशी संध्याकाळी पिंपळाच्या झाडाखाली ५ तिळाच्या तेलाचे किंवा मोहरीच्या तेलाचे दिवे लावावेत आणि हात जोडून सात परिक्रमा कराव्या.

हनुमान मंदिरातही दिवे लावा. शनिच्या साडेसातीने प्रभावित झालेल्या व्यक्तींनी हनुमान मंदिरात जाऊन हनुमानासमोर चमेलीच्या तेलाचा दिवा लावावा आणि सुंदरकांड किंवा हनुमान चालिसाचे पठण करावे. असे केल्याने शनिदोषापासून मुक्ती मिळते आणि जीवनात चालू असलेल्या समस्यांपासून आराम मिळतो, सर्व समस्या दूर होतात.

शनि जयंतीच्या दिवशी संध्याकाळी एक नारळ घेऊन ते सात वेळा स्वत:वरुन फिरवा आणि मग तो वाहत्या पाण्यात सोडा. यासोबतच काळी उडीद बारीक करून पिठाचे गोळे बनवून संध्याकाळी माशांना खायला द्या, असे केल्याने शनिची पिडा दूर होते. हळूहळू सर्व समस्यांपासून मुक्ती मिळते.

सुख आणि सौभाग्य वाढवण्यासाठी संध्याकाळी घराच्या मुख्य प्रवेशद्वारावर मोहरीच्या तेलाचा दिवा लावा. तसेच शनि मंदिरात जाऊन शनिदेवाला काळे तीळ आणि मोहरीचे तेल अर्पण करा. यानंतर शनि स्तोत्र आणि शनि चालीसा पठण करा आणि गरीब आणि गरजू लोकांना काहीतरी दान करा. असे केल्याने शनिदेवाची कृपा राहील आणि कुटुंबातील सदस्यांचीही प्रगती होईल.

जर तुम्हाला शनि जयंतीला सकाळी सावली दान करता येत नसेल तर संध्याकाळीही करू शकता. यासाठी पितळेच्या किंवा लोखंडाच्या भांड्यात मोहरीचे तेल घ्या आणि त्यात एक नाणे टाका. त्यानंतर त्यात तुमचा चेहरा दिसल्यानंतर ते तेल वाटीसोबत शनि मंदिरात किंवा गरजू व्यक्तीला द्या. असे केल्याने तुम्हाला शुभ परिणाम मिळतील आणि शनिदेवाच्या कृपेने तुम्हाला आर्थिक समस्यांपासून आराम मिळेल.

जीवनातील सर्व समस्यांपासून मुक्ती मिळवण्यासाठी शनिजयंतीच्या संध्याकाळी काळ्या कुत्र्याला मोहरीच्या तेलातील चपाती किंवा भाकरी खाऊ घाला, असे केल्याने शनिदोष दूर होतो आणि जर तुमच्या



जीवनात कोणतेही मोठे संकट येणार असेल तर तेही दूर होते. काळ्या कुत्र्याला भाकरी दिल्याने शनि आणि राहूचा अशुभ प्रभाव कमी होतो.

या दिवशी सकाळी सूर्योदयाच्या वेळी नदीत स्नान करणे आणि पूजा-पाठ करणे अधिक शुभ आहे.

या दिवसांत अमावास्येला अशा गोष्टी दान करा ज्यामुळे लोकांना उष्णतेपासून आराम मिळेल. या अमावास्येला तुम्ही छत्री, बूट, चप्पल, कपडे आणि पाणी दान करू शकता. अमावास्या ही तिथी पूर्वजांसाठी खूप शुभ मानली जाते. विशेषत: ज्येष्ठा अमावास्येला पाणी, तर्पण आणि पिंडदान करून पितरांना संतुष्ट करण्याचा दिवस मानला जातो.

**टीप-** या लेखात सांगितलेले उपाय, सल्ले हे केवळ धार्मिक श्रद्धांवर आधारित असून दै. 'नवाकाळ' त्याचे समर्थन करत नाही.

# हरणेश्वर साखर कारखाना प्रकरणात चौकशी! सात सदस्यीय समिती नेमली

■ पुणे

**पुणे** जिल्ह्यातील कडबनवाडी येथील हरणेश्वर साखर कारखाना प्रकरणात कथित आर्थिक अनियमिततेची चौकशी करण्यासाठी राज्य शासनाने सात सदस्यीय समिती नेमली आहे. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या आदेशानुसार पुण्याचे साखर आयुक्त या समितीचे अध्यक्ष असतील. समितीला तातडीने चौकशी करून एका महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

२००० मध्ये परिसरातील सुमारे १२,५०० शेतकऱ्यांनी एकत्र येत ऊस व बीटापासून साखर तसेच इथेनॉल निर्मितीसाठी हा कारखाना उभारण्याचा निर्णय घेतला होता. यासाठी सुमारे १२ कोटी रुपयांचे भागभांडवल उभे करण्यात आले आणि जवळपास २०० एकर जमीन खरेदी करण्यात आली. बँकेकडून सुमारे ४५ कोटी रुपयांचे कर्जही घेण्यात आले. सुरुवातीला कारखाना सुरू झाला, मात्र नंतर आर्थिक आणि प्रशासकीय अडचणींमुळे तो अडचणीत सापडला. कारखाना वाचवण्यासाठी व्यवस्थापन आणि गुंतवणुकदारांकडून वन टाइम सेटलमेंटअंतर्गत ८२ कोटी रुपयांचा प्रस्ताव देण्यात आल्याचा दावा आहे. हा प्रस्ताव फेटाळून अवसायकांकडून केवळ १३ कोटी रुपयांत लिलाव प्रक्रिया सुरू करण्यात आल्याचा आरोप केला जात आहे. या प्रकरणात २०२५ मध्ये मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आलेल्या तक्रारीनंतर सहकार विभागाने अखेर चौकशी समिती नेमण्याचा निर्णय घेतला.

या निर्णयाचे स्वागत करत भाजपा नेते व तक्रारदार माउली चवरे यांनी गंभीर आरोप केले आहेत. ते म्हणाले की, शेतकऱ्यांच्या मालकीचा सुमारे ३०० कोटी रुपये बाजारमूल्य असलेला कारखाना अवघ्या १३ कोटी रुपयांत विकण्याचा प्रयत्न झाला. चौकशीतून सत्य बाहेर येईल.

# सिल्लोडमध्ये विहिरीत मातीचा ढिगारा कोसळला! वडील व २ मुलांचा मृत्यू

■ छत्रपती संभाजीनगर

**छत्रपती** संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यात धानोरा गावात विहिरीच्या कामादरम्यान अचानक मातीचा ढिगारा खचल्याने दोन तरुण मुलांसह वडिलांचा मृत्यू झाला. यामध्ये बाजीराव काकडे (५५), आजिनाथ काकडे (२५), शाम काकडे (२२) यांचा समावेश आहे. या घटनेने संपूर्ण गाव हादरले असून काकडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.

धानोरा येथील बाजीराव काकडे यांच्या शेतात नवीन विहिरीचे काम सुरू होते. शेतीसाठी पाण्याची सोय व्हावी आणि शेती अधिक चांगली फुलावी यासाठी काकडे कुटुंब गेल्या काही दिवसांपासून विहिरीचे काम करत होते. काल रात्री विहिरीत पाणी साचल्याने ते बाहेर काढण्याचे काम सुरू होते. यावेळी बाजीराव काकडे यांच्यासह त्यांचे दोन्ही मुलगे आजिनाथ आणि शाम विहिरीच्या काठावर उभे होते.

कामादरम्यान, विहिरीच्या काठाची माती भुसभुशीत झाल्याने मातीचा ढिगारा विहिरीत कोसळला आणि तिघेही बाप-लेक त्याखाली दबले गेले. अचानक घडलेल्या या दुर्घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. रात्रीची वेळ असल्याने मदतकार्य करताना अडचणी निर्माण झाल्या. गावकऱ्यांनी आणि नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली. मोठ्या प्रयत्नांनी मातीचा ढिगारा हटवून तिघांना बाहेर काढले. मात्र, तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता.

**राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण अहमदाबाद खंडपीठ-I**
पहिला व दुसरा मजला, कॉर्पोरेट भवन, झायडस हॉस्पिटलच्या शेजारी,
एस. जी. हायवे, थलतेज, अहमदाबाद - 380059
फोन : (079) 2685 4591,ईमेल:courtofficer-ahm@nclt.gov.in
पुढील सुनावणीच्या तारखेची सार्वजनिक सूचना
**IA/69(AHM)2025 in Co. Appeal 77 of 2020**
**मेहुल आय, शाह**
वि/विरुद्ध
**युनायटेड फॉस्फोरस लिमिटेड व इतर**
**NCLT/AHM/Pub/IA/69(AHM)2025 in Co. Appeal 77 of 2020/1021/2026**

राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण निगम, 2016 मधील नियम 11 अंतर्गत श्री. मेहुल आय. शाह यांनी अर्ज दाखल केला होता. सदर अर्जाची सुनावणी दिनांक 23.04.2026 रोजी घेण्यात आली होती आणि आता सदर अर्जाची पुढील सुनावणी माननीय न्यायाधिकरण, एनसीएलटी अहमदावाद यांच्यासमोर दिनाक 18.06.2026 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

माननीय न्यायाधिकरणाने दिनांक 23.04.2026 रोजी दिलेल्या आदेशानुसार, प्रतिवादी एमयूएफजी इंटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (R-2) आणि रंभाबेन वसंतराय संघवी (R-3) यांना याद्वारे निर्देश देण्यात येतात की, त्यानी 18.06.2026 रोजी सकाळी 10.30 वाजता राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, अहमदाबाद खंडपीठ-I समोर स्वत:, किंवा संचालक, किंवा अधिकृत प्रतिनिधी, किंवा आपल्या वतीने विधिवत नियुक्त केलेल्या वकील अथवा व्यावसायिकामार्फत हजर राहावे.

प्रकाशनाच्या तारखेपासून, आपले उत्तर (असल्यास) प्रत्यक्ष स्वरुपात तसेच ई-मोडद्वारे दाखल करावे आणि त्याची आगाऊ प्रत विरोधी पक्षास देण्यात यावी.

ही नोंद घ्यावी की, नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण उपस्थित राहण्यात कसूर केल्यास, संबंधित प्रकरण आपल्या अनुपस्थितीत कायदानुसार ऐकून त्यावर निर्णय देण्यात येईल.

न्यायालय अधिकारी, एनसीएलटी अहमदाबाद खंडपीठ-I यांच्या आदेशानुसार
**धीरज गर्ग**(अधिवक्ता)
L 502, शिवारिक पार्क व्ह्यू - 2, शेला, अहमदाबाद - 380058
avdgdarg@gmail.com
दिनांक: ११/०५/२०२६
स्थळ: मुंबई

# तिहेरी तलाक पतीविरोधात गुन्हा

■ नागपूर

**मुलगी** जन्माला आल्याच्या कारणावरून विवाहितेचा मानसिक आणि शारीरिक छळ करून तिला तोंडी तिहेरी तलाक दिल्याचा धक्कादायक प्रकार इतवारी -मस्कासाथ परिसरात उघडकीस आला आहे. या प्रकरणी तहसील पोलिसांनी पती इम्रानशेख आणि सासू सईदा बेगम विरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. तक्रारीनुसार, पीडित महिलेचा विवाह ३१ मे २०२४ रोजी जाफरनगर येथील एलन व्हिला येथे मुस्लीम पद्धतीने इम्रानसोबत झाला होता. महिलेचे हे पहिले, तर इम्रानचे दुसरे लग्न असल्याचे उघड आहे. विवाहानंतर काही काळ सर्व काही सुरळीत होते. मात्र, ऑगस्ट २०२५ मध्ये मुलगी जन्माला आल्यानंतर घरातील वातावरण बदलल्याचा आरोप आहे.

**महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई**
कार्यालय :-जुने सचिवालय, २रा मजला, फोर्ट, मुंबई ३२
दूरध्वनि क्रमांक ०२२-२२८४४६३४ Email: registrarmrt@yahoo.in
क्र. अध्यक्ष/टेनन्सी/आरईव्ही/ठाणे/एल-६६०/२०२५ दिनांक :-०८/०४/२०२६
प्रति,
**७. श्रीम. पांचाली श्रेयश रेंजू,** रा. बी/३/५०३, सिल्वर ओक, कल्याणी नगर, पुणे-४११०१४ **८. श्री पराग पद्मन दाभोळकर,** रा. बी/२९ युनिट पार्क, शरणपूर रोड, नाशिक- ४२२००५. **१०. श्री. गुरुनाथ जयवंत दाभोळकर ११. श्री. नकुल गुरुनाथ दाभोळकर १२. श्री. वसंत गुरुनाथ दाभोळकर,** क्र. १० व १२ रा शंकर निवास, ३रा मजला, डी-११, आगाशे पथ, दादर, मुंबई-४०००२८ **१४. श्री राजेंद्र यशवंत साडेकर,** रा. श्रमसाफल्य, गोविद निवास जवळ, पंडीत दिनदयाळू मार्ग, डोंबिवली (प), ता. कल्याण, जि. ठाणे **१६. श्रीम. रती मधुकर वागळे १७. श्रीम. भक्ती मधुकर वागळे,** क्र. १६ आणि १७ दोन्ही रा. पाटुंगा प्लाझा, बंगलो नं.१, फेज नं. ३, मनोहर हॉटेलजवळ, कात्रज, पुणे **१९. श्रीमती. मेनका शुभदा शिरगोपीकर,** रा सी/४, विश्वनाथ सीएचएस लिमिटेड, टाकाळा, कोल्हापूर **२१. श्रीम. राधिका @ सुषमा राजेंद्र कोरे,** रा. ४३/बी, मेमून अपार्टमेंट, पालखी गल्ली, वीर सावरकर रोड, प्रभादेवी, मुंबई-४०००२५. **२२. श्रीमती विद्या अश्विनकुमार २३. श्री. जगदीश दिगंबर मुझुमदार २४. श्री. दीपक दिगंबर मुझुमदार २५. राजेश दिपक मुझुमदार,** नं. २२ ते २५ सर्व सिटिझन अपार्टमेंट, ३. टी.पी.एस, वांद्रे (पश्चिम), मुंबई-४०००५०, **२८. श्रीम. विमल सुमित्रा वागळे उर्फ विमलाबाई दिगंबर वागळे २९. श्रीम. शालीनी अरविद वागळे ३०. श्रीम. वनिता अरविद वागळे,** क्र. २८ ते ३० सर्व रा. कुलभूषण, ब्लॉक क्रमांक २०, केळुस्कर रोड, शिवाजी पार्क, मुंबई- ४०००२८.
**विषय :- सुनावणी नोटीसबाबत.**
**श्री. गोपीनाथ नामदेव पाटील (मवा) श्री. शशिकांत गोपीनाथ पाटील,** रा. पाटील पॅलेस बिल्डींग, रुम नं. २, साबेगाव, दिवा (पू), ता. जि. ठाणे व इतर यांनी उपविभागीय अधिकारी ठाणे यांचेकडील टेनन्सी अपील क्र. ०००९५/२०२३ दि. ०३/०९/२०२५ च्या आदेशाच्या अनुषंगाने आपल्या विरुध्द दाखल केलेल्या अपील अर्जाची सुनावणी **दिनांक १५/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता** न्यायाधिकरणापुढे खालील पत्यावर करण्याचे निश्चित केले आहे याची समज घ्यावी. पुढील सुनावणी तारखेस तुम्ही जातीने किंवा प्राधिकृत प्रतिनिधी किंवा वकिला मार्फत न्यायाधिकरणापुढे हजर झाला नाहीत, तर न्यायाधिकरण सदरहू अर्जाची एकतर्फी सुनावणी करील व त्या संबंधात योग्य तो आदेश दईल.
सुनावणीचे ठिकाण:- महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण, मुंबई यांचे कार्यालय, जुने सचिवालय, विस्तार इमारत, २ रा मजला, फोर्ट, मुंबई-३२
सही/-
**प्रबंधक**
महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण
मुंबई

**महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई**
कार्यालय :-जुने सचिवालय, २रा मजला, फोर्ट, मुंबई ३२
दूरध्वनि क्रमांक ०२२-२२८४४६३४ Email: registrarmrt@yahoo.in
क्र. अध्यक्ष/टेनन्सी/आरईव्ही/ठाणे/एल-६५९/२०२५ दिनांक :-०८/०४/२०२६
प्रति,
**श्रीमती शांतीबाई सीताराम पाटील (दिवंगत) श्री. मनोहर सीताराम पाटील (दिवंगत) कायदेशीर वारस जी) श्रीमती सरस्वती रघुनाथ पाटील एच) श्रीमती लीला बाळकृष्ण जोशी,** सर्व रा, शांती निवास, साबेगाव, दिवा, तालुकाः जिल्हा: ठाणे. **४. श्रीमती. पांचाली श्रेयश रेणूज,** रा. बी/३/५०३, सिल्व्हर ओक, कल्याणी नगर, पुणे-४११०१४. **५. श्री पराग पद्मन दाभोळकर,** रा. बी/२९ युनिट पार्क, शरणपूर रोड, नाशिक- ४२२००५. **७. श्री. नकुल गुरुनाथ दाभोळकर ८. श्री. वसंत गुरुनाथ दाभोळकर,** क्र. ७ व ८ रा शंकर निवास, ३रा मजला, डी-११, आगाशे पथ, दादर, मुंबई-४०००२८ **९. श्री. राजेंद्र यशवंत साडेकर,** रा. श्रमसाफल्य, गोविद निवास जवळ, पंडीत दिनदयाळ मार्ग, डोंबिवली (प), ता. कल्याण, जि. ठाणे **१०. श्रीम. रती मधुकर वागळे ११. श्रीम. भक्ती मधुकर वागळे,** क्र. १० आणि ११ दोन्ही रा. पाटुंगा प्लाझा, बंगलो नं.१, फेज नं.३.मनोहर हॉटेलजवळ, कात्रज, पुणे **१२. श्रीमती मेनका शुभदा शिरगोपीकर,** रा. सी/४, विश्वनाथ सीएचएस लिमिटेड, टाकाळा, कोल्हापूर **१४ श्रीमती राधिका @ सुषमा राजेंद्र कोरे,** रा. ४३/बी, मेमून अपार्टमेंट, पालखी गल्ली, वीर सावरकर रोड, प्रभादेवी, मुंबई-४०००२५. **१५. श्रीमती विद्या अश्विन कुमार १६. श्री. जगदीश दिगंबर मुझुमदार १७. श्री. दीपक दिगंबर मुझुमदार,** नं. १५ ते १८, सर्व सिटिझन अपार्टमेंट, ३, टी.पी.एस, वांद्रे (पश्चिम), मुंबई-४०००५०, **१९. श्रीम. विमलाबाई उर्फ सुमित्रा अरविंद वागळे २०. श्रीम. शालीनी अरविंद वागळे २१. श्रीम. वनिता अरविंद वागळे २२. श्रीम. समीश्रा अरविंद वागळे २३. श्री. कैलाश अरविंद वागळे,** क्र. १९ ते २३ सर्व प्रमुख आहेत, सर्व रा. कुलभूषण, ब्लॉक क्रमांक २०, केळुस्कर रोड, शिवाजी पार्क, मुंबई- ४०००२८.
**विषय :- सुनावणी नोटीसबाबत.**
**श्री. गोपीनाथ नामदेव पाटील (मवा) श्री. शशिकांत गोपीनाथ पाटील,** रा. पाटील पॅलेस बिल्डींग, रुम नं. २, साबेगाव, दिवा (पू), ता. जि. ठाणे व इतर यांनी उपविभागीय अधिकारी ठाणे यांचेकडील टेनन्सी अपील क्र. ०००९२/२०२३ दि. ०३/०९/२०२५ च्या आदेशाच्या अनुषंगाने आपल्या विरुध्द दाखल केलेल्या अपील अर्जाची सुनावणी **दिनांक १५/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता** न्यायाधिकरणापुढे खालील पत्यावर करण्याचे निश्चित केले आहे याची समज घ्यावी. पुढील सुनावणी तारखेस तुम्ही जातीने किंवा प्राधिकृत प्रतिनिधी किंवा वकिला मार्फत न्यायाधिकरणापुढे हजर झाला नाहीत, तर न्यायाधिकरण सदरहू अर्जाची एकतर्फी सुनावणी करील व त्या संबंधात योग्य तो आदेश दईल.
सुनावणीचे ठिकाण:- महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण, मुंबई यांचे कार्यालय, जुने सचिवालय, विस्तार इमारत, २ रा मजला, फोर्ट, मुंबई-३२
सही/-
**प्रबंधक**
महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण
मुंबई

**जाहीर सूचना**
येथे **सूचना** देण्यात येते की, माझ्या अशिलांनी मला सौ.पुष्पा जी. त्रेवाडिया, कंपनीचे नोंदणीकृत भागधारक, म्हणजे मे.सिता प्रिमायसेस लि. (पूर्वीची मे. इंडिया कोरुगेटिंग इंडस्ट्रीज लि.) यांच्या इक्विटी शेअर्स तसेच त्यांच्या मालकीच्या युनिटच्या शिर्षकाची चौकशी करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत, दोन्हींचा पुढे 'सदर जागा' असा उल्लेख करण्यात आला असून, त्याचे वर्णन खालील अनुसूचीत नमूद केलेले आहे.
खालील अनुसूचीत लिखित वर्णन केलेल्या जागेबाबत कोणत्याही व्यक्ती/संस्था/भागधारक, ज्यामध्ये व्यक्ती, हिंदू अविभक्त कुटुंब, कंपन्या, बँका, गृहनिर्माण व इतर वित्तीय संस्था, फर्म, संघटना किंवा इतर कोणतेही प्राधिकरण इत्यादींचा समावेश आहे, यांना कोणताही हरकत किंवा दावा असल्यास, जसे की कोणतेही सामंजस्य करार, हस्तांतरण, विक्री, देवाणघेवाण, मालकी हक्क, गहाण, धारणाधिकार, भार, दावा, ताबा, मुक्तता, जप्ती, न्यायालयीन कार्यवाही, लवाद किंवा अन्य कोणत्याही प्रकारे, त्यांनी त्याबाबतची माहिती आवश्यक कागदपत्रीय पुराव्यासह, या प्रसिद्धीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत माझ्या खाली नमूद कार्यालयात लेखी स्वरूपात कळवावी, अन्यथा, कोणतेही दावे/हरकती अस्तित्वात नाहीत असे गृहित धरले जाईल आणि माझे अशिल सदर अनुसूचीत नमूद जागेची खरेदी व संपादन प्रक्रिया संबंधित भागधारक/मालक यांच्याकडून अशा दावे/हरकतींचा कोणताही संदर्भ न घेता पूर्ण करतील.
**वर संदर्भित अनुसूचीत प्रिमायसेसः**
सिता प्रिमायसेस लि. चे प्रत्येकी रु.१००/- किमतीचे पूर्णतः भरणा केलेले क्र.४७ इक्विटी शेअर्स, ज्यांचे विशिष्टक्र.१४०७ते१४५३ (दोन्ही समाविष्ट) असून ते भाग प्रमाणपत्र क्र.१६१ द्वारे दर्शविलेले आहेत, तसेच इंडिया कोरुगेटिंग इंडस्ट्रीज लि. चे प्रत्येकी रु. १००/- किमतीचे पूर्णतः भरणा केलेले क्र.३१ इक्विटी शेअर्स, ज्यांचे विशिष्टक्र.४९७० ते५००० (दोन्ही समाविष्ट) असून ते भाग प्रमाणपत्र क्र.४१२ द्वारे दर्शविलेले आहेत, यांसह ताबा व इतर सर्व लाभदायक मालकी हक्क, शिर्षक आणि हितसंबंध युनिट क्र. १ संदर्भात, मोजमाप सुमारे १७४८ चौ.फूट बिल्ट अप क्षेत्र, ज्यापैकी अंदाजे १२५५ चौ. फूट बिल्ट अप क्षेत्र निवासी वापरासाठी मंजूर असून अंदाजे ४९३ चौ. फूट क्षेत्र व्यावसायिक वापरासाठी मंजूर आहे, २ऱ्या मजल्यावर, 'बी' विंग मध्ये, सिता प्रिमायसेस लिमिटेड, सिता इस्टेट, माहुल रोड, चेंबूर, मुंबई – ४०००७४ येथे स्थित, गाव मरावली, जिल्हा मुंबई उपनगर येथील सी.टी.एस.क्र.१३३, १३४ आणि १३५ असलेल्या मालमत्तेबाबत.
सही/-
**अभिषेक के. पारेख**
**वकिल उच्च न्यायालय**
दुकान क्र.१५ आणि १६, जनता मार्केट, चेंबूर रेल्वे स्टेशन जवळ, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१.

**महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई**
कार्यालय :-जुने सचिवालय, २रा मजला, फोर्ट, मुंबई ३२
दूरध्वनि क्रमांक ०२२-२२८४४६३४ Email: registrarmrt@yahoo.in
क्र. अध्यक्ष/टेनन्सी/आरईव्ही/ठाणे/एल-६५८/२०२५ दिनांक :-०८/०४/२०२६
प्रति,
**२. श्रीमती. शांतीबाई सीताराम पाटील** कायदेशीर वारसांमार्फत मृत व्यक्तीः **अ) श्रीमती. सरस्वती रघुनाथ पाटील,** रा. डायघर, पोस्टः पाडळे, ता. आणि जिल्हा: ठाणे **ब) श्रीमती. लीला बाळकृष्ण जोशी,** रा. साबेगाव, दिवा (पूर्व), जिल्हा: ठाणे **सी) श्री. मनोहर सीताराम पाटील** कायदेशीर वारसांमार्फत मृत व्यक्ती **सी२) गीता विकास मढवी,** रा. ऐरोली गाव, गावदेवी मंदिराजवळ, नवी मुंबई **सी३) श्रीम. सायली लौकीक म्हात्रे,** रा. कांजूरमार्ग (पू), म्हात्रे आळी, मुंबई **४. श्री पद्मन वासुदेव दाभोळकर** दिवंगत एल. आर.: **सी) श्रीमती देवकी अभय रंगवकर,** रा. बी/२. आचकरपोलीस अपार्टमेंट, थत्ते नगर, नाशिक-४२२००५. **डी) श्री पराग पद्मन दाभोळकर,** रा. व्ही/२९, युनिट पार्क, शरणपूर रोड, नाशिक-४२२००५. **एफ) श्री. गुरुनाथ जयवंत दाभोळकर जी) श्री. वसंत गुरुनाथ दाभोळकर,** एफ व जी रा. शंकर निवास, ३ रा मजला, डी-११. आगाशे पथ, दादर, मुंबई- ४०००२८ **आय) श्रीम. राधिका उर्फ सुष्मा राजेंद्र कारे,** रा. ४३ बी, मेमून अपार्टमेंट, पालखी गल्ली, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२५ **जे) श्री. अश्वीनकुमार पाठक,** रा. सिटीजन अपार्टमेंट, ३. टी.पी.एस., बांद्रा (प), मुंबई ४०००५० **के) श्री. राजेश दिपक मुजुमदार,** रा. १२, भवानी नगर, १ ला मजला, रविंद्र स्वामी मठ, हुबळी, कर्नाटक ५८००२३ **एल) गीता दिपक मुजुमदार,** रा. १२, भवानी नगर, पहिला मजला, रविंद्र स्वामी मठ, हुबळी, कर्नाटक ५८००२३
**विषय :- सुनावणी नोटीसबाबत.**
**श्री. गोपीनाथ नामदेव पाटील (मवा) श्री. शशिकांत गोपीनाथ पाटील,** रा. पाटील पॅलेस बिल्डींग, रुम नं. २, साबेगाव, दिवा (पू), ता. जि. ठाणे व इतर यांनी उपविभागीय अधिकारी ठाणे यांचेकडील टेनन्सी अपील क्र. ०००९२/२०२३ दि. ०३/०९/२०२५ च्या आदेशाच्या अनुषंगाने आपल्याविरुध्द दाखल केलेल्या अपील अर्जाची **सुनावणी दिनांक १५/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता** न्यायाधिकरणापुढे खालील पत्यावर करण्याचे निश्चित केले आहे याची समज घ्यावी. पुढील सुनावणी तारखेस तुम्ही जातीने किंवा प्राधिकृत प्रतिनिधी किंवा वकिला मार्फत न्यायाधिकरणापुढे हजर झाला नाहीत, तर न्यायाधिकरण सदरहू अर्जाची एकतर्फी सुनावणी करील व त्या संबंधात योग्य तो आदेश दईल.
सुनावणीचे ठिकाण:- महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण, मुंबई यांचे कार्यालय, जुने सचिवालय, विस्तार इमारत, २ रा मजला, फोर्ट, मुंबई-३२
सही/-
**प्रबंधक**
महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण
मुंबई



## ‘पेद्दी’च्या ट्रेलर लाँचिंगची उत्सुकता

**दाक्षिणात्य** सुपरस्टार थलपती विजय याच्या आगामी ‘पेद्दी’ या बहुप्रतिक्षित चित्रपटाचा ट्रेलर लॉन्च सोहळा येत्या १६ मे रोजी भोपाळमध्ये आयोजित करण्यात आला आहे. हिंदी भाषिक प्रेक्षकांमध्ये या चित्रपटाची मोठी उत्सुकता असून, या भव्य कार्यक्रमासाठी भोपाळमधील लाल परेड मैदानाची निवड करण्यात आली आहे. या सोहळ्याचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे जागतिक कीर्तीचे संगीतकार ए. आर. रहमान यांचा लाइव्ह परफॉर्मन्स असणार आहे.

रहमान या चित्रपटातील गाण्यांचे सादरीकरण करणार असून, त्यांच्या लाइव्ह कॉन्सर्टमुळे या ट्रेलर लॉन्चला एका मोठ्या महोत्सवाचे स्वरूप येणार आहे. या चित्रपटाचे संगीत आधीच लोकप्रिय झाले असून, आता ट्रेलरच्या माध्यमातून चित्रपटाची झलक पाहण्यासाठी चाहते आतुर आहेत.



## ओळखा पाहू कोण?

**प्रसिद्ध** गायक आणि संगीतकार अदनान सामी याने सोशल मीडियावर आपली काही छायाचित्रे प्रसिद्ध करून चाहत्यांना आश्चर्याचा धक्का दिला आहे. या फोटोंमध्ये तो अत्यंत वेगळ्या व ‘विंटेज’ अवतारात दिसत असून, त्याच्या या नव्या रुपाने इंटरनेटवर खळबळ उडवून दिली आहे. त्याच्या या अवतारात अंगावर गोंदवलेले टॅटू, दागिन्यांचे अनेक पदर आणि गडद रंगाची राजे-शाही वेशभूषा प्रामुख्याने लक्ष वेधून घेते.

अदनानने आपल्या इन्स्टाग्राम हँडलवर हे फोटो शेअर केले असून त्याला ‘विंटेज ड्रामा’ असे कॅप्शन दिले आहे. या छायाचित्रांमध्ये तो एका खुर्चीवर बसलेला असून त्याच्या हातावर आणि मानेवर क्लिष्ट नक्षीकाम असलेले टॅटू दिसत आहेत. तसेच त्याने गळ्यात माळा आणि हातात अंगठ्या असा भारी दागिन्यांचा साज चढवला आहे. त्याच्या डोळ्यांमधील तीव्रता आणि चेहऱ्यावरील हावभाव एखाद्या ऐतिहासिक किंवा काल्पनिक कथांमधील पात्रासारखे भासतात.

हा नवीन लूक पाहून चाहत्यांमध्ये व कलावर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे. हा अवतार त्याच्या एखाद्या नवीन म्युझिक व्हिडिओसाठी आहे की तो चित्रपट किंवा वेब मालिकेद्वारे अभिनयात पदार्पण करत आहे, अशा शक्यता वर्तवल्या जात आहेत.काही नेटकऱ्यांनी त्याच्या या बदलाची तुलना हॉलिवूडमधील ‘पायरेट्स ऑफ द कॅरिबियन’ मधील पात्रांशी केली आहे.

अदनान सामीने यापूर्वी आपल्या वजनात घट करून सर्वांना थक्क केले होते. आता शारीरिक परिवर्तनानंतर त्याने आपल्या शैलीतही आमूलाग्र बदल केल्याचे या फोटोंवरून दिसून येते. ‘म्युझिक इज माय सोल’ असे म्हणणाऱ्या अदनान-ने या नव्या रुपाबद्दल अधिक माहिती अद्याप गुलदस्त्यात ठेवली असली, तरी त्याच्या आगामी प्रकल्पाबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

## ‘रागिनी ३’मध्ये आयुषची एंट्री

**लोकप्रिय** ‘रागिनी एमएमएस’ चित्रपट मालिकेत आता अभिनेता आयुष शर्माची एन्ट्री झाली असून तो ‘रागिनी ३’ मध्ये अभिनेत्री तमन्ना भाटियासोबत मुख्य भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटात आयुषसोबतच जुनैद खान आणि नर्गिस फाखरी यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. निर्माती एकता कपूरने या अलौकिक थरारपटासाठी (सुपरनॅचरल थ्रिलर) आयुषची निवड केली असून यामुळे चित्रपटाची मुख्य स्टारकास्ट आता पूर्ण झाली आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन शशांक घोष करत असून, चित्रपटाची कथा यापूर्वीच्या भागांपेक्षा वेगळी असणार आहे. ‘रागिनी ३’ मध्ये जुन्या भागांप्रमाणे केवळ भय आणि शृंगार (हॉरर-इरोटिक) नसेल, तर यावेळी सस्पेन्स, विनोद आणि अलौकिक घटकांवर अधिक भर देण्यात आला आहे. निर्मात्यांनी याला ‘डेट नाईट हॉरर’ असा नवा आयाम दिला आहे. कथेत तमन्ना भाटियाचे पात्र आयुष शर्मा आणि जुनैद खान या दोघांसोबतही रोमँटिक ट्रॅकमध्ये दिसणार आहे,



## अभिषेक-शायनीची ‘इश्क दम और इडली रसम’

‘बालाजी टेलिफिल्म्स’ची उपकंपनी असलेल्या ‘बालाजी स्टुडिओज’ने आपल्या नवीन ’यूट्यूब ओरिजिनल’ मालिकेची घोषणा केली असून ‘इश्क दम और इडली रसम’ असे या मालिकेचे नाव आहे. या मालिकेत अभिनेता अभिषेक कुमार आणि अभिनेत्री शायनी दोषी मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. ही मालिका आजपासून दर सोमवार, बुधवार आणि शुक्रवार संध्याकाळी ६ वाजता बालाजी टेलिफिल्म्सच्या यूट्यूब चॅनेलवर प्रसारित केली जाणार आहे.

या मालिकेची निर्मिती प्रसिद्ध अभिनेत्री सुरभी चंदना हिने तिच्या ‘फील गुड स्टुडिओज’ या बॅनरखाली केली असून, कार्यकारी निर्मितीची जबाबदारीही तिनेच सांभाळली आहे. एका प्राचीन दक्षिण भारतीय उपाहारगृहाच्या पार्श्वभूमीवर ही कथा आधारलेली आहे.

शायनी दोषी यात मीरा नायर नावाच्या एका हळव्या शेफची भूमिका साकारत आहे, तर अभिषेक कुमार यात अर्जुन ठाकूर नावाच्या एका आधुनिक विचारसरणीच्या शेफ-गुंतवणुकदाराची भूमिका साकारत आहे.




## नोरा झळकणार ‘फिफा’मध्ये

**अभिनेत्री** आणि नृत्यांगना नोरा फतेही पुन्हा एकदा जागतिक व्यासपीठावर भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी सज्ज झाली असून, ती ‘फिफा विश्वचषक २०२६’ च्या उद्घाटन सोहळ्यात सादरीकरण करणार आहे. कॅनडातील टोरंटो येथील ‘बीएमओ फील्ड’ मैदानावर १२ जून २०२६ रोजी हा भव्य सोहळा पार पडणार आहे. फिफाच्या अधिकृत निवेदनानुसार, नोरा केवळ नृत्यच करणार नाही, तर या सोहळ्यात ती गायनही करणार आहे, जे तिच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील एक महत्त्वाचे पाऊल मानले जाते.

या उद्घाटन सोहळ्यात नोरासोबत अनेक जागतिक कीर्तीचे कलाकार एकाच मंचावर दिसणार आहेत. यामध्ये ॲलानिस मॉरिसेट, ॲलेसिया कारा, मायकल बुबले आणि जेसी रेयेझ यांसारख्या दिग्गज कॅनेडियन कलाकारांचा समावेश आहे. तसेच अमेरिकेतील उद्घाटन सोहळ्यात केटी पेरी, लिसा, रेमा आणि टायला यांसारखे जागतिक स्टार्स आपली कला सादर करणार आहेत. नोराने यापूर्वी २०२२ च्या कतार विश्वचषकातही फॅनफेस्टमध्ये आपले सादरीकरण केले होते, परंतु यावेळी ती मुख्य उद्घाटन सोहळ्याचा भाग असणार आहे.

नुकतीच नोरा एका वादाच्या केंद्रस्थानी होती. तिच्या ‘सरके चुनर’ या गाण्यातील काही शब्दांवरून राष्ट्रीय महिला आयोगाने तिला समन्स बजावले होते. या प्रकरणी नोराने आपली लेखी माफी सादर केली असून, कोणाच्याही भावना दुखावण्याचा आपला हेतू नव्हता, असे स्पष्ट केले आहे. या पार्श्वभूमीवर फिफासारख्या जागतिक स्तरा-वरील मोठ्या कार्यक्रमात झालेली निवड तिच्या चाहत्यांसाठी आनंदाची बातमी ठरली आहे.





## संजना करणार डिजिटल विश्वात पदार्पण

**अभिनेत्री** संजना संघी आगामी काळात डिजिटल क्षेत्रात पदार्पण करण्यासाठी सज्ज असून तिने एका वेब मालिकेसाठी स्वाक्षरी केल्याचे स्पष्ट झाले आहे. संजनाच्या मते, दीर्घ स्वरूपातील कथा सांगण्यासाठी वेब मालिका हे एक उत्तम माध्यम आहे आणि या मालिकेचे काम सुरू करण्यासाठी ती प्रचंड उत्सुक आहे.

या नवीन मालिकेव्यतिरिक्त संजना आता जागतिक स्तरावरील प्रकल्पांमध्येही रस दाखवत आहे. सध्या ती काही आंतरराष्ट्रीय चित्रपट आणि मालिकांसाठी ऑडिशन्स देत असून परदेशातील कामाच्या संधी शोधत आहे. आजच्या काळात ओटीटी प्लॅटफॉर्म्स मुळे भौगोलिक सीमा पुसल्या गेल्या असून भारतीय कलाकारांना जागतिक व्यासपीठ मिळत आहे, ही अतिशय सकारात्मक बाब असल्याचे तिने नमूद केले.

आपल्या भविष्यातील कामाबद्दल बोलताना संजनाने निखळ विनोदी (कॉमेडी) भूमिकेत काम करण्याची इच्छा व्यक्त केली. तिच्या मते, अनेक दिग्दर्शकांनी तिच्या विनोदी शैलीची प्रशंसा केली असून तिला अशा प्रकारच्या हलक्याफुलक्या चित्रपटाचा भाग व्हायला आवडेल. याशिवाय, तिच्याकडे सध्या काही मोठ्या बॅनरचे चित्रपट देखील आहेत, ज्यांची अधिकृत घोषणा लवकरच अपेक्षित आहे.

# हेल्दी Me



## अंगठ्याच्या मुळाशी वेदना होताहेत...?

**डॉ. सम्यक पंचोली,**
**शोल्डर आणि अप्पर लिंब सर्जन**

*मनगट आणि अंगठ्याच्या सांध्यापाशी अचानक सुरु होणारी ठणक आणि एखादी वस्तू पकडताना होणारी तीव्र वेदना ही ‘डी क्वर्व्हेन्स टेंडिनोसिस’ या वैद्यकीय स्थितीचा संकेत असू शकतो. अंगठ्याच्या हालचालीवर नियंत्रण ठेवणाऱ्या स्नायूबंधांच्या (टेंडन्स) आवरणाला सूज आल्यामुळे ही स्थिती निर्माण होते.*

**हाताच्या** अंगठ्यापाशी होणाऱ्या वेदनांचे महत्त्वाचे कारण म्हणजे ‘डी क्वर्व्हेन टेनोसायनोव्हायटिस’ ही समस्या होय. मनगटाच्या बाजूला अंगठ्याच्या हालचालीसाठी कारणीभूत असलेल्या स्नायूंच्या नसांवर जेव्हा सूज येते, तेव्हा ही स्थिती उद्भवते. यामुळे साध्या दैनंदिन हालचाली करणेही रुग्णाला कठीण होऊन बसते. प्रामुख्याने अंगठा वळवणे, एखादी वस्तू घट्ट पकडणे किंवा मुठ आवळणे अशा क्रिया करताना तीव्र वेदना जाणवतात.

या आजाराची लक्षणे प्रामुख्याने अंगठ्याच्या खालच्या भागातील मनगटावर केंद्रित असतात. यात अंगठ्याच्या मुळाशी सूज येणे, हालचाल करताना अडथळा जाणवणे किंवा काहीतरी अडकल्यासारखे वाटणे ही प्राथमिक लक्षणे आहेत. कधीकधी हालचाल करताना सांध्यातून कडकड असा आवाजही येतो. वेळीच उपचार केले नाहीत तर या वेदना हाताच्या कोपरापर्यंत पसरू शकतात. विशेषतः ज्यावेळी आपण वस्तू उचलतो किंवा पिळतो, तेव्हा या वेदना अधिक तीव्र होतात.

वैद्यकीय दृष्टिकोनातून पाहता, आपल्या मनगटात अंगठ्याकडे जाणाऱ्या दोन महत्त्वाच्या नसा एका छोट्या बोगद्यासारख्या भागातून जातात. ज्यावेळी आपण सतत एकाच प्रकारच्या हालचाली करतो, तेव्हा या नसांच्या आवरणाला सूज येते. ही सूज वाढल्यामुळे नसांना त्या जागेतून मुक्तपणे हालचाल करणे कठीण जाते. सततच्या कामामुळे किंवा छंदांमुळे ही स्थिती उद्भवू शकते. उदाहरणार्थ, बागकाम करणे, खेळांमध्ये रॅकेटचा वापर करणे, तासनतास टायपिंग करणे किंवा अगदी लहान मुलाला वारंवार कडेवर उचलून घेणे यामुळे या नसांवर ताण येतो. तासनतास मोबाईलवर अंगठ्याचा वापर करून केल्या जाणाऱ्या हालचाली या विकाराला आमंत्रण देतात.

साधारणपणे तीस ते पन्नास वयोगटातील व्यक्तींमध्ये याचे प्रमाण अधिक आढळते. पुरुषांच्या तुलनेत महिलांमध्ये हा त्रास होण्याचे प्रमाण जास्त आहे. तसेच गरोदरपणात किंवा बाळंतपणानंतर शरीरातील संप्रेरकांच्या बदलांमुळे किंवा बाळाला सतत उचलल्यामुळे हा त्रास वाढू शकतो. याशिवाय संधीवात किंवा मनगटाला झालेली जुनी इजादेखील याला कारणीभूत ठरू शकते.

निदानासाठी ‘फिंकेलस्टीन टेस्ट’ यांसारख्या शारीरिक चाचण्यांचा वापर डॉक्टर करतात. यामध्ये अंगठ्याची विशिष्ट हालचाल करून वेदनेची तीव्रता तपासली जाते. उपचार पद्धतीमध्ये सुरुवातीला ‘कन्झर्व्हेटिव्ह मॅनेजमेंट’ म्हणजेच विना-शस्त्रक्रिया उपचारांवर भर दिला जातो. यामध्ये मनगटाच्या हालचालींवर मर्यादा आणण्यासाठी ‘थम स्पायका स्प्लिंट’चा वापर अनिवार्य ठरतो. अत्यंत गंभीर आणि जुनाट प्रकरणांमध्येच शस्त्रक्रिया अपरिहार्य ठरते. या शस्त्रक्रियेत स्नायूबंधांच्या आवरणावर असलेला ताण कमी करून त्यांना हालचालीसाठी जागा करून दिली जाते.






### हेल्दी टिप्स

कुळीथ : हुलगा किंवा कुळीथ हे कडधान्य प्रथिनांचा एक मोठा खजिना म्हणून आरोग्यासाठी अत्यंत पोषक मानले जाते. नियमितपणे हुलग्याचे सेवन केल्यास स्नायूंची दुरुस्ती होण्यास आणि शरीराची ताकद वाढण्यास मोठी मदत होते. इंग्रजीमध्ये ‘हॉर्स ग्राम’ असे म्हटले जाते. शरीरातील ऊर्जा टिकवून ठेवण्यासाठी या डाळीचा उपयोग प्रभावी ठरतो. यात विशेषतः लोह, कॅल्शियम आणि फॉस्फरस भरपूर प्रमाणात असते. याशिवाय यात बी-कॉम्प्लेक्स जीवनसत्त्वे देखील आढळतात, जी ऊर्जा



चयापचयासाठी (एनर्जी मेटाबॉलिज्म) आवश्यक आहेत

सामान्यतः एका निरोगी प्रौढ व्यक्तीसाठी दररोज २५-३० ग्रॅम कुळीथ डाळ पुरेशी मानली जाते, जी शिजल्यानंतर साधारणपणे एका लहान वाटीएवढी असते. यामध्ये असलेले नैसर्गिक गुणधर्म शरीराला डिटॉक्स करण्यास मदत करतात, ज्यामुळे मूत्रपिंडाचे आरोग्य सुधारते. ज्यांना मुतखड्याचा त्रास आहे, त्यांच्यासाठी कुळीथ हा एक रामबाण उपाय ठरू शकते.



## रात्रीच्या जेवणात मीठ जास्त खाताय?

**बदलत्या** जीवनशैलीमुळे आजकाल रात्रीच्या जेवणात लोणचे, पापड, नमकीन किंवा चटपटीत पदार्थ खाण्याचे प्रमाण वाढले आहे. मात्र, आरोग्य तज्ज्ञांच्या मते रात्री जास्त मीठ खाणे शरीरासाठी अत्यंत घातक ठरू शकते. मीठामुळे शरीरातील पाण्याचे संतुलन बिघडते, ज्यामुळे मूत्रपिंडावर ताण येतो आणि रक्तदाब वाढू शकतो. सायंकाळी ७ वाजेनंतर मिठाचे सेवन कमी केल्यास झोप, पचन आणि सकाळचा ताजेपणा यामध्ये मोठा सकारात्मक बदल दिसून येईल.

**रात्री जास्त मीठ खाण्याचे तोटे**

रात्री जास्त मीठ खाल्ल्या मुळे शरीरात पाणी साठू लागते. परिणामी, सकाळी उठल्यावर चेहऱ्यावर सूज येणे, शरीर जड वाटणे आणि वारंवार तहान लागणे अशा समस्या जाणवतात.

रात्रीच्या वेळी शरीर स्वतःची दुरुस्ती करत असते. मात्र, मिठाचे प्रमाण जास्त असल्यास शरीर विश्रांती घेण्याऐवजी शरीरातील क्षारांचे संतुलन राखण्यात गुंतून राहते. यामुळे झोप गाढ लागत नाही.

सामान्यतः रात्रीच्या वेळी रक्तदाब कमी होणे अपेक्षित असते, ज्यामुळे हृदयाला विश्रांती मिळते. मात्र, मिठाच्या अतिसेवनामुळे रक्तदाब कमी होत नाही. यामुळे दीर्घकाळासाठी उच्च रक्तदाबाचा त्रास होऊ शकतो. हे लक्षात घेता रात्री खिचडी, भाजी-पोळी किंवा सूप यांसारख्या पदार्थांना प्राधान्य द्यावे. लोणचे, पापड, चिप्स आणि फरसाण यांसारखे जास्त मीठ असलेले पदार्थ रात्री टाळावेत. जेवणात चवीसाठी मिठाऐवजी लिंबू, जिरे, मिरी, हिंग, कोथिंबीर किंवा कढीपत्त्याचा वापर करावा.



## मुलांच्या बोलण्यातील दोष

**माणसाच्या** संवाद प्रक्रियेत वाणी आणि भाषा हे दोन अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. मुलांच्या वाढत्या वयात बोलण्या मध्ये अनेकदा काही त्रुटी किंवा दोष दिसून येतात. त्यांना वैद्यकीय परिभाषेत ‘कम्युनिकेशन डिसऑर्डर्स’ असे संबोधले जाते. या दोषांचे वर्गीकरण प्रामुख्याने उच्चार दोष, तोतरेपणा आणि भाषिक आकलनातील दोष अशा तीन स्तरांवर केले जाते.


एखादे मूल विशिष्ट अक्षरांचा किंवा शब्दांचा उच्चार स्पष्टपणे करू शकत नाही, तेव्हा त्याला ‘आर्टिक्युलेशन डिसऑर्डर’ म्हटले जाते. यामध्ये प्रामुख्याने जिभेची हालचाल आणि टाळूची ठेवण यांचा मेंदूशी होणारा समन्वय कमी पडतो. उदाहरणार्थ, ‘र’ ऐवजी ‘ल’ म्हणणे किंवा शब्दांमधील शेवटची अक्षरे गाळणे हे दोष स्नायूंच्या कमकुवतपणामुळे किंवा श्रवणदोषामुळे उद्भवू शकतात.

दुसरा महत्त्वाचा प्रकार म्हणजे तोतरेपणा किंवा अडखळणे म्हटले जाते. वैद्यकीय भाषेत याला ‘स्टटरिंग’ म्हणतात. संशोधनानुसार, हे दोष केवळ मानसिक भीतीमुळे नसून अनेकदा मज्जासंस्थेतील न्यूरोलॉजिकल प्रक्रियेतील अडथळ्यांमुळे निर्माण होतात. बोलताना शब्दांची पुनरावृत्ती करणे किंवा एकाच अक्षरावर दीर्घकाळ रेंगाळणे यामुळे संवादाचा प्रवाह खंडित होतो.

तिसऱ्या स्तरावर भाषेचे आकलन आणि अभिव्यक्ती यांचे दोष येतात. काही मुले ऐकलेले शब्द समजून घेऊ शकतात, परंतु स्वतःचे विचार मांडताना त्यांना योग्य शब्द सुचत नाहीत, याला ‘एक्स्प्रेसिव्ह लँग्वेज डिसऑर्डर’ म्हणतात.

अनेकदा अनुवांशिकता, गर्भावस्थेतील गुंतागुंत, जन्मानंतर होणारे मेंदूचे संसर्ग किंवा कानाच्या मध्यभागात वारंवार होणारे जंतूसंसर्ग यामुळे बोलण्यात दोष निर्माण होतात. फुफ्फुसे, स्वरयंत्र, जीभ, दात आणि ओठ यांच्यातील सूक्ष्म समन्वयात बिघाड झाला की संवादाची प्रक्रिया बाधित होते.

या दोषांचे निदान करण्यासाठी ‘स्पीच-लँग्वेज पॅथॉलॉजिस्ट’ आधुनिक तंत्रांचा वापर करतात. उपचारांच्या प्रक्रियेत ‘स्पीच थेरपी’ अत्यंत प्रभावी ठरते. यामध्ये विशिष्ट व्यायाम आणि ध्वनी सरावाच्या माध्यमातून मेंदूला नवीन भाषिक संदेशांचे प्रशिक्षण दिले जाते. वेळीच उपचार केल्यास मुलांच्या आत्मविश्वासात वाढ होऊन त्यांचे सामाजिक आणि शैक्षणिक आयुष्य अधिक सुलभ होऊ शकते.



## समस्या अपस्माराची

**आकडी** येणे हा आजार अगदी लहान वयात झाला तरी मानसिक वाढीवर परिणाम होतो. मध्यम वयात त्रास असेल तर रुग्णावर सामाजिक, वैयक्तिकरित्या बरीच बंधने येतात. हा मेंदूच्या मज्जासंस्थेशी संबंधित एक अत्यंत जटिल विकार आहे. हा रोग मेंदू व चेतनातंतूच्या संदेशवहन यंत्रणेत बिघाड झाल्याने चुकीचे संदेश जातात व चुकीचे कार्य स्नायूंकडून घडवले जाते, अशी क्रिया इपिलेप्सी मध्ये होत असते.


अनुवंशिकता, गर्भावस्थेत होणारे दुष्परिणाम, डोक्याला चढणारा ताप, विलक्षण मानसिक व शारीरिक ताण, पचनाच्या तीव्र तक्रारी, यामुळे अपस्मार हा आजार उद्भवतो. लहान मुलांच्यात हा विकार जास्त आढळतो. तसे असले तरी सर्व वयोगटातील स्त्री–पुरुष या आजाराने त्रस्त दिसतात.

अपस्माराचे ग्रँडमाल आणि पेटेमाल असे प्रकार आहेत. ग्रँडमाल या प्रकारात प्रथम रुग्णाला अस्वस्थ वाटते. काही विचित्र भावना होतात. पोटात काहीतरी गोल फिरत आहे, असे वाटते. काही स्नायू उगाचच थरथरत राहातात. मान वाकडी होते. दातखीळ बसते, तोंडातून फेस येतो. पेटमाल या प्रकारात अपस्माराचा झटका अगदी नाममात्र असतो. रुग्णाला स्नायूंच्या होणाऱ्या विशिष्ट हालचाली अनुभवता येतात. डोळे, डोके, अंग, हात, पाय, यांच्या विचित्र हालचाली होतात. पण क्षणार्धात पूर्ववत होतात. पण असा प्रकार कधीही अचानकपणे होऊ शकतो. या प्रकारात विस्तवाकडे पाहिल्याने, किंचाळल्याने आणि काही विशिष्ट औषधांनी फिट्स येऊ शकतात.

अपस्माराच्या रुग्णांना सामाजिक स्तरावर अनेकदा चुकीच्या वागणुकीचा सामना करावा लागतो. फिट आलेल्या व्यक्तीला चप्पल हुंगवणे, तोंडात लोखंडी वस्तू घालणे किंवा हात-पाय दाबणे हे प्रकार शास्त्रीयदृष्ट्या अत्यंत चुकीचे आणि धोकादायक आहेत. वास्तविक, अशा वेळी रुग्णाला केवळ सुरक्षित ठिकाणी एका कुशीवर झोपवणे आणि त्याच्या भोवतालच्या धोकादायक वस्तू दूर करणे हाच सर्वोत्तम प्रथमोपचार ठरतो.

आधुनिक वैद्यकशास्त्रामध्ये अपस्मारावर उपचार उपलब्ध आहेत. नियमित औषधोपचारांनी झटके नियंत्रित केले जाऊ शकतात. ही औषधे मेंदूतील विद्युत लहरींना स्थिर करण्याचे आणि रसायनांचे संतुलन राखण्याचे काम करतात.

# नवाकाळ शब्दकोडे– १६०२



**आडवे शब्द –**

१. सावळा गोंधळ असलेली राजवट, निर्नायकी स्थिती ५. शहाणा, समजूतदार ७. गमतीदार ९. बायको १०. नको असलेल्या गोष्टीचा सुळसुळाट ११. अंमलबजावणी १४. सलगी, जवळीक १५. भरधाव १५अ. नफेखोरीसाठी माल साठवून केलेली कृत्रिम टंचाई १६. दुष्ट हेतू १७. चांदी १९. आयुर्वेदिक औषधाची गोळी २०. नवरदेवाची आई २१. बारा वर्षे २३. तीन पावलांमध्ये त्रिलोक व्यापणारा विष्णूचा अवतार २५. गोणपाट २७. गीत २९. सवय ३१. वाळा ३४. प्राण ३५. श्यामची आईचे लेखक (आडनाव) ३६. जोरदार फिरणारे वारे ३७. मधुर आवाज ३८. गाडी हाकणारा ३९. भ्रमरी, लक्ष्मी ४०. गाईचे पिल्लू ४२. एकशिंगी प्राणी ४३. डोंगरांमधील खोलवर जागा ४४. खाट ४५. लाट ४७. रास ४९. डिंक ५१. बायको ५२. सुटलेले पोट ५३. न आवडलेले ५४. धाकटी बहीण, मुलीचे नाव ५५. व्याख्यान देणारा ५६. रूढी ५८. अंगवळणी पडलेली गोष्ट ५९. अमानुष किंवा राक्षसी (प्रथा) ६०. दाटी ६१. आईचा भाऊ ६२. वाळवंट ६३. अन्नाचा घास ६४. दरवर्षी ६५. शुभारंभ ६७. वारसदार ६९. गणपती ७१. चुलता ७३. कंबर ७४. यज्ञ ७५. सामूहिक मैदानी व्यायाम ७७. घरामागचे आवार ८०. वर्ष ८२. पायताण ८३. कट्टर ८४. भूतबाधेचा कथित प्रकार ८६. गणगोत ८७. पुराणातील सावित्रीचा पती ८९. नृत्य ९२. उत्तर, प्रत्युत्तर ९४. सुळका ९६. पाण्याचा फवारा, कारंजे ९७. फट, भेग ९८. नेहमीचे ९९. मोठेपणा १००. आरतीच्या वेळी तबकात प्रज्वलित केला जाणारा पांढरा सुगंधी पदार्थ

**उभे शब्द –**

१. लकवा, पक्षाघात २. शीघ्रकोपी, संतापी ३. गुन्ह्याची अधिकृतपणे दिलेली कबुली ४. पाण्यावर उमलणारे फूल ५. आटोपशीर ६. पराक्रम ७. पृथ्वी ८. मनात आकस बाळगणे याअर्थी वाक्प्रचार ९. माहेरची साडी चित्रपटाची नायिका - xxx कुबल ११. कान असलेली लाकडी परात १२. प्रमाणापेक्षा जास्त १३. स्वतःच्या मर्जीने १८. अंधकार, काळोख २२. उलटून केलेला वार २४. नटूनथटून मिरवणारी २६. तोफवाहू दणकट लष्करी वाहन २७. गावातील रहिवासी २८. हक्क, खटला ३०. शिखर ३२. टोचणी ३३. नाविक, डोलकर ३५. दरवर्षीप्रमाणे ४१. परंपराप्रिय ४२. हिंदीत चेंडू ४३. खलाशी ४६. आग्रह ४८. दया ४९. चमचेगिरी करणे, रूंजी घालणे ५०. ज्यासारखे वागावे असे ५३. पृथ्वीच्या कक्षेबाहेर प्रवास करणारे वाहन ५७. 'हातच्या काकणाला xxx xxx' ५९. ज्ञात ६०. गोंगाट ६१. थांगपत्ता ६६. स्फूर्तिदायक गाणी रचणारा/गाणारा ६८. विश्व ७०. गाडा ७२. वस्त्र ७६. उत्तराधिकारी ७८. मार्गस्थ ७९. पत्नी ८०. पिकाचा उरलेला गाळसाळ ८१. जिवाला घोर लागलेला ८२. क्रीडापटू ८३. सोने, कांचन ८५. पाणी तापवण्याचे उपकरण ८८. त्याग ९०. सगळ्या कामात हुषार ९१. सणावारी केल्या जाणाऱ्या गोड पोळीतील सारण ९३. शहरी भागातील सार्वजनिक प्रवासी वाहन ९५. दरोडा

•

**नवाकाळ कोडे क्रमांक १६०१ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. हत्यारबंद ५. चार ६. कडी ८. कारावास १२. डरपोक १३. भाळ १४. उल्हास १६. महल १७. सफाई १८. नवशिका १९. हात टेकणे २१. सुमार २२. डाकीण २४. धनदांडगा २९. आप ३१. करभ ३३. अनुरक्त ३४. करडई ३७. रुसवा ३९. वायस ४१. रबडी ४३. सखी ४४. जंग जंग पछाडणे ४७. लकेर ४८. नातलग ५०. माया ५१. बालक ५३. मळकी ५५. वन ५६. फुटाणे ५७. गुणी ५८. नदी ५९. सावकाश ६१. अंग ६२. दामिनी ६४. गूळ ६५. भाऊ ६६. नवथर ६७. लबाडी ६८. रजा ६९. गुद्दा ७०. येथे ७१. कवडी ७३. सखा ७५. पुळी ७६. गाणे ७७. अवघडलेला ७८. अनाथ ८०. रात ८१. पाट ८२. वहीम ८४. मिरची ८६. फुलपात्र ८९. चार ९०. ठपका ९२. जप ९४. कबुली ९६. झटापट ९९. जवळ १००. फुटकळ १०१. गणगौळण १०२. तथास्तु

**उभे शब्द** : २. त्यात फाल्गुन मास ३. बंड ४. दरड ५. चाकरमानी ६. कळवळा ७. कोल्हा ९. रामटेक १०. वाहक ११. सलणे १४. उकाडा १५. सहाण २०. भडक २३. कीटक २५. गारवा २६. अनुराग २७. फक्त २८. रड ३०. पगडी ३२. भयभीत ३५. रगड ३६. ईर ३७. रुग्णालय ३८. वासरमणी ४०. अपमान ४२. बहाल ४४. जंग ४५. जंत्री ४६. छाया ४८. नाकी नऊ येणे ४९. लक्ष ५१. बाणेदार ५२. कफनी ५४. शिवथर घळ ५५. वश ५६. फुगडी ५७. गुळगुळीत ५९. साव ६०. कार ६१. अंबाडी ६३. मिजास ६७. लवलाही ७१. कलेवर ७२. अनामिका ७४. खादी ७५. पुराणिक ७६. गाफील ७७. अट ७९. थर ८१. पात्र ८३. मठ ८५. चीजवस्तू ८६. फुली ८७. पाकीट ८८. लोटा ८९. चाटण ९१. पक्षी ९३. पळ ९५. बुळा ९६. झळ ९७. पग ९८. काळ ९९. जथा

# रुपाली चाकणकरांची एसआयटी चौकशी
## खरात प्रकरणात ४ मंत्री! काँग्रेसचा आरोप

पान १ वरून

त्या संदर्भात त्यांना माझ्याकडून काही प्रश्नांची उत्तरे हवे असतील तर ती देण्यासाठी मी आज आले आहे. एसआयटीला तपासात मी पूर्णपणे सहकार्य करेन. ती माझी जबाबदारी आहे. तपासाला सामोरे जात असताना जी मदत पोलिसांना व तपास अधिकाऱ्यांना हवी असेल ती त्यांना मी करेन. या तपासात पूर्णपणे माझे सहकार्य राहील. हा तपास पूर्ण होईल, त्या तपासातूनच तुमच्या प्रश्नांची उत्तरे मिळतील.

चौकशीवेळी चाकणकर यांना विविध प्रश्न विचारण्यात आले. खरात आणि तुमची केव्हापासून ओळख होती?, मंदिरात कोण कोण राजकीय व्यक्ती येत होत्या? शिवालिका ट्रस्ट च्या च कारभाराबद्दल त्यांना विचारले. खरात सोबत असणारे फोटो, व्हिडीओ हे कोणत्या कार्यक्रमातील आहेत? याशिवाय खरातसोबत असलेल्या आर्थिक व्यवहार बद्दलही प्रश्न विचारण्यात आले.

रुपाली चाकणकर यांना सहआरोपी करण्याची मागणी करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानियाचाकणकर याची चौकशी सुरु झाल्यानंतर प्रतिक्रिया देताना म्हणाल्या की, सुनील तटकरे यांनी रूपाली चाकणकरांना वाचवण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. तटकरे रूपाली चाकणकरांच्या पाठीशी खंबीर उभे होते चाकणकर महिला आयोगाच्या अध्यक्षा कशा झाल्या ते समोर यायला हवे. चाकणकरांना वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न केला गेला. सुनील तटकरे अगदी ढाल बनवून त्यांच्या समोर उभे होते त्यांची चौकशी होऊ नये याच्यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. मी महासंचालकांना हे पत्र पाठवले होते की तत्काळ सगळ्यांविरुद्धाची चौकशी झालीच पाहिजे. रूपाली चाकणकर या महिला आयोगाच्या अध्यक्ष पदापर्यंत कशा पोहोचल्या या सगळ्या गोष्टी आता बाहेर आल्या पाहिजेत. रूपाली चाकणकरांची चौकशी वकील न घेता करण्याची गरज आहे. सुनील तटकरे, एकनाथ शिंदे, दीपक केसरकर, दीपक लोंडे, सचिन सुमळे, अविनाश पोटे आहे यांनी खरातशी जेवढे आर्थिक व्यवहार होते ते सगळे आज बाहेर आले पाहिजेत.

दरम्यान, काँग्रेसचे नाना पटोले यांनी थेट सत्ताधारी मंत्र्यांवरच निशाणा साधत गंभीर आरोप केले. ते म्हणाले की, अशोक खरातकडून सगळी माहिती गोळा केल्यानंतर त्याला मारून टाकले जाईल. मी हे विधानसभेतही बोललो. या खरात प्रकरणात महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील चार मंत्र्यांचा समावेश आहे. याबाबत पत्रसुद्धा आम्ही मुख्यमंत्र्यांना देणार आहोत. या चारही मंत्र्यांना मंत्रिमंडळातून काढून टाकण्याची आमची मागणी आहे. महाराष्ट्रात कायदा सुव्यवस्था राहिलेली नाही. या आरोपांना मंत्री संजय शिरसाट यांनी प्रत्युत्तर देत म्हटले की, नाना पटोले यांच्याकडे त्या चार मंत्र्यांची नवे असतील तर ती त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे द्यावीत किंवा ती उघड करावीत.

### हॉटेल व्यावसायिकाचा दावा
### खरातकडून १३.५० कोटी

पान १ वरून

संबंधित सहकारी पतसंस्थांमधील कथित बनावट खात्यांद्वारे झालेल्या ७० कोटी रुपयांच्या बँक फसवणूक प्रकरणातील महत्त्वाची कडी ठरू शकतो. या प्रकरणात पैशांचा प्रवाह आणि अंतिम वापर शोधण्यासाठी ईडी आता संबंधित चार जमीन दलालांना समन्स बजावण्याच्या तयारीत आहे. तपास अधिकाऱ्यांच्या मते, १३.५० कोटी रुपयांच्या हा रोख व्यवहार हा खरात यांच्याशी संबंधित सहकारी पतसंस्थांमधील कथित बनावट खात्यांद्वारे झालेल्या ७० कोटीं रुपयांच्या बँक फसवणूक प्रकरणातील महत्त्वाची कडी ठरू शकतो.

# शस्त्रक्रियेमुळे संपर्काबाहेर
## सुधाकर घारेंचा खुलासा

■ खालापूर

**राष्ट्रवादी** काँग्रेस अजित पवार गटाचे रायगड जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे हे गेल्या काही दिवसांपासून संपर्काबाहेर असल्याने त्यांच्या नाराजीच्या चर्चांना उधाण आले होते. या सर्व चर्चांना पूर्णविराम देत आपण नाराज नसून शस्त्रक्रियेमुळे संपर्कबाहेर असल्याचे घारे यांनी स्पष्ट केले आहे. स्थानिक पातळीवर घारे यांच्या अनुपस्थितीमुळे विविध तर्कवितर्कांना सुरुवात झाली होती. कर्जत-खालापूर मतदारसंघातील एका पक्षप्रवेश कार्यक्रमातही त्यांची नाराजी दिसून आल्याची चर्चा रंगली होती. यावर सुधाकर घारे यांनी स्पष्टीकरण देताना सांगितले की, माझ्यावर नुकतीच नाकाची छोटी शस्त्रक्रिया झाली आहे. त्यामुळे काही दिवस फोन बंद ठेवला होता. मी कोणावरही नाराज नाही. मी माझे काम नियमितपणे करत आहे. सध्या प्रकृतीमुळे जनसंपर्क कार्यालयात उपस्थित राहता येत नाही. तब्येत सुधारल्यानंतर मी पुन्हा कार्यालयात येऊन नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी सेवेत हजर राहीन.

# मुंबई पालिका डास मारण्यासाठी
## ७ महिन्यांत ७ कोटी खर्च करणार

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेने पावसाळ्यात उपद्रवी ठरणाऱ्या डासांच्या निर्मूलनासाठी एकट्या पश्चिम नगरात पुढील ७ महिन्यांसाठी सुमारे ७ कोटी रुपयांच्या खर्चाचा प्रस्ताव तयार केला आहे. मात्र या मुद्यावर उद्या सोमवारी होणार्या स्थायी समितीच्या बैठकीत प्रशासनाविरुद्ध वादंग माजण्याची शक्यता असल्याचे बोलले जात आहे.

### पश्चिम उपनगरासाठी पालिकेचा प्रस्ताव!

पावसाळ्यात डेंग्यू, मलेरिया आणि चिकनगुनिया यांसारख्या आजारांचा प्रसार वाढतो. हे रोखण्यासाठी डासांच्या उत्पत्तीची ठिकाणे नष्ट करणे आणि औषध फवारणी करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. शहरातील विविध विभागांमध्ये धूर फवारणी केली जाणार आहे. मात्र पश्चिम उपनगरात धुराच्या फवारणीसाठी स्वतंत्र प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. त्यामध्ये १ एप्रिल ते ३१ ऑक्टोबर या सात महिन्यांसाठी ७ कोटी २० लाख खर्च अपेक्षित असल्याचे नमूद करण्यात आले आहे. ही डास निर्मूलन मोहीम राबविण्यासाठी कंत्राटी कामगारांची नियुक्ती केली जाणार आहे. त्यामध्ये बेरोजगार व स्वयंसेवक संघटनांची निवड करण्यात येईल. पश्चिम उपनगरातील वांद्रे ते दहिसरपर्यंत ही कीटकनाशक व धूर फवारणी केली जाणार आहे.

# रिफायनरीनंतर बॉक्साईट प्रकल्प
## राजापुरातील ग्रामस्थ आक्रमक

पान १ वरून - रोजी प्रस्तावित असलेली जनसुनावणी रद्द करून २६ मे रोजी होणार असली तरी, ग्रामस्थांचा विरोध कायम असल्याचे स्पष्ट केले. बॉक्साईटचा थर हा नैसर्गिक स्पंजप्रमाणे काम करत भूजल पातळी टिकवून ठेवतो. उत्खननामुळे विहिरी, बोअरवेल आणि नदी-नाले कोरडे पडण्याची भीती स्थानिक लोकप्रतिनिधींनी व्यक्त केली आहे. उत्खनन प्रक्रियेमुळे रासायनिक प्रदूषण वाढून पिण्याचे पाणी दूषित होण्याचाही धोका असल्याचे त्यांनी नमूद केले. आंबा बागायतदारांनीही या प्रकल्पामुळे कोकणातील फळबागा, शेती व पर्यावरणाचे मोठे नुकसान होईल, असा दावा करत प्रकल्पाला तीव्र विरोध दर्शवला आहे.

# काँग्रेसने द्रमुकच्या पाठीत खंजीर खुपसला

पान १ वरून

कोणालाही सोडू शकतो. असा एकही पक्ष नाही, ज्याच्या पाठीत काँग्रेसने खंजीर खुपसला नाही. यूपीए-१ आणि यूपीए-२ च्या काळात द्रमुकने काँग्रेसला अनेक वेळा संकटातून बाहेर काढले होते. पण आता राजकीय वारे बदलल्यानंतर त्यांचाच विश्वासघात केला.

यावेळी कर्नाटकमधील काँग्रेसच्या सरकारवरही त्यांनी टीका केली. ते म्हणाले की, गेल्या तीन वर्षांपासून कर्नाटकात लोकांच्या समस्या सोडवण्याऐवजी सरकारने आपला बहुतेक वेळ अंतर्गत संघर्ष सोडवण्यात घालवला आहे. मुख्यमंत्री किती काळ पदावर राहतील हे काँग्रेस ठरवू शकत नाही. दुसऱ्याला संधी द्यायची की नाही, हेही ठरत नाही. सर्व काही अधांतरी आहे. काँग्रेसला फक्त लोकांचा विश्वासघात कसा करायचा हेच माहीत आहे. ते स्वतः खोटे आहेत आणि त्यांची आश्वासनेही खोटी देत आहेत. कर्नाटकचा दौरा आटपून मोदी दुपारी तेलंगणाला रवाना झाले. हैदराबादमध्ये सुमारे ९,४०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि भूमिपूजन करून संध्याकाळी ते गुजरातला गेले. रात्री जामनगरमध्ये मुक्काम केल्यानंतर उद्या ते सोमनाथ मंदिरातील सोमनाथ अमृत महोत्सवात सहभागी होणार आहेत. बडोद्यात ते सरदारधाम हॉस्टेलचे उद्घाटन करून जनसभेलाही संबोधित करणार आहेत.

# ३१,७९३ कोटींच्या विरार-अलिबाग
## कॉरिडॉरच्या पहिल्या टप्प्याला मंजुरी

पान १ वरून

महामंडळाने हा प्रकल्प 'बिल्ड-ऑपरेट-ट्रान्सफर' मॉडेलअंतर्गत राबवण्याचा निर्णय घेतल्यानंतर काही महिन्यांतच ही मंजुरी देण्यात आली आहे. यापूर्वीच्या निविदांची किंमत अंदाजित खर्चापेक्षा सुमारे ३६ टक्क्यांनी अधिक असल्याने राज्य सरकारने प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या धोरणाचा फेरविचार केला होता.

विरार-अलिबाग कॉरिडॉर हा एमएमआरमधील महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पांपैकी एक मानला जात असून, भविष्यात मेट्रो रेल्वे घटकासह बाह्य वर्तुळाकार मार्ग म्हणून विकसित करण्याचे नियोजन आहे. सध्या या मार्गाची आखणी पेणपर्यंत असली तरी भविष्यात त्याची लांबी सुमारे १२८ किलोमीटरपर्यंत वाढवली जाऊ शकते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. या प्रकल्पामुळे एमएमआरच्या उत्तर आणि दक्षिण भागांमधील प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी होईल, असा विश्वास प्रशासनाला आहे.


**सार्वजनिक सूचना**

याद्वारे सर्वांना कळविण्यात येते की स्वर्गीय श्री. हुबराज प्रजापती, हे परळ सह्याद्री सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांचे सभासद व खालीलप्रमाणे नमूद केलेल्या मालमत्तेचे मालक होते: सीटीएस क्र. १०९ (भाग), ११० (भाग), १३६ (भाग), १३९ (भाग), लोअर परळ विभाग, प्लॉट सीएस १०९/३, शिव गणेश सीएचएस, रूम क्र. ५१३, ५ वा मजला, कस्तुरबा गांधी नगर, दैनिक शिवनेर मार्ग, वरळी, मुंबई – ४०००१८. त्यांचे निधन दिनांक ०४.०५.१९९७ रोजी झाले आहे.

मी, सौ. देव्राजी हुबराज प्रजापती, कायदेशीर वारसदार म्हणून वरील नमूद फ्लॅट व त्यासंबंधित शेअर्स माझ्या नावावर हस्तांतरित करण्यासाठी संबंधित संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांच्याकडे अर्ज केला आहे. त्यामुळे, सदर मालमत्तेबाबत कोणास काही दावा, हक्क, स्वारस्य किंवा हरकत असल्यास त्यांनी या सूचनेच्या प्रसिद्धीपासून ३० दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रांसह लेखी स्वरूपात माझ्याशी संपर्क साधावा. अन्यथा, अशा प्रकारचे दावे, असल्यास, ते स्वयमेव रद्द समजले जातील.

Sd/-
सौ. देव्राजी हुबराज प्रजापती
दिनांक :- ११-०५-२०२६ , स्थळ :- मुंबई


# तामिळनाडूत 'विजय पर्व' सुरू

पान १ वरून

यामध्ये एन. आनंद, अधव अर्जुन, डॉ. के.जी.अरुणराज, के.ए.सेनगोट्टैयन, पी. वेंकटरमणन, आर. निर्मलकुमार, राजमोहन, डॉ. टी.के. प्रभू आणि सेल्वी एस. कीर्तना यांचा समावेश आहे.

शपथ घेताना विजय यांनी ठरवून दिलेल्या मजकुरापलीकडे बोलण्यास सुरुवात केली असता राज्यपालांनी त्यांना मध्येच थांबवत लिखित शपथच वाचण्यास सांगितले. त्यानंतर विजय यांनी संमती दर्शवत अधिकृत मजकूर वाचून शपथ पूर्ण केली. शपथ घेतल्यानंतर केलेल्या छोटेखानी भाषणात विजय म्हणाले की, माझा जन्म कोणत्याही राजघराण्यात झालेला नाही. जनतेनेच स्वतःहून माझे स्वागत केले आणि मला आपलेसे केले. त्यामुळे खोट्या आश्वासनांनी जनतेची कधीही फसवणूक करणार नाही. मागील द्रमुक सरकारने राज्यावर १० लाख कोटी रुपयांच्या कर्जाचा बोजा लादला आहे. त्यामुळे राज्याच्या आर्थिक स्थितीवर श्वेतपत्रिका प्रकाशित करणार आहे. अमली पदार्थांविरोधात कठोर कारवाई केली जाईल आणि जनतेचा एकही पैसा हडप होऊ दिला जाणार नाही. आमच्या कामातूनच आमची क्षमता सिद्ध करू. आम्हाला थोडा वेळ द्या. प्रामाणिकपणा, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्यायावर आधारित नव्या प्रशासनाची सुरुवात आज होत आहे.

सरकार स्थापनेसाठी पाठिंबा दिल्याबद्दल काँग्रेस, व्हीसीके आणि डाव्या पक्षांचेही आभार मानले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक नेत्यांनी एक्स पोस्ट करून मुख्यमंत्री विजय यांचे अभिनंदन केले. मुख्यमंत्री होताच विजय यांनी तत्काळ सचिवालयात जाऊन कागदपत्रांवर स्वाक्षरी केली. राज्यातील प्रत्येक घराला २०० युनिटपर्यंत मोफत वीज, अमली पदार्थांच्या तस्करीवर नियंत्रण मिळवण्यासाठी विशेष कृती दलची स्थापना आणि महिलांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र स्पेशल टास्क फोर्स, या आदेशावर त्यांनी केली.

# काँग्रेसचा नेहमीचाच घोळ! केरळचा मुख्यमंत्री ठरेना

पान १ वरून

बैठकीत सतीशन यांना केवळ ६आमदारांचा पाठिंबा मिळाला. तर चेन्नीथला यांना ८ मते मिळाली. उर्वरित आमदारांनी ते काँग्रेस हायकमांडच्या निर्णयाला पाठिंबा देतील, असे म्हटले. वेणुगोपाल यांना विधिमंडळ पक्षाचा पाठिंबा आहे. तर पण सतीशन यांनी दिल्लीतून आलेल्या निरीक्षकांना आणि काँग्रेस निरीक्षकांना स्पष्टपणे सांगितले की त्यांना मुख्यमंत्रीपदापेक्षा कमी काहीही मान्य करणार नाही. याशिवाय सतीशन यांना मुख्यमंत्री बनवण्यासाठी कार्यकर्ते रस्त्यावर उतरले आहेत.

काल केरळमधील मुख्यमंत्री निवडण्यासाठी अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी दिल्लीत महत्त्वाची बैठक बोलावली होती. या बैठकीला राहुल गांधी यांच्यासह मुख्यमंत्रिपदाचे दावेदार असलेले तीन नेते, केरळमधील इतर वरिष्ठ नेते उपस्थित होते. या बैठकीत मुख्यमंत्रिपदासाठी कोण योग्य ठरेल यावर सर्वांनी आपली मते मांडली. मुख्यमंत्रिपदाचे दावेदार असलेल्या तिन्ही नेत्यांनीही आपली बाजू मांडली. ही बैठक तीन तासांहून अधिक काळ चालली. मात्र बैठक संपल्यावर मुख्यमंत्रिपदाचे उमेदवाराचे नाव जाहीर करण्यात आले नाही. मुख्यमंत्री कोण, याचा निर्णय खर्गे आणि राहुल गांधी घेतील, असे सांगण्यात आले.

राहुल गांधी यांनी आपली पसंती वेणुगोपाल यांच्या नावाला दिली आहे. असे कळते की, राहुल गांधी यांनी वेणुगोपाल यांच्याबरोबर खासगीत बैठकही घेतली. त्यांनी पक्षात समर्थन वाढवा, असा सल्ला वेणुगोपाल यांना दिला. कालच्या बैठकीत राहुल गांधी यांनी सतीशन यांना वेणुगोपाल यांच्या विरोधात मोहीम राबवत असल्याचा थेट आरोप केला. सतीशन यांनी वेणुगोपाल यांना विरोध केल्याचे मान्य केले. परंतु वेणुगोपाल पक्षात गटबाजी करत असल्याचा आरोप केला. त्यामुळे राहुल गांधींसमोरच केरळमधील गटबाजीचे प्रदर्शन झाले. त्यामुळे केरळच्या मुख्यमंत्रिपदाचा प्रश्न अधिकच गंभीर झाला आहे.


**महाराष्ट्र शासन**
कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, पुणे - ०१.
पत्ता :- मध्यवर्ती इमारत जी बरॅक, पुणे- ४११ ००१.
ई-मेल :- eehpd.pune@gmail.com दूरध्वनी क्र. ०२०-२६१२६९१८

**निविदा सूचना क्र. ब-१/०२/सन २०२६-२७**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, पुणे- ४११ ००१ जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता निविदा मागवित आहेत. सविस्तर निविदा सूचना शासनाच्या https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, पुणे - ४११ ००१ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

**कामाचे नांव :- Providing and Supplying of Consumable (Chemical & Glassware) for existing Water Quality Lab Level - II, Pune (For year 2026-27)**

जिल्हा :- पुणे

निविदेची किंमत रुपये :- ४,०१,८८३/-

निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक ११/०५/२०२६ वेळ ११:०० पासुन ते दिनांक १८/०५/२०२६ वेळ १७:०० पर्यत

निविदा उघडण्याचा :- दिनांक २१/०५/२०२६ वेळ ११:०० वाजता.

जा.क्र. /जविप्रवि/पुणे/लेखा-१/५४३/सन २०२६
कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, पुणे-०१.
दिनांक : ०५/०५/ २०२६

सही/-
(मयुरा जोशी)
कार्यकारी अभियंता.
जलविज्ञान प्रकल्प विभाग, पुणे-०१.

जिमाका/पुणे/जाहिरात/४५/२०२६-२७




# नवाकाळ

• पुणे । सोमवार ११ मे, २०२६ • पान -८

## जगातील सर्वात महागड्या आंब्याचे उत्पादन सांगलीत

**सांगली-** दुष्काळ, अवकाळी पाऊस आणि हवामानात पारंपरिक शेती संकटात सापडत असताना कडेगाव तालुक्यातील वांगी येथील उपक्रमशील शेतकरी



राजाराम भैरू कदम यांनी नवीन प्रयोग केला आहे. राजाराम कदम यांची वांगी येथे १५ एकर आंब्याची बाग आहे. पारंपरिक शेतीत वाढती अनिश्चितता पाहता त्यांनी जगातील सर्वात महागडा मानला जाणारा आणि जपानमध्ये अडीच लाख रुपये किलोपर्यंत दर मिळणारा मियाझाकी आंबा आपल्या शेतात पिकवण्याचा निर्धार त्यांनी केला. यासाठी त्यांनी २०२३ मध्ये पश्चिम बंगाल येथून मियाझाकी आंब्याची ५० रोपे खरेदी केली. ही रोपे विमान, रेल्वे आणि रस्त्याने प्रवास करून अत्यंत काळजीपूर्वक गावी आणली. गावच्या वातावरणात ही विदेशी रोपे टिकतील का, अशी शंका अनेकांनी व्यक्त केली होती. मात्र, कदम यांनी तीन वर्षे या झाडांची मेहनतीने निगा राखली. उन्हाळा, पाऊस आणि थंडी अशा सर्व परिस्थितीत झाडांची विशेष काळजी घेतली. त्यांच्या बागेत सध्या सुमारे २० किलो मियाझाकी आंब्याचे उत्पादन झाले असून लालसर रंग, आकर्षक स्वरूप, सुगंध आणि गोडव्यामुळे हा आंबा पाहणाऱ्यांनाही भुरळ घालत आहे.

## लवांडेंना पोलीस संरक्षण द्या शरद पवार यांची मागणी



■ पुणे

**वारकरी** संप्रदायातील घुसखोरांविरोधात भूमिका घेतल्यामुळे शाईफेक आणि धक्काबुक्की झालेले राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांनी आज पक्षाध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. या भेटीत पवारांनी लवांडे यांच्याकडून घटनेची संपूर्ण माहिती दिली. त्यानंतर शरद पवार यांनी तातडीने राज्याचे पोलीस महासंचालक आणि पुणे पोलीस आयुक्तांना फोन करून आरोपींवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. तसेच लवांडे यांना कायमस्वरूपी पोलीस संरक्षण देण्याची मागणी केली.

विलास लवांडे यांनी एक्सवर पोस्ट करत माहिती दिली की, ज्येष्ठ नेते पद्मविभूषण शरद पवार यांनी मला बोलवून घेतले होते. पुण्यात मोदी बागेत आज मी सकाळी साहेबांची भेट घेतली. माझ्यावर संग्राम भंडारे आणि त्या गुंडांनी केलेल्या हल्ल्यासंदर्भातली जो काही घटनाक्रम आहे तो सर्व त्यांना सांगितला. त्यांनी राज्याचे पोलीस महासंचालक आणि पुणे पोलीस आयुक्तांना फोन करून आरोपींवर कारवाई करण्याची आणि मला कायमस्वरूपी पोलीस संरक्षण देण्याची मागणी केली. त्याचबरोबर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर बैठक होणार असून त्या बैठकीत या विषयावर चर्चा होणार असल्याचे त्यांनी मला सांगितले.

## उद्योगपती अनिल अंबानींच्या रिलायन्सच्या १७ ठिकाणांवर सीबीआयची छापेमारी

■ मुंबई

**बँकांकडून** घेतलेल्या हजारो कोटींच्या कर्ज घोटाळ्याच्या चौकशीदरम्यान केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने (सीबीआय) उद्योगपती अनिल अंबानीच्या रिलायन्स समूहाशी संबंधित मुंबईतील १७ ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत काही आक्षेपार्ह कागदपत्रे सापडल्याचा दावा करण्यात येत आहे.

ही कारवाई विशेष न्यायालयाच्या आदेशानंतर करण्यात आली असल्याची माहिती आहे. अनिल अंबानी यांच्या नेतृत्वाखालील रिलायन्स एडीए समूहाशी संबंधित कंपन्यांवर




बँकांच्या निधीचा गैरवापर आणि फसवणुकीचे आरोप आहेत. यामध्ये रिलायन्स टेलिकॉम, रिलायन्स कमर्शियल फायनान्स आणि रिलायन्स होम फायनान्स या कंपन्यांचा समावेश आहे. या कंपन्यांच्या संचालकांच्या निवासस्थानांसह काही मध्यस्थ कंपन्यांच्या कार्यालयांवरही छापे टाकण्यात आले. तपासात बँकांचा निधी अन्यत्र वळवण्यासाठी मध्यस्थ कंपन्यांच्या खात्यांचा वापर केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. अनेक कंपन्या एकाच पत्त्यावरून कार्यरत असल्याचेही प्राथमिक तपासात आढळून आले आहे. या प्रकरणात आतापर्यंत सात गुन्हे दाखल करण्यात आले असून सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि एलआयसीच्या तक्रारींवरून कारवाई करण्यात आली आहे.

## गुजरातमध्ये सेमीकंडक्टर क्षेत्रात ३,९३६ कोटी रुपयांची गुंतवणूक

■ गांधीनगर

**देशातील** चिप उत्पादनाचे प्रमुख केंद्र म्हणून गुजरात वेगाने पुढे येत आहे. केंद्र सरकारच्या इंडिया सेमीकंडक्टर मिशनअंतर्गत नुकत्याच झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत गुजरातमधील धोलेरा आणि सूरत येथे उभारण्यात येणाऱ्या ३,९३६ कोटींच्या दोन अत्याधुनिक सेमीकंडक्टर प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पांमुळे राज्याच्या औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार असून २,२३० हून अधिक उच्च-तंत्रज्ञान रोजगारनिर्मिती होणार आहे.

या दोन प्रकल्पांपैकी क्रिस्टल



मॅट्रिक्स लिमिटेड धोलेरा स्पेशल इन्व्हेस्टमेंट रीजनमध्ये ३,०६८ कोटींची गुंतवणूक करणार आहे, तर सुची सेमिकॉन प्रा. लि. सुरतमध्ये ८६८ कोटींचा प्रकल्प उभारणार आहे. विज्ञान व तंत्रज्ञान मंत्री अर्जुन मोढवाडिया यांनी ही माहिती दिली.

मंत्री मोढवाडिया म्हणाले की, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री हर्ष संघवी यांच्या नेतृत्वाखाली गुजरातने सेमीकंडक्टर क्षेत्रासाठी स्वतंत्र धोरण जाहीर केले असून राज्यात सुमारे १.२४ लाख कोटींचे चार मोठे प्रकल्प साकार होत आहेत. आता या दोन नव्या प्रकल्पांमुळे गुजरातचा सेमीकंडक्टर इकोसिस्टम अधिक बळकट होणार आहे.

## आंबा-काजू बागायतदारांच्या मोर्चाला उबाठाचा पाठिंबा

■ मुंबई

**अवकाळी** पावसामुळे कोकणातील आंबा आणि काजू बागायतदारांचे मोठे नुकसान झाले असून, तातडीने नुकसानभरपाई द्यावी या मागणीसाठी बागायतदार आक्रमक झाले आहेत. या पार्श्वभूमीवर १५ मे रोजी मुंबईत मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाला उबाठाने पाठिंबा जाहीर केला आहे.

१५ मे रोजी सायंकाळी ४ वाजता गिरगाव चौपाटी ते मुख्यमंत्री निवासस्थान 'वर्षा'पर्यंत हा मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चामध्ये मोठ्या संख्येने आंबा आणि काजू बागायतदार सहभागी होणार आहेत. दरम्यान, बागायतदारांच्या शिष्टमंडळाने 'मातोश्री'वर जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीत बागायतदारांनी आपल्या अडचणी मांडत तातडीने आर्थिक मदतीची मागणी केली. ठाकरे यांनीही त्यांच्या मागण्यांना पाठिंबा देत सरकारने त्वरित नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी भूमिका घेतली आहे.

## पश्चिम घाटात प्रस्तावित अणुऊर्जा प्रकल्प शेतकरी आणि पर्यावरणवाद्यांचा विरोध

■ शिवमोगा

**केंद्र सरकार** कर्नाटकातील मलनाड भागात शरावती खोऱ्यात अणुऊर्जा प्रकल्प उभारण्याच्या शक्यतेचा विचार करत आहे. यासंदर्भात एनटीपीसी लिमिटेडचे अधिकारी आणि कर्नाटक सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये चर्चा झाल्याचे सांगितले जात आहे. स्थानिक रहिवासी, पर्यावरण कार्यकर्ते आणि शेतकरी संघटनांनी या प्रकल्पाला तीव्र विरोध दर्शवला असून, यामुळे मोठ्या प्रमाणावर लोक विस्थापित होण्याची आणि पर्यावरणाची हानी होण्याचा इशारा दिला आहे.

राज्य सरकारने शिवमोगा, रायचूर, विजयनगर, कोप्पळ आणि उत्तर कन्नड जिल्ह्यांकडून उपलब्ध जमिनीची माहिती मागवली आहे. बहुतेक जिल्ह्यांनी योग्य जमीन उपलब्ध नसल्याचे कळविले असताना, शिवमोगा जिल्हा प्रशासनाने सागर तालुक्यातील बेसूरू गावाजवळ सुमारे २,१५० एकर जमीन अनुकूल असल्याचे सांगितले जात आहे. या प्रस्तावामुळे शरावती परिसरातील जलविद्युत प्रकल्पांमुळे आधीच प्रभावित झालेल्या स्थानिक नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. स्थानिकांचे म्हणणे आहे की, मलनाड भागातील अनेक पिढ्यांना धरणे आणि वीज प्रकल्पांमुळे विस्थापन सहन करावे लागले आहे, मात्र त्यांचे नीट पुनर्वसन झालेले नाही. नवीन प्रकल्प राबवण्यापूर्वी प्रलंबित पुनर्वसनाच्या प्रश्नांकडे सरकारने लक्ष द्यावे, अशी मागणी आहे.

## डोकाडिया कलिंगड मृत्यू प्रकरण मुलीला दहावीत ७० टक्के गुण

■ मुंबई

**भेंडीबाजारातील** डोकाडिया कुटुंबातील १६ वर्षीय आयेशा डोकाडिया हिचा २६ एप्रिल रोजी कुटुंबासोबत बिर्याणी आणि कलिंगड खाल्ल्यानंतर मृत्यू झाला होता. नुकत्याच जाहीर झालेल्या दहावीच्या निकालात आयेशाला ७० टक्के गुण मिळाल्याची माहिती तिच्या नातेवाईकांनी दिली.

पोलिसांनी सांगितले की, आयेशाला दहावीत ७० टक्के गुण मिळाले असून तिला फॅशन डिझायनर बनायचे होते. तिच्या शिक्षणाला कुटुंबाचाही पूर्ण पाठिंबा होता. आयेशा व तिची चुलत बहीण भायखळा (पूर्व) येथील इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकत होत्या. तिच्या चुलत बहिणीला ८५ टक्के गुण मिळाले. फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीच्या अहवालानुसार, मृतांच्या शरीरातील अवयवांच्या नमुन्यांमध्ये उंदीर मारण्यासाठी वापरले जाणारे झिंक फॉस्फाइड आढळून आले. हा प्रकार हत्या, आत्महत्या की अपघाती मृत्यू यापैकी कोणता आहे, याचा तपास जे.जे. मार्ग पोलीस करत आहेत. पोलिसांनी काल पुन्हा मृतांच्या नातेवाईकांना चौकशीसाठी बोलावले होते. कुटुंबातील सदस्यांचे मोबाईल फोन सायबर तपासणीसाठी पाठवण्यात आले असून कॉल रेकॉर्डचीही तपासणी सुरू आहे.

## 'गोकुळ'च्या ठेकेदार कंपन्यांच्या मक्त्याची माहिती देण्याची मागणी

■ कोल्हापूर

**कोल्हापूर**, मुंबई आणि पुणे विभागातील गोकुळ अर्थात कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या दूध पॅकिंग आणि वितरण कंत्राटांमध्ये ठेकेदार कंपन्यांच्या मक्तेदारीची व त्यांच्या व्यवहारांची माहिती देण्याची मागणी संघांच्या सभासद संस्थांनी केली आहे.

'गोकुळ' च्या सभासद संस्थांच्या प्रतिनिधींनी गोकुळच्या शिरगाव येथील प्रकल्पस्थळी भेट देऊन सह्यांचे निवेदन मुख्य प्रशासक संजयकुमार सुद्रिक तसेच प्रशासकीय मंडळाचे सदस्य प्रदीप मालगावे, सुनील धायगुडे,




सागर बलकवडे आणि चंद्रकांत परुळेकर यांच्याकडे सादर केले. या निवेदनात म्हटले आहे की, गोकुळ दूध संघाच्या सभासद असलेल्या दूध संस्थांचे आम्ही प्रतिनिधी आहोत. मुंबईतील पॅकिंग व वितरण व्यवस्थेसाठी कार्यरत कोल्हापूर आईस अँड कोल्ड व्यवस्थेसाठी असलेल्या गोकुळ स्टोरेज, पुण्यातील वितरण मिल्क सप्लायर आणि पुण्यातील पॅकिंग ठेका असलेल्या गायत्री कोल्ड स्टोरेज या कंपन्यांची सविस्तर माहिती तातडीने द्यावी.

गोकुळमध्ये वर्षानुवर्षे दूध पॅकिंग करणाऱ्या जुन्या ठेकेदारांनी नवीन कंपन्यांना काम न देण्याबाबत दबाव आणल्याचा आरोप आहे.

## सुप्रिया सुळेंचा अपघात की घातपाताचा प्रयत्न? सुनील मानेंचा सवाल

■ मुंबई

**शरद पवार** गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या गाडीचा मुंबई-पुणे मार्गावर अपघात झाल्याने खळबळ उडाली. सुळे या मुंबईहून पुण्याकडे प्रवास करत असताना एका अन्य वाहनाने त्यांच्या कारला बाजूने धडक दिली. अपघातानंतर सुप्रिया सुळे यांनी स्वतः सर्वजण सुखरूप असल्याची माहिती दिली. तसेच वाहन चालवताना काळजी घेण्याचे आवाहनही त्यांनी नागरिकांना केले आहे. मात्र या शरद पवार गटाचे नेते नेते सुनील माने यांनी या अपघात होता की घातपाताचा पर्यंत असा संशय व्यक्त करत सखोल चौकशीची मागणी केली आहे.

सुनील माने म्हणाले की, सुप्रिया सुळे या राष्ट्रवादीतील महत्त्वाच्या नेत्या आहेत. अलीकडे एका पाठोपाठ एक राष्ट्रवादीच्या नेत्यांना टार्गेट केले जात आहे. अजित दादांच्या अपघाती मृत्यूचे कारण अजूनही उलगडले नाही. त्यात सुप्रिया ताईंच्या गाडीचा अपघात झाला आहे. महत्त्वाचे म्हणजे ही गाडी गुजरातची असून, या प्रकरणाला साधा अपघात न समजता सखोल तपास झाला पाहिजे. अजित पवार यांचा घातपात करण्यात आला, त्याच पद्धतीने खा. सुप्रिया सुळे यांच्या गाडीला गुजरातमधील एका गाडीने अतिशय भयानक धडक दिली.

## एका आठवड्यात कान्हा व्याघ्र प्रकल्पात पाच वाघांचा मृत्यू

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ भोपाळ

**मध्यप्रदेशातील** कान्हा व्याघ्र प्रकल्पात कुत्र्यांमधून पसरणाऱ्या 'केनाईन डिस्टेंपर व्हायरस' (सीडीव्ही) या घातक विषाणूच्या संसर्गामुळे अवघ्या एका आठवड्यात पाच वाघांचा मृत्यू मृत्यू झाला आहे. टी-१४१ या वाघिणीसह तिच्या चार बछड्यांचा २१ ते २८ एप्रिल दरम्यान मृत्यू झाला असून, या प्रकारामुळे वन्यजीव संवर्धनाबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे.

वाघिणी आणि बछड्यांचे नमुने जबलपूर येथील प्रयोगशाळेत तपासले असता, पाचही वाघांचा मृत्यू सीडीव्हीमुळे झाल्याचे

**कुत्र्यापासून घातक विषाणूचा संसर्ग**

निष्पन्न झाले. हा विषाणू प्रामुख्याने कुत्रावर्गीय प्राण्यांमध्ये आढळतो, मात्र सध्या तो मार्जारवर्गीय प्राण्यांमध्येही पसरत असल्याने चिंता वाढली आहे. घटना घडलेल्या सरही सेक्टरमध्ये पाच चौरस किलोमीटर परिसर 'नो-गो झोन' करण्यात आला आहे. तसेच हत्तीवरून गस्त, कॅमेरा ट्रॅप, पाण्याचे व विष्ठेचे नमुने तपासण्याचे काम सुरू आहे. परिसरातील सुमारे ८० गावांतील कुत्र्यांचे लसीकरणही सुरू करण्यात आले आहे. या घटनेमुळे स्थानिकांमध्ये नाराजी व्यक्त होत असून पर्यटनावर परिणाम होण्याची भीती आहे. वन विभागाने मात्र परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी उपाययोजना सुरू असल्याचे सांगितले आहे.

## निदा खान, आईची चौकशी मतीन पटेल कार्यालयाला नोटीस

■ नाशिक

**नाशिकमधील** टीसीएस धर्मांतर आणि लैंगिक शोषण प्रकरणी अटक केलेली निदा खान, तिची आई आणि नातेवाईकांची कसून चौकशी केली जात आहे. ती फरार असताना तिला लपण्यासाठी एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांनी मदत केल्याने त्यानांही सहआरोपी केले. दरम्यान, मतीन पटेलच्या कार्यालयाला पालिकेने अनधिकृत असल्याची नोटीस बजावली आहे.

निदा खान आणि तिच्या आईची जवळपास दीड तास समोरासमोर बसवून चौकशी झाली . फरार असताना निदा नेमकी कुठे लपली होती, पळून जाण्यामागील कारण काय होते आणि या काळात ती कोणाच्या संपर्कात होती, यासंदर्भात पोलिसांनी प्रश्नांची सरबत्ती केली.

या चौकशीत निदाचे वडील, भाऊ आणि मावशी यांचाही समावेश होता. सध्या त्यांना सोडले असले तरी तपासाच्या गरजेनुसार त्यांना पुन्हा चौकशीसाठी बोलावले जाण्याची शक्यता आहे.

## आयपीएल स्टार खेळाडूंच्या खोलीत रात्री उशिरापर्यंत पाहुण्यांमुळे संशय

■ नवी दिल्ली

**बीसीसीआयने** आयपीएल खेळाडू, समालोचक आणि संघांसाठी काही कडक नियम लागू केले आहेत. खेळाडू आणि सपोर्ट स्टाफच्या खोल्यांमध्ये अनधिकृत व्यक्तींच्या प्रवेशामुळे मंडळाची चिंता वाढली. अलीकडेच एका खेळाडूच्या खोलीत रात्री उशिरापर्यंत आपल्या खोलीत काही लोक थांबताना आढळले होते. त्यानंतर बीसीसीआयच्या भ्रष्टाचारविरोधी पथकातील अधिकाऱ्याने तत्काळ संघ व्यवस्थापकाला या भेटींविषयी चौकशीसाठी बोलावले. मात्र त्याने नीट उत्तर दिले नाही. व्यवस्थापकाने त्या खेळाडूच्या संघातील वरिष्ठतेचा दाखला देत त्याची बाजू घेतली.

आयपीएलमध्ये दीर्घकाळ टीम मॅनेजर म्हणून काम केलेल्या एका माजी अधिकाऱ्याने सांगितले की, यात मला आश्चर्य वाटत नाही. काहीवेळा खेळाडू संघातील आपला प्रभाव वापरून नियम वाकवतात. एकदा मी एका खेळाडूला त्याच्या मित्रांना रूममध्ये नव्हे तर हॉटेलच्या लॉबीतील रेस्टॉरंटमध्ये भेटायला सांगितले होते. याबाबत बोर्डाच्या काही सूचना आहेत. त्यावर तो लगेच म्हणाला, तुम्ही काळजी करू नका. बोर्डाने विचारले तर मी त्यांना उत्तर देईन. दुसऱ्या एका संघाच्या अधिकाऱ्यानेही यावर आपले मत व्यक्त करताना सांगितले की, खेळाडूंनी दबाव टाकल्याबद्दल मला माहिती नाही. पण आम्ही आता स्पष्ट सूचना दिल्या आहेत की, संघ ज्या हॉटेलमध्ये थांबला आहे तिथे मित्र किंवा कुटुंबीयांना बोलवण्यासाठी लेखी किंवा किमान तोंडी परवानगी आवश्यक असेल.

## तिकीट तपासनीसाला मारहाण सॉफ्टवेअर इंजिनिअर अटकेत

■ मुंबई

**विनातिकीट** प्रवास करताना पकडल्यावर दंड भरण्यास सांगितल्याच्या रागातून एका प्रवाशाने तिकीट तपासनीसाला (टीसी) मारहाण केल्याची घटना लोकमान्य टिळक टर्मिनस येथील एक्सप्रेसमध्ये घडली. याप्रकरणी रेल्वे पोलिसांनी २५ वर्षीय राजकमलेंद्र तिवारी या सॉफ्टवेअर इंजिनिअर प्रवाशाला अटक केली आहे.

पुण्यातील एका आंतरराष्ट्रीय कंपनीत तो कार्यरत आहे. तो आपल्या आईला एक्सप्रेसमध्ये बसविण्यासाठी लोकमान्य टिळक टर्मिनस येथे आला होता. एक्सप्रेसमध्ये तिकीट तपासनीचे काम पाहत असलेले अमित कोळी (४२) यांनी तिवारीकडे तिकिटाची विचारणा केली. त्यावर मी प्रवास करत नाही, आईला सोडण्यासाठी आलो आहे, असे तिवारीने सांगितले. यानंतर कोळी यांनी त्याच्याकडे प्लॅटफॉर्म तिकीट मागितले असता तेही त्याच्याजवळ नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे कोळी यांनी त्याला ३०० रुपयांचा दंड भरण्यास सांगितले.

## कांद्याला १ रुपया किलो भाव संतप्त शेतकऱ्याने कांदा जाळला

**धाराशिवच्या भूम तालुक्यातील तिंत्रज येथील कांदा उत्पादक शेतकरी भगवान साबळे यांनी अवघा १ रुपया किलो भाव मिळत असल्याने संतप्त होऊन तब्बल ६०० गोणी कांद्याला आग लावली.**

■ धाराशिव

**भगवान** साबळे यांनी सुमारे चार एकरावर कांद्याची लागवड केली होती. त्यापैकी अडीच एकरातील कांद्याची काढणी करून ६०० गोणी कांदा विकायला नेला होता. मात्र, उत्पादनासाठी ३ ते ४ लाख रुपये खर्च करूनही बाजारात त्यांच्या कांद्याला केवळ १ रुपया किलो दर मिळत असल्याने त्यांनी संताप व्यक्त करत संपूर्ण



कांदा पेटवून दिला. या घटनेनंतर पंचनामा करून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, पैठण तालुक्यातील वरुडी येथील एका शेतकऱ्याने १ क्विंटल ६२ किलो कांदा विक्रीसाठी आणला होता. त्यांना १६२ रुपयांचे बिल मिळाले, मात्र हमाली, तोलाई, भराई आणि वाहतूक खर्च १६१ रुपये आल्याने त्यांच्या हातात अवघा १ रुपया उरला. त्यामुळे संतप्त शेतकऱ्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एका पत्रासोबत 'नफा' मिळालेला १ रुपया आणि एक कांदाही पोस्टाने पाठवला आहे.

## नसरापूर प्रकरणी मूक मोर्चा पुण्यात पालक रस्त्यावर

■ पुणे

**नसरापूर** येथे ३ वर्षीय मुलीवर अत्याचार करून तिची हत्या झाल्याच्या घटनेच्या निषेधार्थ आज पुण्यात शांतता-मूक मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात विविध सामाजिक संघटना, नागरिक, पालक व युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. बालगंधर्व रंगमंदिर ते स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक चौक या मार्गावर हा मोर्चा निघाला. १ मे रोजी नसरापूर येथे ६५ वर्षीय आरोपीने तीन वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करून तिची हत्या केली. या घटनेनंतर परिसरात संतापाची लाट उसळली होती. नागरिकांनी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलनही केले होते. पोलिसांनी आरोपीला अटक केली असली तरी चौकशीदरम्यान तो सहकार्य करत नाही. न्यायालयात हजर केल्यावर आरोपीने किरकोळ वादातून मला या प्रकरणात अडकवण्यात आले, असा दावा केल्याने संताप अधिकच वाढला आहे. मोर्चादरम्यान सहभागी नागरिकांनी निषेध नोंदवत चिमुकलीला न्याय मिळाला पाहिजे, आरोपीला फाशी द्या अशी मागणी केली.